राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

नॅक पुनर्मूल्यांकित 'अ' दर्जा प्राप्त

Azadi Ka Amrit Mahotsav

G20 भारत 2023 INDIA

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ
१०० शताब्दी वर्ष
१९२३ - २०२३

मेरी माटी मेरा देश

वार्षिक अहवाल
2022-2023

राष्ट्रीय मूल्यांकन एवं प्रत्यायन परिषद

NATIONAL ASSESSMENT AND ACCREDITATION COUNCIL

An Autonomous Institution of the University Grants Commission

Certificate of Accreditation

The Executive Committee of the
National Assessment and Accreditation Council
is pleased to declare the
Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University
Civil Lines, Nagpur, Maharashtra as
Accredited
with CGPA of 3.01 on four point scale
at A grade
valid up to September 06, 2026

Date : September 07, 2021

Director

EC(SC)/72/4th Cycle/MHUNGN10046

विद्या परं दैव तम्



वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज

Vandaneeya Rashtrasant Tukadoji Maharaj

सत्यमेव जयते



श्री. रमेश बैस

मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य व
कुलपती, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ
(दिनांक १८.२.२०२३ पासून)

Shri. Ramesh Bais

Hon'ble Governor, Maharashtra State and
Chancellor, Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University
(From 18.2.2023)

सत्यमेव जयते



श्री. भगत सिंह कोश्यारी

मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य व
कुलपती, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ
(दिनांक १७.२.२०२३ पर्यंत)

Shri. Bhagat Singh Koshyari

Hon'ble Governor, Maharashtra State and
Chancellor, Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University
(Upto 17.2.2023)

डॉ. सुभाष चौधरी

कुलगुरू

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(दिनांक ८.८.२०२० पासून)

Dr. SUBHASH CHAUDHARI

Vice-Chancellor

Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University

(From 8. 8. 2020)

डॉ. संजय दुधे

प्र-कुलगुरू

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(दिनांक २७.१०.२०२० पासून)

Dr. SANJAY DUDHE

Pro-Vice-Chancellor

Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University

(From 27.10. 2020)

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर

वार्षिक अहवाल
(१ जुलै २०२२ ते ३० जून २०२३)

प्रकाशक :

डॉ. राजू हिवसे

कुलसचिव,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर

मुद्रक :

श्री. राजेंद्र उतखेडे

व्यवस्थापक (अतिरिक्त कार्यभार)
(दि. १२/९/२०२२ पर्यंत)

श्री. प्रवीण गोतमारे

प्रकाशन अधिकारी (अतिरिक्त कार्यभार)
(दि. १२/९/२०२२ पासून)
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ
मुद्रण व प्रकाशन विभाग, नागपूर

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या कलम १३६ अन्वये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा दिनांक ३० जून २०२३ रोजी संपणाऱ्या वर्षाचा अहवाल

अनुक्रमणिका

वार्षिक अहवाल समिती	—	एक
अभिनंदन	—	दोन ते चार
विनम्र श्रद्धांजली	—	पाच, सहा
अध्यक्षीय मनोगत	—	सात, आठ
कृतज्ञता	—	नऊ
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ : एक दृष्टिक्षेप	—	दहा ते चौदा

प्रकरणे

प्रकरण पहिले
विद्यापीठ प्राधिकरणे व मंडळे
पृष्ठ क्र. १ ते ३०

प्रकरण दुसरे
दीक्षांत समारंभ
पृष्ठ क्र. ३१ ते ३६

प्रकरण तिसरे
विद्यापीठाचे शैक्षणिक विभाग आणि संचालित महाविद्यालये
पृष्ठ क्र. ३७ ते ८०

प्रकरण चौथे
विद्यापीठाचे इतर विभाग
पृष्ठ क्र. ८१ ते १०८

प्रकरण पाचवे
विद्यापीठ विकास योजना
पृष्ठ क्र. १०९ ते ११८

प्रकरण सहावे
विद्यापीठातील स्पृहणीय उपक्रम
पृष्ठ क्र. ११९ ते १३०

(उच्च व तंत्र शिक्षण विभागाने सुचविलेल्या मुद्द्यांची माहिती पृष्ठ क्र. १२५)

प्रकरण सातवे
विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये
पृष्ठ क्र. १३१ ते १८१

परिशिष्टे
एक. स्नातकोत्तर अभ्यासक्रम,पृष्ठ क्र. प–१ ते प – १६
दोन. सांख्यिकी सारण्या, पृष्ठ क्र. प–१७ ते प – २०
तीन. शोधनिबंध, पृष्ठ क्र. प–२१ ते प – २९

वार्षिक अहवाल समिती

अध्यक्ष

डॉ. शामराव कोरेटी

सदस्य

डॉ. प्रशांत माहेश्वरी

डॉ. संजय कवीश्वर

डॉ. प्रशांत कडू

डॉ. राजेश सिंह

डॉ. अजीत जाचक

डॉ. संजय पळवेकर

डॉ. शैलेद्र लेंडे

डॉ. सोपानदेव पिसे

डॉ. मंगेश पाठक

डॉ. (श्रीमती) मंजूश्री सरदेशपांडे

डॉ. निहाल शेख

डॉ. राजेंद्र नाईकवाडे

निमंत्रित सदस्य

डॉ. राष्ट्रपाल मेश्राम

डॉ. दिपक धरणे

सचिव

डॉ. (श्रीमती) स्मिता आचार्य

संचालक (अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष)

संपादन

डॉ. शैलेद्र लेंडे

अभिनंदन

मा. श्री. रमेश बैस



भारताच्या मा. राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांनी छत्तीसगढचे माजी सांसद मा. श्री. रमेश बैस यांची महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालपदी नियुक्ती केल्याबद्दल मा. श्री. रमेश बैस यांचे हार्दिक अभिनंदन.

डॉ. प्रशांत ब्रजमोहन माहेश्वरी



महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ३०(४)(घ) अंतर्गत मा. कुलगुरूंनी डॉ. प्रशांत ब्रजमोहन माहेश्वरी, अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांना विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेवर सदस्य म्हणून दिनांक २६ डिसेंबर, २०२२ पासून २८ फेब्रुवारी, २०२५ पर्यंतच्या कालावधीकरिता नामनिर्देशित केल्याबद्दल डॉ. प्रशांत ब्रजमोहन माहेश्वरी यांचे हार्दिक अभिनंदन.

डॉ. दत्तात्रय वाटमोडे

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ३०(४)(घ) अंतर्गत मा. कुलगुरूंनी डॉ. दत्तात्रय वाटमोडे, अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांना विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेवर सदस्य म्हणून दिनांक १ सप्टेंबर, २०२२ पासून २८ फेब्रुवारी, २०२५ पर्यंतच्या कालावधीकरिता नामनिर्देशित केल्याबद्दल डॉ. दत्तात्रय वाटमोडे यांचे हार्दिक अभिनंदन.

डॉ. प्रशांत शालिग्रामजी कडू

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ३०(४)(घ) अंतर्गत मा. कुलगुरूंनी डॉ. प्रशांत शालिग्रामजी कडू, अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांना विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेवर सदस्य म्हणून दिनांक ५ जून, २०२३ पासून २८ फेब्रुवारी, २०२५ पर्यंतच्या कालावधीकरिता नामनिर्देशित केल्याबद्दल डॉ. प्रशांत शालिग्रामजी कडू यांचे हार्दिक अभिनंदन.

डॉ. राजश्री वैष्णव

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ३०(४)(घ) अंतर्गत मा. कुलगुरूंनी डॉ. राजश्री वैष्णव, प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांना विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेवर सदस्य म्हणून दिनांक १ सप्टेंबर, २०२२ पासून २८ फेब्रुवारी, २०२५ पर्यंतच्या कालावधीकरिता नामनिर्देशित केल्याबद्दल राजश्री वैष्णव यांचे हार्दिक अभिनंदन.

श्री. हरीश राधेश्यामजी पालीवाल

श्री. हरीश राधेश्यामजी पालीवाल यांची राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या वित्त व लेखा अधिकारीपदी दिनांक १५ डिसेंबर, २०२२ रोजी नियुक्ती झाल्याबद्दल श्री. हरीश राधेश्यामजी पालीवाल यांचे हार्दिक अभिनंदन.

डॉ. प्रमोद खेडेकर



महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ३०(४)(ङ) अन्वये, मा. कुलगुरूंनी विद्यापीठ विभाग किंवा विद्यापीठ परिसंस्था यांचे प्रमुख किंवा संचालक संवर्गातून डॉ प्रमोद खेडेकर विभागप्रमुख, औषधिनिर्माणशास्त्र विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांना विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेवर सदस्य म्हणून दिनांक १ सप्टेंबर, २०२२ पासून ३१ ऑगस्ट, २०२३ पर्यंतच्या कालावधीकरिता नामनिर्देशित केल्याबद्दल डॉ प्रमोद खेडेकर यांचे हार्दिक अभिनंदन.

डॉ. मंगेश निळकंठ पाठक

आर. एस. मुंडले धरमपेठ आर्टस ॲन्ड कॉमर्स कॉलेज, नागपूर येथील संस्कृत विभागातील सहायक प्राध्यापक डॉ. मंगेश निळकंठ पाठक यांची राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास संचालकपदी मा. कुलगुरूंनी दिनांक ४ जुलै, २०२२ रोजी नामित केल्यानुसार ते संचालक, विद्यार्थी विकास या पदावर दिनांक १९ जुलै, २०२२ रोजी रूजू झाल्याबद्दल डॉ. मंगेश निळकंठ पाठक यांचे हार्दिक अभिनंदन

डॉ. समय बनसोड

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ३०(४)(ग) मधील तरतुदीनुसार मा. कुलपतींनी डॉ. समय बनसोड यांची विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेवर सदस्य म्हणून नामित केल्याबद्दल डॉ. समय बनसोड यांचे हार्दिक अभिनंदन.

डॉ. निलकंठ यादवराव लंजे

अधिसभेतून व्यवस्थापन परिषदेवर सदस्य निवडून देण्याबाबत दिनांक ७ जून, २०२३ रोजी संपन्न झालेल्या निवडणुकीत, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ३०(४)(च) नुसार प्राचार्य संवर्गातील खुल्या प्रवर्गातून बिनविरोध निवडून आल्याबद्दल डॉ. निलकंठ यादवराव लंजे यांचे हार्दिक अभिनंदन.

डॉ. अतुल वैद्य



महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ३०(४)(ट) मधील तरतुदीनुसार कुलगुरूंनी मा. कुलपतींशी विचारविनिमय करून, राष्ट्रीय कीर्तीच्या परिसंस्थेतून ख्यातनाम तज्ज्ञ म्हणून नागपूर येथील राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संशोधन संस्थेचे संचालक डॉ. अतुल वैद्य यांची विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेवर सदस्य म्हणून नामित केल्याबद्दल डॉ. अतुल वैद्य यांचे हार्दिक अभिनंदन.

डॉ. देवेंद्र श्रीकृष्णाजी भोंगाडे



अधिसभेतून व्यवस्थापन परिषदेवर सदस्य निवडून देण्याबाबत दिनांक ७ जून, २०२३ रोजी संपन्न झालेल्या निवडणुकीत, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ३०(४)(च) नुसार प्राचार्य संवर्गातील इतर मागासवर्ग प्रवर्गातून बिनविरोध निवडून आल्याबद्दल डॉ. देवेंद्र श्रीकृष्णाजी भोंगाडे यांचे हार्दिक अभिनंदन.

डॉ. योगेश वसंतराव भुते



अधिसभेतून व्यवस्थापन परिषदेवर सदस्य निवडून देण्याबाबत दिनांक ७ जून, २०२३ रोजी संपन्न झालेल्या निवडणुकीत, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ३०(४)(छ) नुसार अध्यापक व विद्यापीठ अध्यापक संवर्गातील खुल्या प्रवर्गातून बिनविरोध निवडून आल्याबद्दल डॉ. योगेश वसंतराव भुते यांचे हार्दिक अभिनंदन.

डॉ. पांडुरंग सदाशिव डांगे

अधिसभेतून व्यवस्थापन परिषदेवर सदस्य निवडून देण्याबाबत दिनांक ७ जून, २०२३ रोजी संपन्न झालेल्या निवडणुकीत, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ३०(४)(छ) नुसार अध्यापक व विद्यापीठ अध्यापक संवर्गातील अनुसूचित जाती प्रवर्गातून बिनविरोध निवडून आल्याबद्दल डॉ. पांडुरंग सदाशिव डांगे यांचे हार्दिक अभिनंदन.

श्री. अजय अमीलाल अग्रवाल



अधिसभेतून व्यवस्थापन परिषदेवर सदस्य निवडून देण्याबाबत दिनांक ७ जून, २०२३ रोजी संपन्न झालेल्या निवडणुकीत, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ३०(४)(ज) नुसार व्यवस्थापन प्रतिनिधी संवर्गातील खुल्या प्रवर्गातून बिनविरोध निवडून आल्याबद्दल श्री. अजय अमीलाल अग्रवाल यांचे हार्दिक अभिनंदन.

श्री. अजय धनराज चव्हाण

अधिसभेतून व्यवस्थापन परिषदेवर सदस्य निवडून देण्याबाबत दिनांक ७ जून, २०२३ रोजी संपन्न झालेल्या निवडणुकीत, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ३०(४)(झ) नुसार नोंदणीकृत पदवीधर संवर्गातील खुल्या प्रवर्गातून बिनविरोध निवडून आल्याबद्दल श्री. अजय धनराज चव्हाण यांचे हार्दिक अभिनंदन.

श्री. वामन देवराव तुर्के

अधिसभेतून व्यवस्थापन परिषदेवर सदस्य निवडून देण्याबाबत दिनांक ७ जून, २०२३ रोजी संपन्न झालेल्या निवडणुकीत, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ३०(४)(झ) नुसार नोंदणीकृत पदवीधर संवर्गातील निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती) किंवा भटक्या जमाती बिनविरोध प्रवर्गातून निवडून आल्याबद्दल श्री. वामन देवराव तुर्के यांचे हार्दिक अभिनंदन.

विनम्र
श्रद्धांजली

डॉ. दिलीप मालखेडे



अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ. दिलीप मालखेडे यांचे दिनांक २९ जानेवारी, २०२३ रोजी दुःखद निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय ५६ वर्षे होते. डॉ. मालखेडे यांचा जन्म अमरावती जिल्ह्यातील बहिरम करजगाव येथे दिनांक २७ ऑगस्ट, १९६६ रोजी झाला होता.

डॉ. मालखेडे यांनी अमरावती येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातून मेकॅनिकल इंजिनिअरिंग या शाखेतून पदवी तसेच पदव्युत्तर पदवीचे (एम. ई.) शिक्षण घेतले. मुंबई आयआयटीमधून त्यांनी संशोधन कार्य करीत पीएच. डी. प्राप्त केली होती. डॉ. मालखेडे यांनी पुणे येथील शासकीय कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथे यांत्रिकी अभियांत्रिकी विषयाचे प्राध्यापक म्हणून कार्य पार पाडले होते. त्यानंतर डॉ. मालखेडे यांनी दिल्ली येथील अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद येथे सल्लागार-१ या पदावर प्रतिनियुक्तीवर काम केले होते.

विद्यापीठाच्या मा. कुलपती महोदयांनी डॉ. मालखेडे यांची संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या कुलगुरूपदी नियुक्ती केल्यानुसार त्यांनी दिनांक ११ सप्टेंबर, २०२१ रोजी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या कुलगुरू पदाची सूत्रे सांभाळली होती. डॉ. मालखेडे यांनी आपल्या कार्यकाळात संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाला उच्च स्तरावर नेऊन ठेवण्यासाठी अनेक प्रयत्न केले. त्यासाठी अनेक शैक्षणिक संस्था व विद्यापीठे यांच्यासोबत करार केला होता. नवीन शिक्षण पद्धतीनुसार विद्यार्थ्यांना शिकता यावे याकरिता त्यांनी अमरावती विद्यापीठात क्रेडिट बेस्ट चॉईस सिस्टीमसुद्धा लागू केली होती. आजारी असताना डॉ. मालखेडे यांनी सीबीसीएस साठी कसोटीने प्रयत्न केले होते. डॉ. मालखेडे यांच्या निधनाने शैक्षणिक क्षेत्राची फार मोठी हानी झाली आहे.

स्व. मा. डॉ. दिलीप मालखेडे यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

डॉ. चंदनसिंह प्रेमसिंह रोटेले



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या अधिसभेचे व व्यवस्थापन परिषदेचे माजी सदस्य डॉ. चंदनसिंह प्रेमसिंह रोटेले यांचे दिनांक १२ डिसेंबर, २०२२ रोजी दुःखद निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ६५ वर्षे होते.

डॉ. रोटले यांचा जन्म चंद्रपूर जिल्ह्याातील चिमूर तालुक्यातील भानसुलीपेठ येथे दिनांक ६ जुलै, १९५७ रोजी झाला होता. त्यांचे पदवीपर्यंतचे शिक्षण चिमूर येथून तर पदव्युत्तर पर्यंतचे शिक्षण तिरपुडे समाजकार्य महाविद्यालय, नागपूर येथून झाले होते. त्यांनी एम. फिल व आचार्य पदवी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातून प्राप्त केली होती. डॉ. रोटेले यांनी अध्यापक व तद्नंतर प्राचार्य म्हणून भंडारा येथील आठवले समाजकार्य महाविद्यालयात कार्य केले होते. त्यांनी विद्यापीठाच्या अधिसभेवर, व्यवस्थापन परिषदेवर व इतर मंडळांवर कार्य केले होते.

डॉ. रोटेले यांचा अनेक सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक संस्थांशी निकटचा संबंध होता. संपूर्णपणे निरहंकारी व विनम्र वृत्तीने त्यांनी विद्यापीठाकरिता व समाजाकरिता कार्य केले होते. डॉ. रोटेले यांच्या निधनाने विद्यापीठ एक कुशल शिक्षक व विचारवंतापासून पोरका झालेला आहे.

स्व. डॉ. चंदनसिंह प्रेमसिंह रोटेले यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

डॉ. वसंतराव उपाख्य बाबासाहेब हरिभाऊजी घोरपडे

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या अधिसभेचे व व्यवस्थापन परिषदेचे माजी सदस्य डॉ. वसंतराव उपाख्य बाबासाहेब हरिभाऊजी घोरपडे यांचे दिनांक २६ जून, २०२३ रोजी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय ८३ वर्षे होते. डॉ. घोरपडे यांचा जन्म अमरावती जिल्ह्यातील मंगरूळ येथे झाला होता.

डॉ. घोरपडे यांचे प्राथमिक शिक्षण अमरावती जिल्ह्यात व महाविद्यालयीन शिक्षण नागपूर जिल्ह्यात झाले होते. त्यांनी वर्धा येथील यशवंत महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी सलग सहा वर्ष कार्य केले होते. ते विद्यापीठाच्या विविध प्राधिकरण व समित्यांवर कार्यरत होते. ते अत्यंत विनम्र स्वभावाचे होते. विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणांवर कार्यरत असतांना विद्यापीठावर येणाऱ्या अडचणींच्या वेळेस ते नेहमी प्रशासनास सहकार्य करत होते. डॉ. घोरपडे यांच्या निधनाने शैक्षणिक क्षेत्राची फार मोठी हानी झाली आहे.

स्व. मा. डॉ. वसंतराव उपाख्य बाबासाहेब हरिभाऊजी घोरपडे यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

अध्यक्षीय मनोगत

सत्र १ जुलै, २०२२ ते ३० जून, २०२३ चा कालखंड म्हणजेच विद्यापीठासाठी अतिशय धामधुमीचा कालखंड राहिला. जवळपास एखाद वर्षाअगोदर पासून विद्यापीठात शताब्दी महोत्सव साजरा करण्यासंबधी हालचाली सुरू झाल्या होत्या. त्यावर अंमलबजावणी करणे म्हणजे महोत्सवाचा शुभारंभ करण्याचा योग ४ ऑगस्ट, २०२२ पासून म्हणजेच विद्यापीठाचा स्थापना दिवस साजरा करण्याच्या निमित्तापासून प्रारंभ झाला. त्यानंतर तर सलग वर्षाभरापासून ह्या ना त्या विभागाद्वारे विविध उपक्रम, सेमिनार, व्याख्यानमाला, 'ग्राम चलो अभियान' सारखे उपक्रम राबविण्याचा सपाटा सुरू झाला. त्यात लक्षवेधी आणि अतिशय मानाचे ठरले असे. इंडियन सॉयन्स कॉंग्रेस, फार्मास्यूटिकल कॉंग्रेससारख्या मोठ्या कार्यक्रमांनी संपुर्ण जगाचे लक्ष आपल्याकडे वेधून घेतले. ह्यातच विद्यापीठाच्या अफाट क्षमतेचे दर्शन सर्वांना झाले. शंभरी साजरा करणाऱ्या संस्थेने राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे नावासोबतच नागपूर शहराचेही नाव सर्वदूर प्रचलित झाले.

कोरोनासारख्या आणीबाणीच्या काळानंतर स्वत:ला सांभाळत विद्याापीठाने पुनश्च आपला नावलैकिक केले. शिवाय सर्वक्षेत्रीय आव्हानावर मात करून आपले विद्यापीठ नव्या उत्साहाने कामाला लागले. त्याचे प्रतिबिंब निश्चितच प्रस्तुत वार्षिक अहवालात सर्वांना पाहता येऊ शकेल.

शताब्दी वर्ष साजरा करीत असतानाच शैक्षणिक गुणवत्तासंबधी महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी दिशा निर्देशन केल्याप्रमाणे नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी विद्यापीठाद्वारे करण्यात आली आहे. विद्यापीठांतर्गत निर्देशित सर्व पदव्युत्तर विभागाद्वारे NEP-2020 लागू करण्यात आली असून सुयोग्य पद्धतीने कार्य सुरू आहे. शिवाय स्नातक स्तरावर भावी काळात लागु केल्या जाईल असा अभ्यासक्रम विद्यापीठाने तयार केलेला आहे. विद्यापीठाने शैक्षणिक कार्यासोबतच सामाजिक आणि सांस्कृतिक बाबीवरही कार्य केल्याचे दिसून येते.

'Reaching to Unreached' सारखा उपक्रम असो किंवा 'ग्राम चलो अभियान' असो, या उपक्रमाद्वारे विद्यापीठाची नाळ ग्रामीण, दुर्लक्षित वंचित समाजाशी, क्षेत्रांशी जोडण्याचा प्रयत्न दिसून येतो. मा. कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या नेतृत्त्वाखाली व दूरदृष्टीकोणातून सदर उपक्रम अतिशय नियोजनबद्ध पद्धतीने राबविण्यात विद्यापीठाला यश लाभले आहे.

प्रस्तुत अहवालात आपल्या पूर्वोक्त परिपाठीप्रमाणे विद्यापीठाच्या बृहत व विविध शाखा–प्रशाखांची विस्तृत विवरणासह तथ्यात्मक माहिती देण्यात आली आहे. सदर अहवालात विविध माहितीची प्रकरणश: रचना करण्यात आली असून ती पुढीलप्रमाणे आहे.

प्रकरण १– विद्यापीठ प्राधिकरणे व मंडळे : अहवालाच्या पहिल्या प्रकरणात विद्यापीठ प्राधिकरणे व मंडळे यात समाविष्ट व्यक्तिबाबतची माहिती उद्धृत केली आहे.

प्रकरण २ – दीक्षांत समारंभ : विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ हा विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक उपक्रमांची फलश्रुती दर्शविणारा महत्त्वपूर्ण कार्यक्रम असतो. कार्यक्रमाला येणारे प्रमुख पाहुणे आणि त्यांची मार्गदर्शनपर भाषणे तरुण विद्यार्थ्यांसाठी पर्वणीच असते. विद्यार्थ्यांसाठी आपल्या शैक्षणिक उपलब्धतेबद्दल अभिमानाने वावरण्याचा हा दिवस असतो. अहवालात समाविष्ट कुलपती मा. श्री. रमेश बैस ह्यांचे दीक्षांत भाषण व मा. कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी ह्यांचे प्रास्ताविक व स्वागतपर भाषण वाचकांसाठी उपयुक्त होतील.

प्रकरण ३– विद्यापीठाचे शैक्षणिक विभाग आणि संचालित महाविद्यालये : विद्यापीठाचा शैक्षणिक भार उचलणे आणि विद्यापीठाचे ध्येय व उद्दिष्टे गाठण्यासाठी विद्यापीठातील सर्व विभाग मोलाची भूमिका बजावित असतात. येथे कार्यरत विद्यार्थी, संशोधक विद्यार्थी व प्राध्यापकाच्या अध्ययन, अध्यापन व संशोधन कार्यामुळे विद्यापीठाचा नाव–लौकिक वाढतो. विविध विभागांनी वर्षभर राबविलेल्या विविध कार्यक्रमाबाबतची यथायोग्य माहिती तिसऱ्या प्रकरणाच्या माध्यमातून वाचकांना होऊ शकेल.

प्रकरण ४– विद्यापीठाचे इतर विभाग : ग्रंथालय, वसतिगृहे, उद्यान इत्यादिनी आवश्यक पायाभूत सोयी उपलब्ध करून विद्यापीठात शैक्षणिक वातावरण निर्माण करण्यात मोलाची कामगिरी बजाविली आहे. आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागाने अनेक समाजभिमुख उपक्रम राबविले आहेत. अनेक अल्पकालीन अभ्यासक्रम या विभागामार्फत राबविण्यात येतात. उद्यमशीलता आणि कौशल्यविकास यावर नव्या शैक्षणिक धोरणाचा व शासनाचा भर आहे. त्याअनुषंगाने विभागाने अनेक अभ्यासक्रमाची आखणी करून संलग्नित महाविद्यालयाच्या मदतीने अभ्यासक्रम राबविले आहेत. प्रकरण चारच्या माध्यमातून या विविध विभागाच्या योगदान व यशोगाथा वाचकांना प्राप्त होऊ शकेल.

प्रकरण ५– विद्यापीठ विकास योजना : विद्यापीठातील संशोधन कार्याला पुरक असा हा विभाग आहे. प्राध्यापकांनी राबविलेल्या विविध प्रकल्पांचा संपूर्ण लेखा–जोखा हा विभाग ठेवतो. संशोधन प्रकल्पाशिवाय चर्चासत्रे, परिषदा ह्यामध्ये सहभागी होणाऱ्या प्राध्यापकांना वित्तीय सहायता प्राप्त करून देणे किंवा विविध संस्थांशी समन्वय साधून संशोधन कार्य सुकर करण्यात या विभागाचा महत्त्वपूर्ण योगदान आहे. ह्यामुळे विद्यापीठाची पत वाढविण्यास मदतच होते. विद्यापीठात सादर झालेले शोधप्रबंध ग्रंथरुपात प्रकाशित करण्यासाठी संशोधकांना अनुदानदेखील

देण्यात येते. पाचव्या प्रकरणातून या संदर्भातील माहितीचा आढावा घेण्यात आला आहे.

प्रकरण ६–विद्यापीठातील स्पृहणीय उपक्रम : विद्यापीठाला सातत्याने समाजातील दानदात्यांनी भरभरून आर्थिक मदत करून व्याख्यानमालांचे आयोजन करण्यास प्रोत्साहित केले आहे. या व्याख्यानांचा लाभ शिक्षक आणि विद्यार्थ्यांव्यतिरिक्त समाजातील विविध घटकांना होतो. विद्यार्थ्यांना या व्याख्यानमालेच्या माध्यमातून नवनवीन माहिती मिळावी व विविध विषयांवर त्यांना चिंतन मंथन करता यावे, याकरीता विद्यापीठाद्वारे असे अनेक कार्यक्रमांचे यशस्वी आयोजन केले आहे. याबाबतची सविस्तर माहिती वाचकांना प्रकरण सहाच्या माध्यमातून होऊ शकेल.

प्रकरण ७ – विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये : शंभरी वर्षात पदार्पण केलेल्या विद्यापीठात संलग्नित महाविद्यालयांची संख्या सुद्धा अफाट आहे. या संलग्नित महाविद्यालयाच्या उपलब्धतेमुळेही विद्यापीठाचा दर्जा उंचावत असतो. त्यामुळे या महाविद्यालयांनी हाती घेतलेल्या उपक्रमांची माहिती वाचकांपर्यंत संक्षिप्त स्वरुपात का होईना पोहचावी म्हणून प्रकरण सातवे तसेच परिशिष्टे, सांख्यिकी सारण्या माहिती स्वरूपात देण्यात आलेल्या आहेत.

विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा, मानवविज्ञान विद्याशाखा आणि आंतर–विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा अशा वेगवेगळ्या विद्याशाखांतील विविध विषयांच्या लाखो विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेणे, सर्वांच्या सहकार्याने व सामंजस्याने ते यशस्वीपणे पेलण्यात विद्यापीठाला यश आले आहे. यासाठी विद्यापीठातील पदाधिकारी व प्राध्यापक यांनी अविरत प्रयत्न केले आहेत.

विद्यापीठाने राबविलेल्या अनेक उपक्रमांचा पुरावा छायाचित्रांच्या माध्यमातून प्राप्त होऊ शकेल दीर्घकाळपर्यंत हा विद्यापीठाचा चित्ररूप ठेवाच असतो. दीक्षांत समारंभ, वर्धापन दिन, समाजप्रबोधन व्याख्यानमाला यासोबतच विविध कार्यशाळा, चर्चासत्रे, सामंजस्य करार आदी ऐतिहासिक क्षणांना टिपणारी छायाचित्रे प्रस्तुत अहवालात प्रदर्शित करण्यात आली आहे. या सर्व अद्यावत माहितीचा उपयोग आपल्या विद्यार्थ्यांपासून ते पालकांपर्यंत सर्वच विद्यापीठ घटकांना होत असतो.

प्रस्तुत अहवालाचा एक विशेष म्हणजे ह्यात विद्यापीठाचा ११० वा दीक्षांत समारंभातील मान्यवर पाहुण्यांची भाषणे, ह्या समारंभाची क्षणचित्रे आणि अन्य माहिती संकलीत करण्यात आली आहे. त्यातून आपल्याला आपल्या विद्यापीठाची गौरवमयी व समृद्ध परंपरा अधिक युगानुकुल आणि अधिक सुदृढ झालेली दिसते.

हा अहवाल तयार करण्याकरिता अंर्तगत गुणवत्ता हमी कक्ष (IQAC) विभागाचे संचालक डॉ. स्मिता आचार्य, सांख्यिकी शाखेतील त्यांचे सहकारी श्री. सुनील इंगळे, सौ. विद्या फटिंग यांनी एकवटून व अतिशय झटून अहवालकार्य पूर्णत्वास नेले. तसेच विद्यापीठाचे सर्व पदव्युत्तर विभाग, प्रशासकीय विभाग, संलग्नित महाविद्यालये, वार्षिक अहवाल समितीचे सर्व सन्माननीय सदस्य, संपादक मंडळ, विद्यापीठाचे प्रकाशन अधिकारी (अति. कार्य) श्री. प्रवीण गोतमारे तसेच त्यांचे सहकारी श्री. प्रेमानंद खरड, श्री. सुभाष मालापुरे, श्री. धर्मपाल धाबर्डे ह्यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे. अत्यंत देखणे व अर्थपूर्ण मुखपृष्ठ साकारणारे कलावंत श्री. अभय कोट्टेवार या सर्व कर्मचाऱ्यांचे विशेष आभार मानणे मी माझे कर्तव्य समजतो.

अहवालाच्या स्वरूपात सहजता व नेटकेपण आणण्याचे कसब अनुभवी संपादक डॉ. शैलेंद्र लेंडे यांनी आत्मसात केल्याने विद्यापीठाच्या वार्षिक अहवालाचे संपादनकार्य सुकर झाले. त्यांच्याप्रती मी कृतज्ञता व्यक्त करतो.

तसेच सन्माननीय कुलगुरू, प्र–कुलगुरू आणि कुलसचिव ह्यांचे मौलिक मार्गदर्शन लाभले आहे. त्याकरिता त्या सर्वाप्रती कृतज्ञता व्यक्त करणे हे मी माझे कर्तव्य समजतो.

प्रस्तुत अहवालाच्या माहिती संकलनात आणि संपादनात सहकार्य करणाऱ्या अहवाल समितीतील सर्व सदस्यांचे मी साभार अभिनंदन करतो आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या ह्या २०२२–२०२३ च्या अहवाल पुस्तिकेचे सर्व विद्यापीठक्षेत्रीय घटक उत्साहाने स्वागत करतील असा विश्वास व्यक्त करतो.

डॉ. शामराव कोरेटी

अध्यक्ष
वार्षिक अहवाल समिती



कृतज्ञता

कृतज्ञता

अहवालकालावधीत पुढील दानशूर व्यक्ती आणि संस्थांनी विद्यापीठाला देणग्या दिल्या आहेत. विद्यापीठ या सर्वांप्रती कृतज्ञ आहे.

- मेजर यश सतिश शर्मा, नागपूर यांचेकडून **"डॉ. सतिश जे. शर्मा सुवर्णपदक"** निधी स्थापन करण्याकरिता रु. ३,००,०००/— ची देणगी विद्यापीठाला प्राप्त झाली.
- श्री. भानु राजगोपालन, नागपूर यांचेकडून **"डॉ. एस. राजगोपालन सुवर्णपदक"** निधी स्थापन करण्याकरिता रु. ३,००,०००/— ची देणगी विद्यापीठाला प्राप्त झाली.

•••

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ : एक दृष्टिक्षेप


राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ कार्यक्षेत्र
Jurisdiction of Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University
नागपूर–वर्धा–भंडारा व गोंदिया जिल्हा
Nagpur, Wardha, Bhandara & Gondia District
2022-2023
N

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ कार्यक्षेत्र
Jurisdiction of Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University

भुसावळ, जळगांव जिल्हा (Bhusawal, Jalgaon District)

2022-2023



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ : एक दृष्टिक्षेप

४ ऑगस्ट, १९२३ रोजी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाची स्थापना झाली. तेव्हापासून मोठ्या निष्ठेने विद्यापीठ उच्च शिक्षण प्रसाराचे कार्य करीत आहे. आपले विद्यापीठ मध्य भारतातील सर्वात जुने विद्यापीठ आहे. केवळ कला, विज्ञान, विधी आणि शिक्षण या चार विद्याशाखा, नागपूर, जबलपूर आणि अमरावती येथील सहा महाविद्यालये व त्यात शिकणारे ९१७ विद्यार्थी यांनी सुरू झालेल्या या विद्यापीठाचा आजचा विशाल विस्तार सर्वांना स्तिमित करणारा आहे.

या विद्यापीठातून सागर, जबलपूर, अमरावती, गडचिरोली इत्यादी विद्यापीठे वेगळी झाल्यावर त्याचा भौगोलिक विस्तार कमी झाला असला तरी पूर्व विदर्भातील या विद्यापीठात ५११ संलग्नित महाविद्यालये, विद्यापीठाचे ४४ पदव्युत्तर शैक्षणिक विभाग आणि ३ संचालित महाविद्यालये यामधून दरवर्षी जवळपास ४ लक्ष विद्यार्थी आजमितीला शिक्षण घेत आहेत. आपल्या विद्यापीठात जवळजवळ सर्व प्रकारचे व्यावसायिक व पारंपरिक शिक्षण माफक शैक्षणिक शुल्क आकारून प्रदान केले जाते.

आपल्या विद्यापीठाला उच्च दर्जाची शैक्षणिक परंपरा ज्याप्रमाणे प्राप्त झाली आहे, त्याप्रमाणे राष्ट्रीय व सामाजिक कार्याचीही मौलिक परंपरा लाभली आहे. राष्ट्रीय चळवळीच्या मुख्य प्रवाहात विद्यापीठाने निरंतर योगदान दिले आहे. १९३०—३२ च्या दरम्यान असहकारिता आंदोलन सुरू असताना विद्यापीठाचे विधी महाविद्यालय जवळजवळ दोन महिने बंद होते. 'वंदे मातरम्' चळवळीत भाग घेण्याची शिक्षा म्हणून काढून टाकलेल्या उस्मानिया विद्यापीठाच्या जवळजवळ १५० विद्यार्थ्यांना विशेष वर्गात दाखल करून त्यांचे शैक्षणिक नुकसान आपल्या विद्यापीठाने टाळले होते. स्वातंत्र्यपूर्व काळात दीक्षांत समारंभात निर्भयपणे आपल्या तत्कालीन राष्ट्रीय नेत्यांना दीक्षांत समारंभाची भाषणे देण्याकरिता विद्यापीठाने सन्मानपूर्वक निमंत्रित केले होते.

आपल्या विद्यापीठाचे मुख्य ग्रंथालय व विद्यापीठ परिसरातील ग्रंथालय ह्यांचे पूर्णपणे संगणकीकरण झालेले असून विद्यापीठ परिसरातील ग्रंथालयात, सुसज्ज अशी आंतरजाल प्रयोगशाळा तयार करण्यात आली आहे. तिच्यात १०० संगणक असून विद्यार्थ्यांना आवश्यक त्या ग्रंथालय सेवा या प्रयोगशाळेद्वारा प्राप्त होऊ शकतात. विद्यापीठाच्या ग्रंथालयात आजमितीला ४,२४,२५७ ग्रंथ, १४,३१३ हस्तलिखिते, १६,५४९ पीएच. डी. चे शोधप्रबंध, ११९३ ई—बुक व ३६,८३३ नियतकालिकांचे बांधिव खंड आहेत.

प्रत्येक ज्ञानशाखेतील शिक्षणाची ध्येये आणि उद्दिष्टे निश्चित करून अध्ययनाचा अनुभव देणारे आदर्श अभ्यासक्रम विद्यापीठाने तयार केले आहेत. तसेच विद्यापीठाच्या व्यापक विकासासाठी काही नव्या विभागांची, केंद्रांची आणि अभ्यासक्रमांची निर्मिती विद्यापीठाने केली आहे. सत्र २०११—१२ पासून मॉलिक्युलर बॉयोलॉजी ॲण्ड जेनेटिक इंजिनिअरिंग, वाणिज्य, पदव्युत्तर बुद्धिस्ट स्टडीज आणि पदव्युत्तर जनसंवाद हे विभाग, २०१२ — २०१३ पासून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विचारधारा व उर्दू विभाग हे अभ्यासक्रम सुरू केले आहेत. अगदी अलीकडे समाजकार्य आणि भूगोल या विषयांचे पदव्युत्तर अभ्यासक्रम विद्यापीठात सुरू करण्यात आले आहेत. तसेच महाराष्ट्र शासनाच्या आर्थिक मदतीतून डिसेंबर, २०१९ पासून विद्यापीठात भगवान श्रीचक्रधर स्वामी अध्यासन सुरू झाले आहे. विदर्भ हीच महानुभाव पंथाची जन्मभूमी आहे. या पंथाची ग्रंथनिर्मिती याच प्रदेशात झाली. तसेच डॉ. वि. भि. कोलते आणि अन्य महानुभव पंथाच्या साहित्याचे संशोधक याच भूमीत कार्यरत होते. म्हणून पुढील संशोधनाच्या दृष्टीने भगवान श्रीचक्रधर स्वामी अध्यासन कार्यप्रवण होईल, अशी आम्हाला आशा आहे.

काही वर्षामध्ये रोबोटिक टेक्नॉलॉजी ह्या अभिनव अभ्यासक्रमाला सुरुवात झाली. प्रसिद्ध सिनेनट श्री. विवेक ओबेराय यांच्या उदात्त स्वयंप्रेरित आर्थिक मदतीतून सुरू करण्यात आलेल्या ह्या अभ्यासक्रमाने विज्ञान—तंत्रज्ञानाचे एक नवे दालन येथील विद्यार्थ्यांकरिता उपलब्ध झालेले आहे. त्याचप्रमाणे विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांमध्ये 'फोरेन्सिक सायन्स' हा पदवी अभ्यासक्रम सुरू केला आहे. भविष्यात पाच वर्षांच्या कालावधीचा इंटिग्रेटेड, इनोव्हेटीव, इंटर—डिसिप्लिनरी अभ्यासक्रम विथ चॉइस बेस्ड क्रेडिट सिस्टम सुरू करण्याचा मानस आहे. नागपूरजवळच उभारण्यात येत असलेल्या मिहान प्रकल्पाकरिता नवीन अभ्यासक्रमाचा आराखडा तयार करण्यात आला आहे. नवीन अभ्यासक्रमाचे अध्ययन केंद्र, विदेशी विद्यापीठाच्या सहकार्याने डुएल डिग्री, उद्योगसंस्थांच्या आणि तज्ज्ञांच्या मदतीने विशिष्ट विषयांचे अभ्यासक्रम, प्रशिक्षण आणि संशोधन सुरू करण्याचा आमचा प्रयत्न आहे. संशोधनातून ज्ञानाची निर्मिती व ज्ञानामधून विकास व समृद्धी साध्य करण्यासाठी, संशोधन व उद्योजकता यांची सांगड घालणे आवश्यक आहे. त्याकरिता टेक्नॉलॉजी पार्क फॉर टेक्नॉलॉजी डेव्हलपमेंट ॲण्ड ट्रान्सफर इनोव्हेशन ॲण्ड इन्क्युबेशन सेंटर, ह्युमन रिसोर्स ट्रेनिंग इत्यादी प्रकल्प

उद्योजकांच्या सहकार्याने राबविण्याचा आणि नावीन्यपूर्ण असा एम. टेक पीएच. डी. प्रोग्राम सुरू करून विद्यार्थ्यांना विशिष्ट क्षेत्रात आधुनिक संशोधन करून उत्तम करिअर करण्याची संधी उपलब्ध करून देण्याचा विद्यापीठाचा मानस आहे.

विद्यापीठाने जागतिक स्तरावरील आव्हाने आणि संधी यांची सांगड घालीत आवश्यकतेनुसार आपली धोरणे वेळोवेळी आखली आहेत. या धोरणामधुन विद्यार्थी सक्षम, कुशल, कर्तव्यनिष्ठ असे नागरिक बनू शकतील. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाबरोबरच संस्कार, नीतिमूल्ये, वैचारिक समृद्धता, देशाभिमुखता, स्वाभिमान, आत्मविश्वास इत्यादी गुणांची वृद्धी करण्यावर विशेष भर देण्यात येत आहे. याकरिता ज्ञानसंवर्धन करणारी सत्र पद्धती विद्यापीठात दशकभरापूर्वी सुरू करण्यात आली. त्याअनुषंगाने सर्व अभ्यासक्रमांचे नूतनीकरण करून ते अद्ययावत करण्यात आले असून त्यांची अंमलबजावणी आणि मूल्यमापन क्रेडिट पद्धतीने करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना आपल्या आवडीच्या अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेण्याकरिता शैक्षणिक सुविधा मागील वर्षापासून उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. आता नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या रूपातून विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमांच्या व कौशल्य विकासाच्या संबंधात प्रचंड मोठ्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. अलीकडेच मागील वर्षी विद्यापीठ परिसरात 'सेंटर फॉर डिफेंस स्टडीज' या नावीन्यपूर्ण केंद्राची स्थापना केली गेली. या केंद्राच्या रूपातून विद्यार्थ्यांकरिता देशाच्या सुरक्षाविषयक अभ्यासाचे एक नवीन दालन खुले केले गेले आहे.

मागील तीन वर्षात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात बरेच नवीन उपक्रम पूर्ण झाले असून या उपक्रमांमुळे विद्यापीठ विशेष गतिमान झाले आहे. विद्यापीठाला 'नॅक' द्वारे 'ए' दर्जाचे नामांकन प्राप्त झाल्यामुळे विद्यापीठातील विविध कामांना मूर्त रूप येत चालले आहे. विद्यापीठाने 'इनोव्हेशन आणि इंक्युबेशन सेंटर' सुरू करून त्याआधारे अल्पावधीत उच्च वाढीचा दर प्राप्त केला आहे. 'केंद्रीय ट्रेनिंग अॅण्ड प्लेसमेंट सेल' सुरू करण्यात आले आहे आणि त्या माध्यमातून विद्यापीठात तसेच विद्यापीठांशी संलग्नित महाविद्यालयात अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांना उच्चस्तरीय प्रशिक्षणाची व रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. या 'केंद्रीय ट्रेनिंग अॅण्ड प्लेसमेंट सेल' च्या द्वारे सर्व अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना उच्चस्तरीय प्रशिक्षणाची व रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. या 'केंद्रीय ट्रेनिंग अॅण्ड प्लेसमेंट सेल' च्या द्वारे सर्व अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना इंटर्नशिप, ट्रेनिंग अॅण्ड प्लेसमेंट असिस्टंटची सोय झालेली आहे. यामधून विविध विद्यार्थ्यांना नोकरी, प्रशिक्षण व इंटर्नशिप मोठ्या प्रमाणात मिळाली आहे. कौशल्यपूर्ण अभ्यासक्रम सुरू करण्याच्या उद्देशाने 'आजीवन अध्ययन केंद्र' प्रभावी करण्यात आले आहे. या आजीवन अध्ययन केंद्राच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना स्किल सर्टिफिकेट विथ क्रेडिटची संधी प्राप्त झाली आहे.

विद्यापीठातील शैक्षणिक विभाग स्वायत्त झाले आहेत. विभागांना शैक्षणिक स्वायत्तता प्राप्त झाल्यामुळे अभ्यासक्रमांना अधिक गुणवत्तापूर्ण करण्याची संधी विभागांना प्राप्त झाली आहे. विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागातील विद्यार्थ्यांना या स्वायत्ततेचा खूप फायदा होणार आहे. 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण – २०२०' लागू करण्याच्या दृष्टीतून विद्यापीठाने अतिशय तत्परतेने पावले उचलली आहेत आणि या नवीन शैक्षणिक धोरणाची तत्परतेने अंमलबजावणी केली आहे. नवीन शैक्षणिक धोरणातील बहुतेक अकादमीक घटक आपल्या विद्यापीठाने अभ्यासक्रमात लागू केले आहेत. 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण – २०२०' मधील बरेच प्रस्ताव सर्वप्रथम लागू करणारे 'महाराष्ट्रातील अग्रणी विद्यापीठ' अशी आपल्या विद्यापीठाची सर्वत्र ख्याती झाली आहे. आपल्या विद्यापीठातील 'लक्ष्मीनारायण तंत्रज्ञान संस्थेला' (एल. आय. टी.) 'नॅक' ने मूल्यांकन करून 'ए' प्लस' दर्जा प्रदान केला आहे. ही आपल्याकरिता अतिशय अभिमानाची बाब आहे. महाराष्ट्र शासनाने या एल. आय. टी. ला स्वतंत्र विद्यापीठाचा दर्जा बहाल केला असून त्याआधारे एल. आय. टी. हे स्वतंत्र विद्यापीठ निर्माण झाले आहे. अलीकडच्या काळात विद्यार्थ्यांसाठी 'कमवा व शिका योजना', 'नावीण्यपूर्ण स्वरूपाची विद्यापीठ विमा योजना,' 'स्पर्धा –परीक्षांसाठी शिकवणी वर्ग', 'उत्कृष्ट खेळाडूंना महाआर्थिक सहाय योजना' आणि अन्य शिष्यवृत्ती योजना इत्यादी विविधांशी योजनांना विद्यापीठाने विशेष गती दिली आहे. त्या योगाने विद्यापीठाची सामाजिक बांधीलकी अधिक ठसठशीत झाली आहे.

विद्यापीठाला 'स्पोर्ट अथॉरिटी ऑफ इंडिया' तर्फे चार खेळांचे प्रशिक्षण केंद्र म्हणून मान्यता देण्यात आली आहे. ही आपल्या विद्यापीठातील मोठी गौरवाची बाब ठरली आहे. महाराष्ट्र शासनाने ४४ कोटींचे अनुदान जागतिक दर्जाचे 'मल्टीस्पोर्ट कॉम्प्लेक्स' करिता मंजूर केले आहेत. शताब्दी महोत्सवानिमित्त महाराष्ट्र शासनाने आपल्या विद्यापीठाकरिता शंभर कोटींचे विशेष अनुदान मंजूर केले आहे.

विद्यापीठातील प्राध्यापक हे विविध ज्ञानशाखातील मूलभूत प्रश्नांवर योग्य उपाययोजना सुचविण्याकरिता तात्त्विक आणि तर्कशुद्ध संशोधन राबवीत असून त्याकरिता विविध संस्थांमार्फत आर्थिक अनुदान प्राप्त झाले आहे. यामध्ये स्पेशल असिस्टंन्स प्रोग्राम, रीसर्च प्रोजेक्ट, फिस्ट प्रोग्राम इत्यादींकरिता

भरीव स्वरूपाचे अनुदान प्राप्त झाले आहे. विद्यार्थ्यांना या प्रकल्पांतर्गत संशोधन शिष्यवृत्ती प्राप्त होऊन उच्च संशोधन क्षेत्रात संधी मिळत चालली आहे. विद्यापीठ शिक्षण आणि संशोधनासंबंधी मूलभूत सोयी उपलब्ध करून देण्यासाठी विशेष योजना आखत आहे. त्याकरिता पुढील १० वर्षांतील उद्दिष्टे निश्चित करण्यात येत असून ते साध्य करण्याकरिता व्हिजन डॉक्युमेन्ट आणि मास्टर प्लॅन तयार करण्यात आला आहे. यामध्ये पाच वर्षीय एकात्मिक पदव्युत्तर अभ्यासक्रम, स्कूल ऑफ इंजिनिअरिंग, सायन्सेस ॲन्ड टेक्नॉलॉजी, एकात्मिक आचार्य पदवी इत्यादींचा समावेश करण्यात येत आहे.

शासनाच्या राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियाना (रुसा) अंतर्गत विद्यापीठाला भरीव अनुदान प्राप्त झाले. त्या अनुदानामधून विद्यापीठाच्या विविध विभागांमध्ये मोठ्या प्रमाणात विकासात्मक कामे व संशोधनात्मक कामे सुरू आहेत. उपकरण खरेदी, ग्रंथखरेदी, वर्गखोल्यांचे नूतनीकरण इत्यादी विकासात्मक कामांमुळे व संशोधन कार्यामुळे आमचे विविध विभाग कात टाकून अत्याधुनिक बनत चालले आहेत. ही विद्यापीठाकरिता गौरवाची बाब आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शतकोत्तर रौप्य महोत्सवी जयंती निमित्ताने विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयातील प्रांगणात अभिनव स्वरूपाच्या 'संविधान पार्क' निर्मितीची प्रक्रिया सुरू आहे. त्याअंतर्गत विधी महाविद्यालयाच्या प्रांगणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा देखणा असा पुतळा बसविण्यात आला आहे.

संशोधनातील ज्ञानाच्या संधी आणि विकास साधण्याकरिता संशोधन व उद्योजकता यांची सांगड घालणे आवश्यक आहे, त्याकरिता विद्यापीठामध्ये टेक्नॉलॉजी पार्क अंतर्गत विविध प्रकल्प राबविण्यात येत आहेत. विद्यापीठामध्ये उपलब्ध असलेले शैक्षणिक तंत्रज्ञान व संशोधनाच्या सोयी उद्योजकांना आवश्यकतेनुसार उपलब्ध करून देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे प्रशिक्षण, रोजगार, संशोधन आणि अध्यापन इत्यादी बाबतीत औद्योगिक क्षेत्रांसोबतचे सहकार्य प्रभावीपणे करण्यात येत असून विद्यार्थ्यांना या क्षेत्रात भविष्यात संधी उपलब्ध करून देण्याचा विद्यापीठाचा मानस आहे. शैक्षणिक अध्यापन आणि संशोधनामध्ये सतत गुणात्मक उंची वाढविण्याकरिता विद्याविषयक आणि प्रशासकीय अंकेक्षण दरवर्षी विद्यापीठामार्फत करण्यात येत असून त्यामध्ये आढळून आलेल्या त्रुटी दूर करण्याचा सातत्याने प्रयत्न सुरू आहे.

दोन वर्षापूर्वी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या राष्ट्रीय मूल्यांकन आणि प्रत्यायन परिषदेमार्फत आमंत्रित समितीने विद्यापीठाला भेट दिली. या समितीने 'नॅक' चे पूनर्मूल्यांकन करून विद्यापीठाला 'अ' दर्जा प्रदान केला आहे. त्या अनुषंगाने विद्यापीठाने अद्यावत माहिती तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे धोरण अवलंबिले आहे. त्यामध्ये विद्यार्थ्यांचे प्रवेश, त्यांचे नामांकन, परीक्षा आवेदनपत्र आणि परीक्षा ओळखपत्र, पदवी प्रमाणपत्र इत्यादी बाबी ऑनलाईन पद्धतीने कार्यान्वित केले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे कार्य सुलभ आणि गतिमान झाले आहे. त्याचप्रमाणे महाविद्यालयांचे प्रथम संलग्निकरण, निरंतर संलग्निकरण, नूतनीकरण, नवीन अभ्यासक्रम, वाढीव तुकड्या, वाढीव विद्यार्थी संख्या इत्यादी घटकांसबंधीचे कार्य देखील माहिती तंत्रज्ञानाच्या माध्यमातून कार्यान्वित करण्यात येत आहे.

वर्ष २०२३ हे आपल्या विद्यापीठाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वपूर्ण असे मानावे लागते. हे वर्ष विद्यापीठाचे शताब्दी वर्ष होय. विद्यादानाची परंपरा सदोदित चालविणाऱ्या आपल्या विद्यापीठाने दिनांक ०४ ऑगस्ट, २०२२ ला शंभराव्या वर्षात पदार्पण केले. तेव्हापासून आजतागायत विद्यापीठाचे शताब्दी पर्व मोठ्या उत्साहात व देखण्या स्वरुपात साजरे केले गेले. दिनांक ४ ऑगस्ट, २०२३ रोजी विद्यापीठाने शंभर वर्ष पूर्ण केली. विद्यापीठाच्या शताब्दी पर्वानिमित्त दि. ४ ऑगस्ट, २०२२ पासून विद्यापीठात व विद्यापीठाच्या परिक्षेत्रातील महाविद्यालयात विविधांगी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. दिनांक ४ ऑगस्ट, २०२२ रोजी आयोजित 'शताब्दी महोत्सव' उद्घाटन समारंभात मा. राज्यपाल श्री. भगत सिंह कोश्यारी व जागतिक कीर्तीचे शास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर उपस्थित होते. विद्यापीठाच्या शताब्दी महोत्सवांतर्गत विविध प्रकल्प, परिषदा व उपक्रम यशस्वीपणे राबविले गेले. दि. ४ ऑगस्ट, २०२३ ला विद्यापीठाच्या शताब्दी वर्षाची पूर्ती झाली. या शताब्दी महोत्सवानिमित्त दि. ४ ऑगस्ट, २०२३ रोजी आयोजित कार्यक्रमात भारताचे माननीय उपराष्ट्रपती श्री. जगदीप धनखड, मा. राज्यपाल श्री. रमेश बैस, केंद्रीय मंत्री श्री. नितीन गडकरी व उपमुखमंत्री श्री. देवेन्द्र फडणवीस उपस्थित होते.

विद्यापीठाच्या शताब्दी महोत्सवी वर्षानिमित्त मागील एक वर्षापासून घेण्यात आलेले नाविन्यपूर्ण कार्यक्रम व उपक्रम समाजमनावर ठसा उमटविणारे ठरले आहेत. विद्यापीठाच्या शताब्दी वर्षात विविध कंपन्यांशी सामंजस्य करार करण्यात आले. वैद्यकीय क्षेत्रांतील नोकऱ्यांना नजरेसमोर ठेऊन फोर्ड कंपनीसोबत करार करण्यात आला. 'सेफ' चे प्रशिक्षण सुरू करण्यात आले. विविध कंपन्यांशी व संस्थांशी करण्यात आलेले सामंजस्य करार विद्यार्थ्यांच्या रोजगारासाठी, प्रशिक्षणासाठी, कौशल्यविकासासाठी व व्यवसायासाठी महत्त्वपूर्ण ठरणारे आहेत. विद्यापीठाने शताब्दी वर्षात Reaching to Unreached हा महत्त्वाकांक्षी उद्देश बाळगून

विविध उपक्रम राबविले आहेत. याअंतर्गत विद्यापीठ परिक्षेत्रातील ग्रामीण क्षेत्राशी व आदिवासी भागाशी नाळ जोडण्याचा प्रयत्न विद्यापीठ सातत्याने करत आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शताब्दी महोत्सव व्याख्यानमालांच्या अंतर्गत विद्यापीठात विविध विषयांवर व्याख्याने आयोजित करण्यात आली आहेत व त्याअंतर्गत समाजजागरण करण्यात आले आहे.

विद्यापीठाच्या शताब्दी वर्षात दिनांक ३ ते ७ जानेवारी २०२३ या कालावधीत '१०८ वी इंडियन सायन्स काँग्रेस' यशस्वीपणे आयोजित करण्यात आली. आपल्या विद्यापीठाने इंडियन सायन्स काँग्रेसचे केलेले आयोजन ही विद्यापीठाच्या इतिहासातील अविस्मरणीय घटना मानावी लागते. या काँग्रेसचे उद्घाटन देशाचे पंतप्रधान मा. श्री. नरेंद्र मोदी यांनी आभासी पद्धतीने उपस्थित राहून केले. या इंडियन सायन्स काँग्रेसच्या उद्घाटन समारंभात महाराष्ट्राचे राज्यपाल व विद्यापीठांचे कुलपती माननीय श्री. भगत सिंह कोश्यारी, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री माननीय श्री. एकनाथ शिंदे, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री मा. देवेन्द्र फडणवीस, केंद्रीय मंत्री मा. श्री. जितेन्द्र सिंग, केंद्रीय मंत्री मा. नितीन गडकरी, आयएससीए चे कार्यकारी अध्यक्ष डॉ. विजयालक्ष्मी सक्सेना हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. या इंडियन सायन्स काँग्रेसच्या अंतर्गत विज्ञानविषयक विविध प्रकल्प विज्ञानाचे नवे शोध, विज्ञानविषयक मुलाखती, विज्ञानविषयक चर्चा, वैज्ञानिकांचे मार्गदर्शन, विज्ञान प्रदर्शनी, विज्ञानविषयक नवीन उपक्रम सादर केले. या परिषदेत दहा हजारांपेक्षा जास्त प्रतिनिधी उपस्थित होते. इंडियन सायन्सच्या अंतर्गत 'विमेन्स सायन्स काँग्रेस', 'फार्मर्स सायन्स काँग्रेस', 'ट्रायबल सायन्स काँग्रेस' इत्यादी नाविन्यपूर्ण उपविषयावरील परिषदादेखील यशस्वीपणे पार पाडल्या गेल्या. या इंडियन सायन्स काँग्रेसमधील विज्ञान प्रदर्शनी विशेष लोकप्रिय ठरल्या. इंडियन सायन्स काँग्रेसचा समारोप डॉ. विजयालक्ष्मी सक्सेना अध्यक्षतेखाली व नोबल पुरस्कार विजेत्या प्रोफेसर डॉक्टर अदा योनातच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. विद्यापीठाने आयोजित केलेल्या या इंडियन सायन्स काँग्रेसचा लाभ हजारो विद्यार्थ्यांनी व शेकडो अभ्यासकांनी घेतला.

दिनांक २० ते २२ जानेवारी, २०२३ या कालावधीत विद्यापीठात '७२ वी इंडियन फार्मास्युटिकल काँग्रेस' आयोजित करण्यात आली. या इंडियन फार्मास्युटिकल काँग्रेसचे उद्घाटन केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी यांच्या हस्ते झाले. या परिषदेत दहा हजारांहून अधिक प्रतिनिधी उपस्थित होते. या परिषदेमध्ये सीईओ कॉन्क्लेव्ह यशस्वीपणे आयोजित करण्यात आले. या परिषदेचा समारोप महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्या हस्ते झाला.या परिषदेत औषधीशास्त्रविषयक संशोधन आणि तत्संबंधित जनजागृती सर्वांकरिता अतिशय लाभकारक ठरलं.

शिक्षणाचा प्रसार करताना विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्याकरिता राष्ट्रीय सेवा योजना, विद्यार्थी कल्याण योजना, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, स्वयंरोजगार माहिती, क्रीडा प्रशिक्षण इत्यादी माध्यमांतून विद्यापीठात भरीवपणे कार्य करण्यात येत आहे. मागील तीन वर्षे 'कोव्हीड' या साथीच्या रोगाने संपूर्ण जगाला ग्रासले होते. त्यावेळी विद्यापीठाच्या रासेयो व नागपूर महानगर पालीकेने अभूतपूर्व असे सेवाकार्य केले. विद्यापीठाचे विद्यार्थी विविध क्षेत्रांमध्ये नेत्रदीपक यश प्राप्त करीत आहेत. विद्यापीठीय अभ्यासक्रमांबरोबरच विद्यापीठातील विद्यार्थी विकास विभाग, राष्ट्रीय सेवा योजना, विद्यापीठाचा क्रीडा विभाग यांचेकडून होणारे कार्य प्रशंसनीय स्वरूपाचे आहे. राष्ट्रीय पातळीवरील आंतर–विद्यापीठ क्रीडा स्पर्धातील, राज्यस्तरीय आंतर–विद्यापीठ क्रीडा स्पर्धातील तसेच क्रीडा महोत्सवांतील विविध खेळांत विद्यापीठाच्या चमूंनी व खेळाडूंनी सामूहिक व वैयक्तिक पातळीवर नेत्रदीपक यश प्राप्त केले आहे. उत्तर प्रदेश राज्यात झालेल्या राष्ट्रीय पातळीवर 'खेलो इंडिया आंतर–विद्यापीठ क्रीडा स्पर्धामध्ये विद्यापीठातील अनेक क्रीडापटूंनी वैयक्तिक तसेच सामूहिक पातळीवर संस्मरणीय कामगिरी बजावत विविध पारितोषिके प्राप्त केली. या खेलो इंडिया आंतर–विद्यापीठ क्रीडा स्पर्धेमधील योगासन, रेसलिंग, फेंसिंग, बॉक्सिंग, एथलेटिक्स इत्यादी खेळांत विद्यापीठातील विद्यार्थ्यांची कामगिरी उल्लेखनीय राहिली. रोहतक, चेन्नई, चंदीगड, जयपूर, करनाल इत्यादी ठिकाणच्या राष्ट्रीय पातळीवरील 'ऑल इंडिया आंतर–विद्यापीठ स्पर्धेत' आपल्या विद्यापीठाच्या खेळाडूंनी वैयक्तिक तसेच सामूहिक स्वरूपात मोठ्या प्रमाणात यश प्राप्त केले. साउथ झोन आणि वेस्ट झोन आंतर–विद्यापीठ स्पर्धांमध्ये देखील आपल्या विद्यापीठातील विद्यार्थ्यांची कामगिरी लक्षणीय स्वरूपाची राहिली. आंतर–विद्यापीठ क्रिडा महोत्सवामध्ये आपल्या विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी चांगल्या प्रकारे सुयश प्राप्त केले. विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाने विद्यार्थ्यांच्या कल्याणाकरिता विविध प्रकारच्या योजना प्रभावीपणे राबविल्या. विद्यार्थी विकास विभागाची 'कमवा व शिका योजना' ही गरजू विद्यार्थ्यांसाठी मोठी लाभकारक ठरली. आपल्या विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या अंतर्गत विविध प्रकारची प्रशिक्षण शिबिरे व सेवा शिबिरे यशस्वीपणे राबवली गेली. या राष्ट्रीय सेवा योजना विभागाने विद्यार्थ्यांच्या नेतृत्वगुणाला विकसित करण्यामध्ये महत्त्वाचे योगदान दिले. विद्यापीठाच्या पुढाकाराने व एन.एस. एस. च्या मदतीने 'ग्राम चलो अभियान' मोठ्या उत्साहात राबवला. या 'ग्राम चलो अभियाना' मुळे ग्रामीण पातळीवर

प्रभावीपणे जनजागृती झाली. विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे विविध उपक्रम विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला सामाजिक व शैक्षणिक दृष्टीतून विकसित करण्यामध्ये महत्त्वपूर्ण ठरले आहेत. विद्यापीठाचा शिक्षण कल्याण निधी, विद्यार्थी कल्याण निधी आणि विद्यार्थी सहायता निधी यातून विद्यापीठांमध्ये लक्षणीय कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

सन २००५ ला विद्यापीठाला 'राष्ट्रसंताचे नाव' प्राप्त झाल्यापासून एक वेगळीच झळाळी या विद्यापीठाला प्राप्त झाली आहे. महाराजांचे अवघे जीवन समाज समर्पित होते. मानवी जीवनाच्या सर्व बाजूंवर महाराजांनी आपल्या विचारांचा प्रकाश टाकला. विद्यार्थ्यांच्या व्यक्तित्व विकासावर आणि स्वावलंबी शिक्षणावर तर त्यांनी स्वतंत्रपणे आपले विचार वेळोवेळी प्रगट केले. आपले विद्यापीठ सुरुवातीपासूनच राष्ट्रीय आणि सामाजिक बांधीलकी जपणारे विद्यापीठ आहे. वंदनीय महाराजांचे नाव विद्यापीठाला दिल्यापासून देशासमोर असणाऱ्या राष्ट्रीय आणि सामाजिक उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी विद्यापीठ सतत जागरूक असते. महाराजांच्या मनात असलेल्या समाजाभिमुख नवभारताचे स्वप्न साकार करण्यासाठी विद्यापीठ वचनबद्ध आहे. महाराजांच्या कार्याची प्रेरणा सातत्याने विद्यार्थ्यांना मिळावी म्हणून विद्यापीठ परिसरात महाराजांचा पुतळा स्थानापन्न करण्यात आला आहे. महाराजांच्या विचारांचा प्रचार आणि प्रसार करण्याकरिता महाराष्ट्र शासनाने दिलेल्या २ कोटी रुपये अनुदानातून वंदनीय राष्ट्रसंताच्या नावाने अध्यासन सुरू झाले आहे. अगदी अलीकडे अध्यासनाकरिता ग्रामगीता भवनाची निर्मिती करण्यात आली आहे. २०१२–२०१३ या सत्रापासून स्नातक व स्नातकोत्तर पदवी पातळीवर 'राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विचारधारा' हा अभ्यासक्रम विद्यापीठात सुरू झाला. २०१५–१६ सत्रापासून विद्यापीठात प्रत्यक्षपणे सुरू झालेला स्नातकोत्तर पातळीवरील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विचारधारा हा अभ्यासक्रम पुढील कालखंडात निश्चितच लक्षणीय ठरणार आहे. विद्यापीठात अलीकडे भगवान चक्रधरस्वामी अध्यासन सुरू झाले असून पुढील कालखंडात हे अध्यासन अधिकाधिक विकसित होत जाणार आहे. विद्यापीठाच्या डॉ. वि. भि. कोलते ग्रंथालय परिसरामध्ये 'आंतरराष्ट्रीय बौद्ध अध्ययन केंद्रा' ची भव्य व प्रशस्त वास्तू आकारास आलेली असून हे आंतरराष्ट्रीय बौद्ध अध्ययन केंद्र आगामी काळात मध्यभारतातील एक दर्जेदार व ख्यातीप्राप्त अध्ययन केंद्र ठरणार आहे.

विद्यापीठाचा अध्ययन आणि विस्तार विभाग आजीवन शिक्षणाची संकल्पना घेऊन कार्यरत आहे. निरंतर शिक्षणांतर्गत कौशल्यविकासाचे रोजगाराभिमुख अभ्यासक्रम चालविले जातात. यात बालशिक्षिका, ऑथॉल्मिक असिस्टंट, रुग्णालय सहाय्यक इत्यादींचा अंतर्भाव आहे. जीवनशिक्षण अभियानांतर्गत अपारंपरिक ऊर्जास्रोत प्रशिक्षण, ग्रामीण महिला सबलीकरण आणि सामाजिक सर्वेक्षणासारखे उपयुक्त अभ्यासक्रम चालविले जात आहेत. लोकसंख्या शिक्षण, महिला अध्ययन सेवा क्रेंद्र, राष्ट्रसंत संस्कार प्रकल्पातून विद्यार्थी वर्ग व समाज लाभान्वित होत आहे. आजीवन अध्ययन व विस्तार विभागाकडून चालविण्यात येणारे कौशल्यविकास प्रशिक्षण अभ्यासक्रम जीवनशिक्षण अभियानाच्या अंतर्गत राबविण्यात येणारे अल्पकालीन प्रशिक्षण अभ्यासक्रम हे विद्यार्थ्यांच्या जीवनाश्यक कौशल्यांना विकसित करणारे ठरले आहे.

सार्वजनिक जीवनात विविध क्षेत्रांत असाधारण कार्य करणाऱ्या व्यक्तिंना सन्मानित करण्यासाठी 'राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जीवनसाधना' पुरस्काराने सन्मानित करण्याची परंपरा विद्यापीठाने सुरू केली आहे. आतापर्यंत अनेक मान्यवरांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

विद्यापीठाच्या इमारती विविध ठिकाणी विखुरलेल्या आहेत. त्यामुळे कार्यव्यवस्थेवर बराच ताण येतो म्हणून महात्मा फुले शैक्षणिक विद्यापीठ परिसरात विद्यापीठाच्या अत्याधुनिक सोयींनी युक्त अशी भव्य प्रशासकीय इमारत आकारास आली आहे. या इमारतीकरिता उद्योगपती जमनालाल बजाज ह्यांचे नातू श्री. राहुल बजाज ह्यांच्या औद्योगिक प्रतिष्ठानाने C.S.R. योगदान योजनेतून विद्यापीठाला १० कोटी रुपयांची उदार देणगी दिली होती. महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल व विद्यापीठाचे माननीय कुलपती श्री. भगत सिंह कोश्यारी यांचे हस्ते दि. १९ डिसेंबर, २०१९ रोजी या इमारतीचे उद्घाटन झाले. या नव्या भव्य प्रशासकिय इमारतीतून विद्यापीठाचे प्रशासकीय कामकाज सुबकपणे सुरू झाले आहे. .

दिनांक १३ एप्रिल, २०२३ ला विद्यापीठाचा ११० वा दीक्षांत समारंभ संपन्न झाला. याप्रसंगी दीक्षांत समारंभाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्राचे माननीय राज्यपाल व विद्यापीठांचे कुलपती श्री. रमेश बैस हे होते. प्रमुख अतिथी म्हणून ए. आय.सी.टी.ई. चे अध्यक्ष माननीय टी. जी. सीताराम हे होते.

निरंतर ध्येयाकडे वाटचाल करणाऱ्या आपल्या या विद्यापीठाच्या संदर्भात पाहिली गेलेली अनेक स्वप्ने आपल्या सगळ्यांच्या सहकार्याने नजीकच्या भविष्यात पूर्ण होतील व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे नाव भारतातील एक श्रेष्ठ विद्यापीठ म्हणून गौरवाने घेतले जाईल असा आमचा प्रगाढ विश्वास आहे.

•••

छत्रपती शिवाजी महाराज
प्रशासकीय परिसर

छत्रपती श्री. शिवाजी महाराज
Chhatrapati Shri. Shivaji Maharaj

।। प्रकरण पहिले।।

विद्यापीठ प्राधिकरणे व मंडळे

प्रकरण पहिले
विद्यापीठ प्राधिकरणे व मंडळे

अहवालकाळातील विद्यापीठाच्या प्राधिकरणे व मंडळे तसेच त्यात वेळोवेळी झालेले बदल याची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

अधिसभा, व्यवस्थापन परिषद, विद्यापरिषद व अन्य प्राधिकारिणी/समिती सदस्यांची यादी

१. अधिसभा
महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम २८(२) नुसार

पदसिद्ध अध्यक्ष व सदस्य :

कुलपती : महाराष्ट्राचे राज्यपाल
मा. श्री. भगत सिंह कोश्यारी
(दि. १७/२/२०२३ पर्यत)
मा. श्री. रमेश बैस (दि. १८/२/२०२३ पासून)

कुलगुरू :
डॉ. सुभाष आर. चौधरी

प्र–कुलगुरू :
डॉ. संजय दुधे

अधिष्ठाता :
१. डॉ. प्रशांत माहेश्वरी
अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा
२. डॉ. संजय कवीश्वर
अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा
३. डॉ. दत्तात्रय वाटमोडे
अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा
(दि. ३१/५/२०२३ पर्यत)
डॉ. शामराव कोरेटी
प्रभारी अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा
(दि. ०१/६/२०२३ पासून)
४. डॉ. (श्रीमती) राजश्री वैष्णव
प्रभारी अधिष्ठाता,
आंतर–विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
(दि. १२/१२/२०२२ पर्यत)
डॉ. प्रशांत कडू
अधिष्ठाता, आंतर–विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
(दि. १३/१२/२०२२ पासून)

संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ :
डॉ. प्रफुल्ल साबळे

वित्त व लेखा अधिकारी :
१. डॉ. संजय कवीश्वर (अतिरिक्त प्रभार)
(दि. १४/१२/२०२२ पर्यत)
२. श्री. हरीश पालीवाल
(दि. १५/१२/२०२२ पासून)

विद्यापीठाच्या उपपरिसरांचे संचालक
रिक्त

संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य :
डॉ. राजेश सिंह

संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य :
डॉ. धनराज माने (दि. १७/११/२०२२ पर्यत)
डॉ. शैलेंद्र देवळाणकर
(दि. १८/११/२०२२ ते ०५/३/२०२३ पर्यत)
डॉ. संजय ठाकरे (दि. ०६/३/२०२३ पासून)

सहसंचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य :
डॉ. मनोजकुमार डायगव्हाणे
विभागीय कार्यालय, सदर बाजार, नागपूर

संचालक, ज्ञानस्रोत केंद्र :
डॉ. विजय खंडाळ

संचालक, विद्यार्थी विकास मंडळ :
डॉ. अभय मुद्‌गल (दि. १८/७/२०२२ पर्यत)
डॉ. मंगेश पाठक (दि. १९/७/२०२२ पासून)

संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण :
डॉ. शरद सूर्यवंशी

संचालक, आजीवन अध्ययन व विस्तार मंडळ :
डॉ. निशिकांत राऊत (अतिरिक्त प्रभार)

प्राचार्य गटाचे प्रतिनिधी :

(खुला प्रवर्ग)
१. डॉ. नरेन्द्रसिंग राजेन्द्रसिंग दीक्षित
विमेन्स कॉलेज ऑफ आर्टस् ॲन्ड कॉमर्स,
३१० ब, न्यू नंदनवन, नागपूर
(दि. ३१/८/२०२२ पर्यत)
रिक्त
(दि. ०१/९/२०२२ ते २४/११/२०२२ पर्यत)
डॉ. निलकंठ यादोराव लंजे
जगत कला, वाणिज्य व इंदिराबेन हरिहरभाई
पटेल विज्ञान महाविद्यालय, गोरेगाव,
जि. गोंदिया
(दि. २५/११/२०२२ पासून)

२. डॉ. मृत्युंजय विक्रमादित्य सिंग
सी. जे. पटेल कला व वाणिज्य महाविद्यालय,
तिरोडा, जि. गोंदिया (दि. ३१/८/२०२२ पर्यत)
रिक्त
(दि. ०१/९/२०२२ ते २४/११/२०२२ पर्यत)
डॉ. संजय पंजाबराव धनवटे
नारायणराव काळे स्मृती मॉडेल महाविद्यालय
(कला, वाणिज्य व विज्ञान),
कारंजा (घाडगे), जि. वर्धा
(दि. २५/११/२०२२ पासून)

३. डॉ. विवेक मधुकर नानोटी
प्रियदर्शिनी इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनियरिंग ॲन्ड
टेक्नॉलॉजी, हिंगणा रोड,
नागपूर (दि. ३१/८/२०२२ पर्यत)
रिक्त
(दि. ०१/९/२०२२ ते २४/११/२०२२ पर्यत)
डॉ. महेंद्र पुंडलिकराव ढोरे
श्री. शिवाजी एज्युकेशन सोसायटी अमरावतीचे
विज्ञान महाविद्यालय, काँग्रेसनगर, नागपूर
(दि. २५/११/२०२२ पासून)

४. डॉ. (श्रीमती) उर्मिला वामनराव डबीर
राजकुमार केवलरामानी कन्या महाविद्यालय,
जरीपटका, नागपूर (दि. ३१/८/२०२२ पर्यत)
रिक्त
(दि. ०१/९/२०२२ ते २४/११/२०२२ पर्यत)
डॉ. जगदीश राधेश्याम बाहेती
कमला नेहरू कॉलेज ऑफ फार्मसी, बुटीबोरी,
जि. नागपूर (दि. २५/११/२०२२ पासून)

५. डॉ. संजय पंजाबराव धनवटे
नारायणराव काळे स्मृती मॉडेल कॉलेज
(कला, वाणिज्य व विज्ञान),
कारंजा (घाडगे), जि. वर्धा
(दि. ३१/८/२०२२ पर्यत)
रिक्त
(दि. ०१/९/२०२२ ते २४/११/२०२२ पर्यत)
डॉ. सचिन पुरूषोत्तम उंटवाले
जी. एच. रायसोनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग,
डिगडोह हिल्स, हिंगणा रोड, नागपूर
(दि. २५/११/२०२२ पासून)

(अनुसूचित जाती प्रवर्ग)

६. डॉ. महेंद्र बागडे
एस. के. पोरवाल कॉलेज, कामठी, जि. नागपूर
(दि. ३१/८/२०२२ पर्यत)
रिक्त
(दि. ०१/९/२०२२ ते २४/११/२०२२ पर्यत)
डॉ. चंदु काशीनाथजी पोपटकर
कुंभलकर कॉलेज ऑफ सोशल वर्क, वर्धा
(दि. २५/११/२०२२ पासून)

(अनुसूचित जमाती प्रवर्ग)

७. डॉ. चेतनकुमार भीमराव मसराम
एस. एन. मोर कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स ॲन्ड
सायन्स महाविद्यालय, तुमसर, जि. भंडारा
(दि. ३१/८/२०२२ पर्यत)
रिक्त
(दि. ०१/९/२०२२ ते २४/११/२०२२ पर्यत)
डॉ. रामदास आत्राम
शासकीय न्याय सहायक विज्ञान संस्था,
रविंद्रनाथ टागोर मार्ग, नागपूर
(दि. २५/११/२०२२ ते १८/४/२०२३ पर्यत)
रिक्त (दि. १९/४/२०२३ पासून)

(निरधिसूचित जमाती (वि.जा./भ.ज.)

८. रिक्त
(दि. ०१/७/२०२२ ते २४/११/२०२२ पर्यत)
डॉ. जयवंत वडते
धनवटे नॅशनल कॉलेज, नागपूर
(दि. २५/११/२०२२ ते २७/२/२०२३ पर्यत)
रिक्त (दि. २८/२/२०२३ पासून)

(इतर मागासवर्ग प्रवर्ग)

९. डॉ. दामोधर सातपुते
अरुणराव कलोडे महाविद्यालय, नागपूर
(दि. ३१/८/२०२२ पर्यत)
रिक्त
(दि. ०१/९/२०२२ ते २४/११/२०२२ पर्यत)
डॉ. देवेंद्र श्रीकृष्णाजी भोंगाडे
जीवन विकास महाविद्यालय,
देवग्राम, त. नरखेड, जि. नागपूर
(दि. २५/११/२०२२ पासून)

(महिला प्रवर्ग)

१०. डॉ. (श्रीमती) शरयू बबन तायवाडे
तायवाडे कॉलेज, महादुला, कोराडी, जि. नागपूर
(दि. ३१/८/२०२२ पर्यत)
रिक्त
(दि. ०१/९/२०२२ ते २४/११/२०२२ पर्यत)
डॉ. (श्रीमती) शरयू बबन तायवाडे
तायवाडे कॉलेज, महादुला, कोराडी, जि. नागपूर
(दि. २५/११/२०२२ पासून)

व्यवस्थापन गटाचे प्रतिनिधी :

(खुला प्रवर्ग)

१. डॉ. बबन भाऊराव तायवाडे
श्री. सच्चिदानंद शिक्षण संस्था,
१३, पावनभूमी, वर्धा रोड, नागपूर
(दि. ३१/८/२०२२ पर्यत)
रिक्त
(दि. ०१/९/२०२२ ते २४/११/२०२२ पर्यत)
डॉ. बबन भाऊराव तायवाडे
श्री. सच्चिदानंद शिक्षण संस्था,
१३, पावनभूमी, वर्धा रोड, नागपूर
(दि. २५/११/२०२२ पासून)

२. श्री. दुष्यंत सतीश चतुर्वेदी
लोकमान्य टिळक जनकल्याण शिक्षण संस्था,
३१०—ए, सिव्हिल लाईन्स, हेंसी रोड, नागपूर
(दि. ३१/८/२०२२ पर्यत)
रिक्त
(दि. ०१/९/२०२२ ते २४/११/२०२२ पर्यत)
श्री. अजय अमीलाल अग्रवाल
जयदेव एज्युकेशन सोसायटी, ५०१, रॉयल पार्क,
प्लॉट नं. ७२, फॉर्म लॅन्ड जवळ, रामदासपेठ,
नागपूर (दि. २५/११/२०२२ पासून)

३. श्री. किशोर मोतीराम उमाठे
सतीमाता शिक्षण संस्था, ११, व्यंकटेशनगर,
खामला, नागपूर (दि. ३१/८/२०२२ पर्यत)
रिक्त
(दि. ०१/९/२०२२ ते २४/११/२०२२ पर्यत)
श्री. उमेश पांडुरंगजी तुळसकर
विद्या विकास एज्युकेशन सोसायटी, दत्त मंदिर
वार्ड, तुळसकर हॉस्पीटल जवळ, हिंगणघाट, वर्धा
(दि. २५/११/२०२२ पासून)

४. डॉ. राजेश घनश्याम भोयर
विद्याभारती संस्था, आदर्श कॉलनी, केळकरवाडी,
वर्धा (दि. ३१/८/२०२२ पर्यत)
रिक्त
A Workshop on "Brahmi Lipi" during "Meet the Scientist" session was also organized for the participants with the help of research scholar of Archaeology, Mr. Ashish Jain, who beautifully conducted the workshop. He also conducted a small session on importance of science in Archaeological research.

The valedictory function was held on January 6, 2023 at 3.00 pm, which was presided over by President of Indian Science Congress Dr. Vijaya Laxmi Saxena. The chief guest for valedictory function was Shri. Umesh Kumar Rustagi, Director, Nehru Science Centre, Mumbai and guest of honours were Dr. Raj Kumar Joshi, Sr. Scientist, DST, New Delhi, Dr. Prashant Kadu, Dean-Faculty of Inter-Disciplinary Studies, Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University, Dr. Lalit Sharma, Chairman, Academic Committee, NCSC and Dr. S. Ramakrishna, General Secretary (Membership Affairs), ISCA. Dr. Nishikant Raut, Convener of RKVS proposed vote of thanks.

Dr Nishikant Raut, was the conveyer of the program, Dr. Rajesh Singh, Local Secretary ISC and Dr. G. S. Khadekar Local Secretary ISC. All the members of core committee successfully contributed their efforts to make this event a grand success.

तंत्रज्ञान आणि उर्जा पार्क :

संचालक : डॉ. प्रकाश इटनकर

या वर्षभरात तंत्रज्ञान आणि ऊर्जा उद्यानाच्या खालील बैठका आणि भेटींचे आयोजन करण्यात आले होते.

२७ जानेवारी, २०२२ रोजी विद्यापीठ कॅम्पसमध्ये तज्ज्ञ पॅनेलसह बैठक झाली. बैठकीचा अजेंडा – तंत्रज्ञान आणि एनर्जी पार्कचे उपक्रम सुरू करण्याच्या धोरणावर चर्चा करणे हा या बैठकीचा मुख्य उद्देश होता. या बैठकीत विद्यापीठ शताब्दी महोत्सव समितीच्या वरिष्ठ सदस्यांचे मार्गदर्शन तसेच तज्ज्ञ पॅनेल ऑफ टेक्नॉलॉजी आणि एनर्जी पार्कच्या सदस्यांकडून सूचना मागवण्यात आल्या आहेत.

२ मार्च, २०२२ रोजी तंत्रज्ञान आणि एनर्जी पार्कचे उपक्रम सुरू करण्याच्या धोरणावर चर्चा करण्यासाठी बैठक झाली. बैठकीचा अजेंडा – प्रस्तावित तंत्रज्ञान व उर्जा पार्कच्या पायाभूत आवश्यकतांचे पुनरावलोकन करणे. वास्तुविशारद अंजली भंडारी यांनी सादर केलेल्या आर्किटेक्चरल ड्रॉइंगचे पुनरावलोकन करणे. वास्तुविशारद अंजली भंडारी यांनी सादर केलेल्या अंदाजे अंदाजपत्रकाचा आढावा घेणे. अभियांत्रिकी विभागाने सादर केलेल्या अंदाजे अंदाजपत्रकाचा आढावा घेणे.

३१ मार्च, २०२२ रोजी पायाभूत सुविधा सल्लागार पॅनेलच्या सदस्यांसह बैठक झाली. बैठकीचा अजेंडा – प्रस्तावित तंत्रज्ञान व उर्जा पार्कच्या पायाभूत आवश्यकतांचे पुनरावलोकन करणे. वास्तुविशारद तारिका दगडकर यांनी सादर केलेल्या आर्किटेक्चरल ड्रॉइंगचे पुनरावलोकन करणे.

१२ एप्रिल, २०२२ रोजी जमनालाल बजाज प्रशासकीय कार्यालयात निधी सहाय्यासाठी प्रस्ताव तयार करण्यासाठी बैठक झाली. बैठकीचा अजेंडा – तंत्रज्ञान आणि ऊर्जा उद्यानाचे उपक्रम सुरू करण्याच्या धोरणावर चर्चा करणे हा या बैठकीचा मुख्य उद्देश आहे. पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी निधी प्राधिकरणांना सादर करावयाच्या मसुद्याच्या प्रस्तावावर चर्चा करण्याचा अजेंडा आहे. या बैठकीत विद्यापीठ शताब्दी महोत्सव समितीच्या वरिष्ठ सदस्यांचे मार्गदर्शन आणि तज्ज्ञ पॅनेल ऑफ टेक्नॉलॉजी अँड एनर्जी पार्कच्या सदस्यांकडून सूचना मागविण्यात आल्या आहेत.

९ मे, २०२२ रोजी महाराष्ट्र शासनाच्या प्रधान सचिवांसोबत आभासी बैठक झाली. बैठकीचा अजेंडा – विद्यापीठाच्या शताब्दी वर्षात प्रस्तावित तंत्रज्ञान आणि ऊर्जा उद्यानाचे महत्त्व आणि आवश्यकता स्पष्ट करणे आणि महाराष्ट्र राज्य सरकारकडून तंत्रज्ञान व उर्जा पार्कसाठी आर्थिक मदतीची आवश्यकता स्पष्ट करणे.

७ जून, २०२२ रोजी शताब्दी महोत्सव समितीने बैठक बोलावली होती.

२८ मार्च, २०२३ रोजी विद्यापीठ कॅम्पसमध्ये तज्ज्ञ पॅनेलसह महाराष्ट्र सरकार कडून तत्वत: मान्य झालेल्या आराखड्यास पुर्न रूप देण्याकरिता बैठक झाली. बैठकीचा अजेंडा – टेक्नॉलॉजी आणि एनर्जी पार्कच्या तज्ज्ञ पॅनेलच्या सदस्यांच्या सूचनांनुसार आर्किटेक्चरल ड्रॉइंगवर चर्चा करणे हा या बैठकीचा मुख्य उद्देश आहे.

माननीय कुलगुरूंनी १३ जून, २०२२ रोजी विद्यापीठातर्फे तज्ज्ञ सदस्य डॉ. प्रकाश इटनकर, डॉ. भरत भानवसे आणि डॉ. नितीन डोंगरवार यांची चमू तयार केली असून त्यांनी तंत्रज्ञान विकासाच्या संदर्भात संबंध प्रस्थापित करण्यासाठी व अश्याप्रकारच्या इतर केंद्राच्या कार्याची माहिती घेण्यासाठी प्रमुख संस्थांना भेट देण्याच्या सूचना केल्या.

त्याअंतर्गत भेटी दिलेल्या संस्था खालीलप्रमाणे आहेत :

इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी मुंबईला १४ जुलै, २०२२ रोजी भेट दिली.

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी मुंबईला १५ जुलैला भेट दिली.

श्री विठ्ठल एज्यूकेशन आणि रिसर्च इन्स्टिट्यूट, पंढरपूर (SVERI) येथे १९ जुलै, २०२२ रोजी भेट दिली.

विज्ञान आश्रम पाबळ पुणे २० जुलै, २०२२ रोजी भेट दिली.

द्रोणाचार्य स्टार्टअप पुणे २० जुलै, २०२२ रोजी भेट दिली.

त्याचप्रमाणे नागपुरातील तंत्रज्ञान विषयक संस्थाना सुद्धा सप्टेंबर, २०२२ या महिन्यात भेटी देण्यात आल्या.

यशवंतराव चव्हाण कालेज ऑफ इंजिनिअरिंग, नागपूरला भेट दिली. प्रियदर्शनी अभियांत्रिकी महाविद्यालय, नागपूरला भेट दिली. झुलेलाल अभियांत्रिकी महाविद्यालय, नागपूरला भेट दिली. जी. एच. रायसोनी अभियांत्रिकी महाविद्यालय, नागपूरला भेट दिली.

ज्या संस्थाना भेटी दिल्या त्या संस्थांना टेक्नॉलॉजी व एनर्जी पार्कची संकल्पना आवडली. सर्व इन्स्टिट्यूट मधल्या विविध तांत्रिक शाखा आपल्या टेक्नॉलॉजी पार्कला आकार देण्याकरिता तेथील पायाभूत सुविधा, तिथले शिक्षक टेक्नॉलॉजी पार्कच्या स्थापना व कार्यात सहकार्य करतील अशी ग्वाही दिली.

या केंद्रांना दिलेल्या भेटी उपयुक्त ठरल्या असून या विद्यापीठामध्ये होऊ घातलेल्या टेक्नॉलॉजी व एनर्जी पार्क मध्ये योग्य टेक्नॉलॉजीचे सर्वोत्तम कार्यरत मॉडेल देण्याकरिता या संस्थांसोबत सामंजस्य करार होऊ शकतो आणि त्याकरिता या संस्थांची मौखिक संमती मिळाली आहे. तसेच होऊ घातलेल्या आणि त्यांनी दिलेल्या मॉडेल्सला प्रदर्शन करणे व

त्याठिकाणी फलक लावून प्रदर्शित करणे असे सर्वानुमते ठरले आहे.

महाराष्ट्र सरकारला विद्यापीठानी आपल्या १०० व्या वर्षात टेक्नॉलॉजी व एनर्जी पार्कचा मार्च २०२३ मध्ये प्रस्ताव पाठवला होता. टेक्नॉलॉजी व एनर्जी पार्कच्या भव्य वास्तूकरिता ३१.५० कोटी तत्वत: मान्य झाले आहे. त्याकरिता आराखडा व अंदाजपत्रक करण्याकरिता विद्यापीठ तंत्रज्ञान विभागासोबत तज्ज्ञ वास्तुविशारद डॉ. तारिका दगडकर B. Arch., M. Des., Ph.D., EPCO (Fellowship), Associate Professor, SMMCA, Nagpur यांची नियुक्ती करून प्रस्ताव तयार करण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. तसेच खालील महत्त्वपूर्ण संस्थांना भेटी देण्याची सूचना मा. कुलगुरूंनी विद्यापीठ तज्ज्ञ समितीला केली आहे.

सोयाबीन संशोधन केंद्र, इंदोर, पंजाबराव कृषी विद्यालय, अकोला, ॲग्रीकल्चरल विद्यापीठ, राहुरी, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, खडकपूर.

विद्यार्थी विकास विभाग :

संचालक : डॉ. मंगेश पाठक

शैक्षणिक सत्र २०२२–२०२३ मध्ये मा. कुलगुरूंच्या नेतृत्वात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या कलम–५६ नुसार विद्यार्थी विकास विभागाने बहुविध कार्यक्रम आणि योजना राबविल्या.

उत्कृष्ट विद्यार्थी पुरस्कार २०२०–२०२१

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, 'उत्कृष्ट विद्यार्थी पुरस्कार' 'उत्कृष्ट सांस्कृतिक उपक्रमपटू पुरस्कार' 'उत्कृष्ट राष्ट्रीय छात्रसेना कॅडेट पुरस्कार' करिता निवड समितीद्वारे खालील विद्यार्थ्यांची या पुरस्काराकरिता निवड करण्यात आली. सदर पुरस्कार दि. ०४/८/२०२२ ला वर्धापनदिन ऐवजी दि. ०५/९/२०२२ रोजी शिक्षक दिन या समारोहात मा. कुलगुरूंच्या शुभहस्ते सन्मानपूर्वक विजेत्या विद्यार्थ्यांना प्रदान करण्यात आला.

विजेत्या विद्यार्थ्यांची नावे खालीलप्रमाणे आहे.

'उत्कृष्ट विद्यार्थी पुरस्कार २०२०–२०२१' च्या पुरस्कृत विद्यार्थ्यांची नावे : १. श्री सागर अशोक कोहचाडे, डॉ. मधुकरराव वासनिक पी. डब्ल्यू. एस. कला–वाणिज्य महाविद्यालय, टेका नाका, कामठी रोड, नागपूर २. कु. राधा सतिश ठेंगडी, लेडी अमृताबाई डागा कॉलेज फॉर वुमेन ऑफ आर्ट्स, कॉमर्स ॲन्ड सायन्स, गांधीनगर, नागपूर

'उत्कृष्ट सांस्कृतिक उपक्रमपटू पुरस्कार २०२०–२०२१' च्या पुरस्कृत विद्यार्थ्यांची नावे : १. श्री. सुशांत सुदाम राठोड, शासकीय विज्ञान संस्था, नागपूर २. कु. मेहंदी के. सरीफुद्दीन शेख, हिस्लॉप महाविद्यालय, टेम्पल रोड, सिव्हील लाईन, नागपूर

'उत्कृष्ट राष्ट्रीय छात्रसेना कॅडेट पुरस्कार २०२०–२०२१' च्या पुरस्कृत विद्यार्थ्यांची नावे : १. श्री वैभव प्रमोद शेळके, जानकीदेवी बजाज विज्ञान महाविद्यालय, जमनालाल बजाज मार्ग, सिव्हील लाईन्स, वर्धा २. कु. रश्मी पुरूषोत्तम बल्की, श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, कॉंग्रेसनगर, नागपूर.

भारतीय छात्र संसद पुणे २०२२ : १२ व्या भारतीय छात्र संसदेच्या कार्यक्रमाचे आयोजन MIT World Peace University, Kothrud, Pune येथे दिनांक १५ ते १७ सप्टेंबर, २०२२ ला करण्यात आले होते. त्या कार्यक्रमात विद्यापीठाच्या वेगवेगळ्या विभागातील एकूण पाच विद्यार्थ्यांच्या संघाने व दोन संघ व्यवस्थापकांनी सहभाग नोंदविला.

माजी कुलपती डॉ. पी. सी. अलेक्झांडर वक्तृत्त्व स्पर्धा व इतर वक्तृत्त्व स्पर्धा : माजी कुलपती डॉ. पी. सी. अलेक्झांडर वक्तृत्त्व स्पर्धा इंग्रजी, ही स्पर्धा दिनांक ४ ऑक्टोबर, २०२२ रोजी मुंबई विद्यापीठ, मुंबई येथे आयोजित करण्यात आलेली होती या स्पर्धेमध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठाच्या वतीने हिस्लॉप कॉलेज, नागपूरची विद्यार्थिनी कु. मेहंदी खातुन शेख हिने सहभाग नोंदवून प्रथम क्रमांक पटकावला.

माजी कुलपती डॉ. पी. सी. अलेक्झांडर वक्तृत्व स्पर्धा मराठी, ही स्पर्धा दिनांक ७ ऑक्टोबर, २०२२ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे आयोजित करण्यात आलेली होती या स्पर्धेमध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठाच्या वतीने लोकप्रशासन व स्थानिक स्वराज्य शासन विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठ नागपूरचा विद्यार्थी श्री. अनिरुद्ध तळेगावकर याने सहभाग नोंदविला.

16th National Inter-University Debate Competition ही स्पर्धा G. B. Pant University of Agriculture and Technology, Pant Nagar, Uttarakhand येथे दिनांक १४ व १५ जानेवारी, २०२३ रोजी आयोजित करण्यात आलेली होती. या स्पर्धेमध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या वतीने शिवाजी सायन्स कॉलेज, नागपूरचा विद्यार्थी विशाल खर्चवाल याने सहभाग नोंदवून प्रथम पुरस्कार पटकावला व आर. एस. मुंडले महाविद्यालय, धरमपेठ, नागपूरचा विद्यार्थी आशुतोष तिवारी याने सहभाग नोंदवून सांत्वना पुरस्कार प्राप्त केला.

आंतर–महाविद्यालयीन सांस्कृतिक स्पर्धा निवड चाचणी २०२२ : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठाचा

सांस्कृतिक संघ निवड करण्याकरिता या वर्षी जिल्हास्तरीय सांस्कृतिक स्पर्धा निवड चाचणी घेण्यात आली. गोंदिया जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांकरिता नटवरलाल माणिकलाल दलाल कला–वाणिज्य महाविद्यालय, गोंदिया येथे दिनांक १९ ते २० सप्टेंबर, २०२२ रोजी सांस्कृतिक स्पर्धा निवड चाचणी घेण्यात आली. भंडारा जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांकरीता जे. एम. पटेल पदव्युत्तर कला–वाणिज्य व विज्ञान आणि मॅनेजमेंट महाविद्यालय, भंडारा येथे दिनांक २२ ते २३ सप्टेंबर, २०२२ रोजी सांस्कृतिक स्पर्धा निवड चाचणी घेण्यात आली. वर्धा जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांकरिता यशवंत महाविद्यालय, वर्धा येथे दिनांक २७ ते २८ सप्टेंबर, २०२२ रोजी सांस्कृतिक स्पर्धा निवड चाचणी घेण्यात आली. नागपूर जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांकरिता धरमपेठ म. पां. देव स्मृती विज्ञान महाविद्यालय, अंबाझरी उद्यानजवळ, नागपूर येथे दिनांक २९ ते ३० सप्टेंबर, २०२२ रोजी सांस्कृतिक स्पर्धा निवड चाचणी घेण्यात आली. उपरोक्त सर्व महाविद्यालयांमधुन सांस्कृतिक कार्यक्रमाच्या सर्व प्रकारांमधून निवड झालेल्या प्रथम तीन स्पर्धकांच्या अंतीम निवड चाचणीचे आयोजन गुरूनानक भवन, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर येथे दिनांक १७ ते १८ आक्टोबर, २०२२ दरम्यान करण्यात आले होते. अंतीम निवड चाचणी दरम्यान निवड झालेल्या ४५ स्पर्धकांचा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा सांस्कृतिक संघ तयार करण्यात आला.

महाराष्ट्र राज्य आंतर–विद्यापीठ इंद्रधनुष्य सांस्कृतिक युवा महोत्सव २०२२ : १८ वा महाराष्ट्र राज्य आंतर–विद्यापीठ सांस्कृतिक युवा महोत्सव ''इंद्रधनुष्य – २०२२'' चे आयोजन महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथे दिनांक ५ ते ९ नोव्हेंबर, २०२२ या दरम्यान आयोजित करण्यात आला. या महोत्सवात महाराष्ट्रातील एकूण २२ विद्यापीठांच्या विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धामध्ये आपला सहभाग नोंदविला या युवा महोत्सवात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या सांस्कृतिक चमुने सहभाग घेवून विविध स्पर्धामध्ये आपले विद्यार्थी यशस्वी झालेले आहेत. इंद्रधनुष्य २०२२ या आंतर–विद्यापीठीय महोत्सवात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या सांस्कृतिक चमूंनी विविध स्पर्धामध्ये उत्कृष्ट प्रदर्शन करून खालील पारितोषिके प्राप्त केली.

प्रथम पारितोषिक : लाईट व्होकल

द्वितीय पारितोषिक : वेस्टन व्होकल, नॉन परक्युशन

तृतीय पारितोषिक : क्लासीकल डान्स, पोस्टर मेकिंग, एलोक्युशन

पश्चिम क्षेत्रीय, आंतर–विद्यापीठ युवा महोत्सव सांस्कृतिक स्पर्धा : गणपत विद्यापीठ, मेहसाना, गुजरात येथे १० ते १४ फेब्रुवारी, २०२३ (SWARRANG -2022-23) ला झालेल्या पश्चिम विभागीय युवा महोत्सव सांस्कृतिक स्पर्धेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या सांस्कृतिक चमूने विविध स्पर्धामध्ये भरीव कामगिरी करून यश संपादन केले. या स्पर्धेत पश्चिम भारतातील २४ विद्यापीठाने भाग घेतलेला होता. यामध्ये खालील स्पर्धेत आपल्या विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी दाखवून पारितोषिके प्राप्त केली.

प्रथम पारितोषिक : क्लासिकल डान्स, एलोक्युशन, डिबेट

द्वितीय पारितोषिक : परक्युशन, स्कीट

तृतीय पारितोषिक : मिमीक्री, लाईट व्होकल, पोस्टर मेकिंग, स्पॉट फोटोग्राफी

चतुर्थ पारितोषिक : ग्रुप साँग इंडीयन, ग्रुप साँग वेस्टर्न, क्लासीकल व्होकल

पाचवे पारितोषिक : इंस्टॉलेशन

आंतर–विद्यापीठीय राष्ट्रीय सांस्कृतिक युवा महोत्सव स्पर्धा : AIU New Delhi व जैन विद्यापीठ, बेंगलोर, कर्नाटक यांच्या संयुक्त विद्यमाने जैन विद्यापीठ, बेंगलोर, कर्नाटक येथे "Unifest 2023" २४ ते २८ फेब्रुवारी, २०२३ ला झालेल्या आंतर–विद्यापीठीय राष्ट्रीय सांस्कृतिक महोत्सव स्पर्धेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या सांस्कृतिक चमूने विविध स्पर्धामध्ये भरीव कामगिरी करून यश संपादन केले. या स्पर्धेत भारतातील भरपूर विद्यापीठाने भाग घेतलेला होता. यामध्ये खालील स्पर्धेत आपल्या विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी दाखवून पारितोषिक प्राप्त केले.

प्रथम पारितोषिक : Classical Dance, Percussion, Light Vocal, Debate

द्वितीय पारितोषिक : Poster making, Elocution

आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक युवा महोत्सव स्पर्धा : AIU New Delhi व लव्हली प्रोफेशनल विद्यापीठ, फगवाडा, पंजाब यांच्या संयुक्त विद्यमाने लव्हली प्रोफेशनल विद्यापीठ, फगवाडा, पंजाब येथे "ONE WORLD 2023" ०६ ते ०८ एप्रिल, २०२३ ला झालेल्या आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक युवा महोत्सव स्पर्धेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या सांस्कृतिक चमूने सहभाग नोंदविला.

संविधान दिन : शनिवार, दिनांक २६ नोव्हेंबर, २०२२ रोजी संविधान दिन मा. कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या अध्यक्षतेत तसेच, मा. प्र–कुलगुरू डॉ. संजय दुधे, प्रमुख अतिथी मा. न्या. वासंती नाईक, नागपूर, मा. कुलसचिव डॉ. राजू हिवसे, संचालक, डॉ. सोपानदेव पिसे, राष्ट्रीय सेवा योजना व संचालक डॉ. मंगेश पाठक, विद्यार्थी विकास विभाग यांचे व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत दीक्षांत सभागृहात कार्यक्रम पार पडला.

नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सोशल डिफेन्स मिनिस्ट्री ऑफ सोशल जस्टीस ॲन्ड एम्पॉवरमेंट भारत सरकार यांचा ट्रान्सजेंडरचा कार्यक्रम : विद्यार्थी विकास विभाग व राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांचे सहयोगाने नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सोशल डिफेन्स मिनिस्ट्री ऑफ सोशल जस्टीस ॲन्ड एम्पॉवरमेंट भारत सरकार 'Provisions of Transgender Persons (Protection of Rights) Act, 2019 and Rules, 2020' चा एक दिवसीय संवेदना कार्यक्रम मा. कुलगुरू महोदयांचे मान्यतेनुसार विद्यापीठाच्या दिक्षांत सभागृहात डॉ. गिरीराज संचालक, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सोशल डिफेन्स मिनिस्ट्री ऑफ सोशल जस्टीस ॲन्ड एमपॉवरमेंट यांचे प्रमुख उपस्थितीत दिनांक ६ ऑक्टोबर, २०२२ रोजी घेण्यात आला. आचल वर्मा व विद्या कांबळे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला विद्यापीठाच्या संलग्नित, संचालित महाविद्यालयातील व शैक्षणिक विभागातील एकूण १६० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

माता मंजुळाबाई विद्यार्थी वैद्यकीय सहायता निधी : संलग्नित महाविद्यालयातील खालील विद्यार्थ्यांच्या प्राप्त वैद्यकीय प्रस्तावानुसार समितीने मंजूर केल्याप्रमाणे निधी वाटप करण्यात आला.

अनुक्रमांक	विद्यार्थ्यांचे नाव	महाविद्यालयाचे नाव	देण्यात आलेली रक्कम
१.	अरमान संतोष गौर	सांख्यिकीशास्त्र विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर	१,००,०००/—
२.	स्नेहल गौतम वासनिक	वाणिज्य विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर	२७,६८०/—
३.	केतन अशोक नागरे	प्रियदर्शनी जे. एल. कॉलेज ऑफ इंजिनियरिंग, नागपूर	१,००,०००/—

अल्पसंख्यांक हक्क दिन : महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार अल्पसंख्यांक हक्क दिन मा. कुलगुरू महोदयांचे मान्यतेनुसार दिनांक १८ डिसेंबर, २०२२ ऐवजी १९ डिसेंबर, २०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता विद्यापीठाच्या दीक्षांत सभागृहात मा. कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांचे अध्यक्षतेत, मा. प्र–कुलगुरू, डॉ. संजय दुधे यांचे प्रमुख उपस्थितीत पार पडला. सदर कार्यक्रमाला मा. श्री दलजीतसिंग खालसा, गोंदिया उपस्थित होते. प्रस्तुत कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. मंगेश पाठक, संचालक, विद्यार्थी विकास विभाग यांनी केले. प्रस्तुत कार्यक्रमाला बरेच मान्यवर उपस्थित होते.

आविष्कार निवड चाचणी : राज्य व राष्ट्रीय स्तरावरील संशोधनामध्ये वाव मिळविण्यासाठी अनेक संशोधन स्पर्धेत सहभाग घेण्याकरिता विद्यापीठाची चमू जात असते. यावर्षी निवड चाचणी आविष्कार–२०२३ करिता निवड चाचणी दादासाहेब बालपांडे फार्मसी महाविद्यालय, बेसा येथे आयोजित करण्यात आली. या स्पर्धेत एकूण २०३ विद्यार्थ्यांनी नोंदणी करून सहभाग घेतला असून त्यामधून निवड झालेल्या एकूण ४४ विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्याकरिता आविष्कार प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन दादासाहेब बालपांडे फार्मसी महाविद्यालय, बेसा येथे आयोजित करण्यात आले.

महाराष्ट्र राज्य आंतर–महाविद्यालयीन संशोधन विद्यार्थी परिषद "AVISHKAR 2022-23": महाराष्ट्र राज्य आंतर–विद्यापीठीय संशोधन विद्यार्थी परिषद "AVISHKAR 2022-23" चे आयोजन दिनांक १२ ते १५ जानेवारी, २०२३ या कालावधीत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे करण्यात आले होते. त्या स्पर्धेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या चमूने भरीव कामगिरी करून यश संपादन केले. या स्पर्धेत महाराष्ट्रातील १३ विद्यापीठांनी सहभाग घेतलेला होता. खालील स्पर्धेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी दाखवून पारितोषिक प्राप्त केले. **तृतीय पारितोषिक :** शिवम रोहणकर, श्रेणी व स्तर : वाणिज्य, व्यवस्थापन, विधी (विद्यार्थी, पदव्युत्तर)

विद्यापीठस्तरिय आंतर–महाविद्यालय सांस्कृतिक स्पर्धा 'युवारंग–२०२३': संचालक विद्यार्थी विकास विभागाद्वारे गुरूनानक भवन सभागृहात व लक्ष्मीनारायण तंत्रशास्त्र संस्था परिसरात दि. ८ ते १० मार्च, २०२३ दरम्यान युवारंग या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात विद्यापीठांतर्गत येणाऱ्या सर्व महाविद्यालयातील एकूण १३०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. ज्या विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांनी क्रमांक प्राप्त केले अशा विजेत्या कलाकारांना/स्पर्धकांना गुरुनानक भवन सभागृहात प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह मा. कुलगुरू, मा. प्र–कुलगुरू, मा. कुलसचिव यांचे हस्ते प्रदान करण्यात आले.

तक्रार निवारण कक्ष : महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दिनांक २५ फेब्रुवारी, २०१९ रोजी क्रमांक –परिनि–२०१८/प.क्र.१२५/विशि–२ अंतर्गत अधिसूचनेन्वये निर्गमित केलेल्या २०१९ च्या एकरूप परिनियम क्रमांक ५

मधील कलम ५(४)(एक) मधील रचनेनुसार, विद्यापीठाविरुध्दच्या तक्रारीच्या आणि महाविद्यालय तक्रार निवारण कक्षाकडून निर्णय न देण्यात आलेल्या तक्रारींचे निवारण करण्यास्तव मा. कुलगुरूंनी प्र–कुलगुरूंच्या अध्यक्षतेखाली विद्यापीठ तक्रार निवारण कक्ष गठीत केले असून दि. २७ जानेवारी, २०२३ रोजी क्रमांक रातुमनावि/साप्र/२३/स/३३ व दिनांक २२ मे, २०२३ रोजी क्रमांक रातुमनावि/साप्र/२३/स/५७ च्या अधिसूचनेनुसार तक्रार निवारण कक्षाची शैक्षणिक सत्र २०२२–२३ मध्ये एकूण १ सभा घेण्यात आली सदर सभेमध्ये विद्यार्थ्यांच्या प्राप्त एकूण १९ तक्रारींचे निराकरण करण्यात आलेले आहे.

पूर्व परीक्षा प्रशिक्षण केंद्र :

केंद्र शासनाच्या गृहमंत्रालयाच्या आदेश क्र. बी. सी. ११०२०/३५/८२ बी. व्ही. सी. दि. : १८/०३/१९८३ नुसार अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीकरिता नागपूर विद्यापीठाद्वारे पूर्व परीक्षा प्रशिक्षण केंद्र संचालित आहे आता ते केंद्र सरकारच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयातर्फे मिळणाऱ्या अनुदानातून चालविले जात आहे. अनुसूचित जमातीकरिता वेगळे मंत्रालय स्थापन झाल्यामुळे मंत्रालयाने या योजनेत बदल केला असून प्रशिक्षणाची सोय अनुसूचित जाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्यांक या प्रवर्गातील प्रशिक्षार्थिना मिळायची. या योजनेत परत बदल केला असून आता प्रशिक्षणाची सोय अनुसूचित जाती व इतर मागासवर्ग या प्रवर्गातील उमेदवारांकरिता उपलब्ध करून देण्यात आली. अनुदान देणाऱ्या मंत्रालयातर्फे ज्या परीक्षेसाठी अनुदान प्राप्त होते अशाच परीक्षांसाठी या केंद्राद्वारे प्रशिक्षणाची सोय उपलब्ध करून देण्यात येते. केंद्रामध्ये खालील परीक्षांसाठी प्रशिक्षण देण्यात येते.

अहवाल वर्षामध्ये Ministry of Social Justice and Empowerment यांच्याकडून ग्रॅन्ट न मिळाल्यामुळे या वर्षामध्ये होणाऱ्या IAS, IES आणि SBI Bank (P.O.) या परीक्षांसाठी ट्रेनिंग कार्यक्रम राबविण्यात आले नाही. त्याकरिता अनुदान देणाऱ्या संस्थेचे नाव Ministry of Social Justice and Empowerment, Govt. of India, New Delhi. Ministry of Social Justice and Empowerment यांच्याकडून संबंधित वर्षामध्ये अनुदान न मिळाल्यामुळे २००८–२००९ ते २०२२–२३ या वर्षामध्ये ट्रेनिंग कार्यक्रम राबविण्यात आले नाही. या वर्षामधून २००९–१० या वर्षाचे अनुदान सेंटरला २०१२ मध्ये मिळाले असून यांचा खर्चासंबंधाचे निर्णय घेण्याकरिता विद्यापीठाला लिहिले होते. त्यावर अजून काही निर्णय झालेला नाही. त्याचबरोबर सदर केंद्राच्या संचालकाची नियुक्ती २००६ पर्यंतच करण्यात आली होती. २००९ नंतर सदर केंद्राच्या संचालकपदी नियुक्ती करण्यात आली नाही.

ओबेराय सेंटर फॉर एक्सलेन्स :

नवीन पिढीच्या विद्यार्थ्यांना संधी देण्यासाठी उत्कृष्टता (OCE) ची स्थापना करण्यात आली. भारतीयांनी त्यांच्या पूर्ण करिअर क्षमतेचे पोषण करणे आणि ते लक्षात घेणे.

OCE ची दृष्टी प्रगत निर्माण करण्यासाठी शिक्षणात जागतिक दर्जाच्या पद्धती आणणे, व्यावसायिकरित्या चालवलेले कार्यक्रम तांत्रिक क्रांती साधारणपणे उत्पादकता आणि कार्यक्षमता वाढवते. तांत्रिक क्रांती मानवी भौतिक परिस्थितीचे पूर्नलेखन करते अस्तित्व आणि संस्कृतीला आकार देऊ शकते. हे साखळीच्या ट्रिगर म्हणून भूमिका बजावू शकते विविध आणि अप्रत्यक्षित बदल.

OCE नवीन देण्याची भूमिका बजावते. विद्यार्थ्यांना एज टेक्नॉलॉजी आणि म्हणून OCE विविध कार्यक्रमांचे आयोजन करते. HTML वापरून वेब पेज डिझाईनशी संबंधित ग्राफिक डिझाईन तत्त्वांची ओळख करून देण्यासाठी आणि सिद्धांतांना व्यवहारात कसे अंमलात आणायचे ते शिकविण्यासाठी वेब साईटच्या उपयोगितेचे विश्लेषण करण्याचे कौशल्य विकासित करण्याकरिता कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेचा मुख्य उद्देश मुलाखतीची रणनीती विकसित करणे, संवाद कौशल्य वाढविणे आणि विद्यार्थ्यांना त्यांच्या सध्याच्या कौशल्य पातळीचे मुल्यांकन करण्यासाठी आणि सुधारणेसाठी क्षेत्रे ओळखण्यासाठी व्यासपीठ प्रदान करणे हा आहे.

दि. २८, २९ आणि ३१ मार्च, २०२३ रोजी 'Resume Writing' या विषयावर ३ दिवसीय लेखन कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. Biometrics & Pattern Recognition, Machine Learning, Digital Image Processing, Soft Computing या मूलभूत संकल्पना जाणून घेण्यासाठी व बायोमेट्रीक्स तंत्रज्ञानाचे सखोल ज्ञान मिळविण्यासाठी बायोमेट्रीक्स या विषयावर अतिथी व्याख्यान डॉ. अरविंद सेवाल, सहायक प्राध्यापक, केंद्रीय विद्यापीठ, जम्मू यांनी दिले. Python Basics आणि OOP संकल्पना जाणून घेण्यासाठी पायथनच्या मूलभूत गोष्टी, फाईल हाताळणी आणि काँक्रीट मॉडेलिंगसाठी Object Oriented Programming दृष्टीकोन, कारसारख्या वास्तविक जगातील गोष्टी, तसेच कंपन्या आणि कर्मचारी, विद्यार्थी आणि शिक्षक इत्यादी गोष्टींमधील संबंधाचे सखोल ज्ञान मिळविण्यासाठी कार्यशाळा आयोजित केली जाते. MS Excel हे सामान्यत: वापरले जाणारे Microsoft Office Application आहे जो संख्यात्मक डेटा जतन आणि विश्लेषण करण्यासाठी वापरला जातो. Excel पृथ्वीवरील सर्वोत्कृष्ट स्प्रेडशीट अप्लीकेशन बनवते ते म्हणजे त्याची गणना करण्याची क्षमता एक्सेलमध्ये, तुमच्याकडे फंक्शनची संपूर्ण यादी आहे जी तुम्ही गणनेसाठी वापरू शकता.

क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग :

आंतर–महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धा :

विभागाचे वतीने ९४ (पुरुष/महिला) खेळांच्या आंतर–महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धाचे आयोजन नागपूर, वर्धा, भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यांतील विविध महाविद्यालयांच्या/संस्थेच्या मैदानावर करण्यात आले.

निवड चाचणीचे आयोजन संघ निवड :

क्रीडा महोत्सव, पश्चिम क्षेत्रीय आणि अखिल भारतीय आंतर–विद्यापीठ क्रीडा स्पर्धासाठी आंतर–महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धाचे समाप्तीनंतर निवड चाचणीचे आयोजन विभागातर्फे करण्यात आले. क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाद्वारे गठीत निवड समिती सदस्यांनी या निवड चाचणीच्या आधारे विद्यापीठाचा संघ निवडला व निवड झालेल्या संघाचे प्रशिक्षण शिबीर आयोजित करण्यात आले.

खेलो इंडिया विद्यापीठ खेळ :

दि. १ ते ६ जून, २०२३ रोजी बनारस हिंदू विद्यापीठ वाराणसी येथे झालेल्या खेलो इंडिया आंतर–विद्यापीठ योगासन पुरुष स्पर्धा/महिला स्पर्धेत विद्यापीठाच्या टिमने दुसरे स्थान पटकाविले. दि. २६ ते २९ मे, २०२३ रोजी बनारस हिंदू विद्यापीठ वाराणसी येथे झालेल्या खेलो इंडिया आंतर–विद्यापीठ स्पर्धेत श्री. रोहित पुरुष कुस्ती फ्री स्टाईलमध्ये तिसरे स्थान (१२५ कि.ग्रॅ.) पुरुष कुस्ती ग्रीको रोमन स्पर्धेत श्री. तरुण वत्स प्रथम स्थान (६३ कि.ग्रॅ.) व श्री. पुष्पक सहरावत तिसरे स्थान (९७ कि.ग्रॅ.) तसेच कु. खुशी राणी हिने कुस्ती फ्री स्टाईल महिला स्पर्धेत दुसरे स्थान (६३ कि.ग्रॅ.) पटकाविले. दि. ३१ मे ते ३ जून, २०२३ रोजी एकाना स्पोर्टस् सिटी ग्राउंड, लखनौ येथे झालेल्या खेलो इंडिया आंतर–विद्यापीठ फेन्सिंग महिला स्पर्धेत कु. श्रुती जोशी यांनी तिसरे स्थान (सायबर इव्हेंट) पटकाविले.

दि. २९ मे ते २ जून, २०२३ रोजी एस. व्ही. एस. पी. क्रीडा संकुल, जी. बी. नगर, उत्तरप्रदेश येथे झालेल्या खेलो इंडिया आंतर–विद्यापीठ बॉक्सिंग महिला स्पर्धेत कु. अल्फिया तरन्नुम पठाण प्रथम स्थान (८१+ कि.ग्रॅ.) पटकाविले. दि. २९ ते ३१ मे, २०२३ रोजी गुरू गोविंद सिंग स्पोर्टस् कॉलेज, लखनौ येथे झालेल्या खेलो इंडिया आंतर–विद्यापीठ ॲथलिटेक्स पुरुष स्पर्धेत श्री. सौरव तिवारी यांनी तिसरे स्थान (३००० Steeplechase) पटकाविले.

पश्चिम क्षेत्रीय आणि अखिल भारतीय विद्यापीठ खेळ :

दि. २६ डिसेंबर, २०२२ ते १ जानेवारी, २०२३ रोजी एम. डी. विद्यापीठ, रोहतक येथे झालेल्या अखिल भारतीय आंतर–विद्यापीठ बॉक्सिंग महिला स्पर्धेत कु. अल्फिया तरन्नुम पठाण हिने प्रथम स्थान (८१+ कि.ग्रॅ.) पटकाविले.

दि. १३ ते १६ मे, २०२३ रोजी तामिळनाडू शारीरिक शिक्षण आणि क्रीडा विद्यापीठ, चेन्नई येथे झालेल्या अखिल भारतीय आंतर–विद्यापीठ ॲथेलिटैक्स पुरुष/महिला स्पर्धेत श्री. शादाब पठाण यांनी प्रथम स्थान (५००० मी.) आणि कु. प्राजक्ता गोडबोले हिने दुसरे स्थान (अर्ध मॅरेथॉन) पटकाविले.

दि. ०७ ते ११ फेब्रुवारी, २०२३ रोजी अखिल भारतीय आंतर–विद्यापीठ वुशू पुरुष/महिला स्पर्धा चंदीगढ विद्यापीठ, चंदीगढ येथे झालेल्या श्री. मोहित यादव तिसरे स्थान (८० कि.ग्रॅ.), श्री. आर्यन यादव तिसरे स्थान (५६ कि.ग्रॅ.) कु. शिवानी देवासे प्रथम स्थान (लवचिक शस्त्र) कु. दृष्टी नेरीकर तृतीय स्थान (शौगीजन) कु. जान्हवी टिचुले, अष्लेशा वर्मा, रुचिका टेंभरे हिने दुसरे स्थान पटकाविले.

दि. १३ ते १६ मार्च, २०२३ रोजी ए. एम. आई. टी. विद्यापीठ, चेन्नई येथे झालेल्या अखिल भारतीय आंतर–विद्यापीठ बुद्धिबळ पुरुष स्पर्धेमध्ये बुद्धिबळ पुरुष टिमने तिसरे स्थान पटकाविले. दि. २२ ते २४ फेब्रुवारी, २०२३ रोजी आई. टी. एम. विद्यापीठ, जयपुर येथे झालेल्या अखिल भारतीय आंतर–विद्यापीठ फ्लोअरबॉल महिला स्पर्धेमध्ये महिला टिमने तिसरे स्थान पटकाविले

दि. २४ ते २६ मार्च, २०२३ रोजी अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कॅनोइंग आणि कयाकिंग महिला स्पर्धा पंजाब विद्यापीठ, करनाल येथे झालेल्या स्पर्धेत कु. निकिता शेंडे प्रथम स्थान (K-1 200), कु. निकिता शेंडे तृतीय स्थान (K-1 1000) कु. सबिना लेंगडे तृतीय स्थान (C-1 1000), कु. सबिना लेंगडे दुसरे स्थान (C-2 200), कु. सबिना लेंगडे तिसरे स्थान (canoesla nule), कु. मुस्कान उके दुसरे स्थान (K-2 1000), कु. मुस्कान उके, अंचल भुरे, वैष्णवी अजबळे आणि संजना कंगाळे तिसरे स्थान (K-4 1000) तसेच कॅनोइंग आणि कयाकिंग महिला टिमने तिसरे स्थान पटकाविले.

दि. २७ ते २९ मार्च, २०२३ रोजी अखिल भारतीय आंतर–विद्यापीठ कॅनोइंग आणि कयाकिंग महिला स्पर्धा पंजाब विद्यापीठ, करनाल येथे झालेल्या कॅनोइंग आणि कयाकिंग पुरुष टिमने दुसरे स्थान पटकाविले.

दि. २ ते ६ एप्रिल, २०२३ रोजी सुरेश ज्ञान विहार विद्यापीठ, जयपुर येथे झालेल्या अखिल भारतीय आंतर–विद्यापीठ वुडबॉल स्पर्धेत वुडबॉल महिला टिमने प्रथम स्थान, वुडबॉल पुरुष टिमने दुसरे स्थान तसेच कु. अनिषा रामनिवास आणि श्री. अमोल मुंदरे यांनी प्रथम स्थान (दुहेरी वैयक्तिक मिक्स), कु. नम्रता सिंग बघेल व श्री. आदित्य

मंत्री यांनी दुसरे स्थान (स्ट्रोक इव्हेंट मिक्स डबल) श्री. हर्षल वानखेडे यांनी दुसरे स्थान (स्ट्रोक सिंगल इव्हेंट) पटकाविले.

दि. ६ ते ९ जानेवारी, २०२३ रोजी तामिळनाडू शारीरिक शिक्षण आणि क्रीडा विद्यापीठ, चेन्नई येथे झालेल्या साउथ वेस्ट आंतर–विद्यापीठ ॲथलेटिक्स स्पर्धेत कु. प्राजक्ता गोडबोले हिने प्रथम स्थान (१०००० मीटर धावणे) व दुसरे स्थान (२१ किमी हाफ मॅरेथॉन) मध्ये पटकाविले.

दि. २० ते २३ डिसेंबर, २०२२ रोजी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे झालेल्या पश्चिम क्षेत्र आंतर–विद्यापीठ बॅडमिंटन महिला स्पर्धेत बॅडमिंटन महिला टिमने तिसरे स्थान पटकाविले.

दि. १५ ते १९ नोव्हेंबर, २०२२ रोजी इंदिरा गांधी नॅशनल ट्रायबल विद्यापीठ, अमरकंटक येथे झालेल्या पश्चिम क्षेत्र आंतर–विद्यापीठ बुध्दिबळ पुरुष स्पर्धेत बुध्दिबळ पुरुष टिमने तिसरे स्थान पटकाविले. दि. २० ते २३ डिसेंबर, २०२२ रोजी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथे झालेल्या पश्चिम क्षेत्र आंतर–विद्यापीठ कबड्डी महिला स्पर्धेत कबड्डी महिला टिमने प्रथम स्थान पटकाविले.

दि. २७ ते ३१ डिसेंबर, २०२२ रोजी छत्रसाल बुंदेलखंड विद्यापीठ, सागर येथे झालेल्या पश्चिम क्षेत्र आंतर–विद्यापीठ हँडबॉल पुरुष स्पर्धेत हँडबॉल पुरुष टिमने तिसरे स्थान पटकाविले.

दि. १६ ते १९ फेब्रुवारी, २०२३ रोजी आंध्र विद्यापीठ, विशाखापट्टणम येथे झालेल्या अखिल भारतीय आंतर–विद्यापीठ रोलर स्केटिंग महिला स्पर्धेत कु. कस्तुरी तांभणकर दुसरे स्थान (१०००० मीटर ट्रॅक रेस) (१ लॅप शर्यत), कु. जान्हवी कडू तिसरे स्थान (१००० मीटर रस्ता शर्यत) दुसरे स्थान (१०००० मीटर रस्ता शर्यत), कु. संस्कृती दवंडे हिने तिसरे स्थान (१००मीटर रोड स्प्रिंट) पटकाविले.

क्रीडा महोत्सव आंतर–विद्यापीठ खेळ :

दि. ०३ ते ०७ डिसेंबर, २०२२ रोजी डॉ. बाबासोहब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे झालेल्या क्रीडा महोत्सव आंतर–विद्यापीठ व्हॉलीबॉल पुरुष स्पर्धा व्हॉलीबॉल पुरुष टिमने/महिला टिमने दुसरे स्थान पटकाविले. तसेच कबड्डी महिला टिमने/बास्केटबॉल पुरुष टिमने दुसरे स्थान पटकाविले. त्याचप्रमाणे श्री. शादाब पठाण दुसरे स्थान (१५०० मीटर धावणे), (५००० मीटर धावणे), श्री. अजय शर्मा तिसरे स्थान (लांब उडी), श्री. आशुतोष बावणे तिसरे स्थान (८०० मीटर धावणे), श्री. शुभम रॉय, आदर्श भुरे, विभास्कर कुमार आणि अजय शर्मा यांनी तिसरे स्थान (४ X १०० मीटर रिले), श्री. शुभम रॉय, अजय शर्मा, मुकेश ठाकुर आणि आशुतोष बावणे यांनी दुसरे स्थान (४ X ४०० मीटर रिले), कु. प्राजक्ता गोडबोले हिने तिसरे स्थान (१५०० मीटर धावणे), प्रथम स्थान (५००० मीटर धावणे), कु. उन्नती चिलकेवार दुसरे स्थान (लांब उडी), तिसरे स्थान (तिहेरी उडी), कु. साक्षी तंबाखे तिसरे स्थान (४०० मीटर धावणे), कु. साक्षी तंबाखे, सानिका मंगर, नेहा ढबाले, निकिता सराटे तिसरे स्थान (४ X १०० मीटर रिले) पटकाविले.

■■■

।। प्रकरण पाचवे ।।

विद्यापीठ विकास योजना

■ प्रकरण पाचवे
विद्यापीठ विकास योजना

दि. १.७.२०२२ ते ३०.६.२०२३ या कालावधीत महाविद्यालय विकास विभागाअंतर्गत खालील प्रकारची कामे करण्यात आलीत.

१. महाविद्यालयांचे स्थायी संलग्नीकरण :

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या खालील महाविद्यालयांनी परिनियम क्र. १/२०१० व ७/२०१० आणि ५/२०१६ अंतर्गत स्थायी संलग्नीकरण मिळवण्याकरिता प्रस्ताव विद्यापीठास प्राप्त झाले.

१) संताजी महाविद्यालय, वर्धा रोड, नागपूर
२) शंकरलाल अग्रवाल सायन्स कॉलेज, सालेकसा, जि. गोंदिया

२. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठांशी संलग्नित असलेल्या खालील महाविद्यालयांनी परिनियम क्र. १/२०१० व ७/२०१० आणि ५/२०१६ अंतर्गत स्थायी संलग्निकरण प्रदान केले. १) ताई गोळवलकर विज्ञान महाविद्यालय, रामटेक, जि. नागपूर.

३. विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांना स्वायत्तता देण्याबाबत

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाशी संलग्नित खालील महाविद्यालयांनी स्वायत्तता देण्यासंबंधी युजीसी नियम एकरूप परिनियम क्र. ३/२०२३ नुसार स्वायत्तता मिळविण्याकरिता प्रस्ताव सादर केले आहे. अशा महाविद्यालयांची यादी खालीलप्रमाणे असून त्याबाबत कार्यवाही सुरू आहे.

१) बजाज कॉलेज ऑफ सायन्स, वर्धा
२) श्री. रामदेवबाबा कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड मॅनेजमेंट, रामदेव टेकडी, काटोल रोड, नागपूर

४. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाशी संलग्नित खालील महाविद्यालय/संस्थांना युजीसी नियम एकरूप परिनियम क्र. ३/२०२३ नुसार विद्यापीठाकडून स्वायत्तता देण्यात आलेली आहे.

१) प्रियदर्शिनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, प्रियदर्शिनी कॅम्पस, सीआरपीएफ जवळ, हिंगणा रोड, नागपूर
२) जे. डी. कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड मॅनेजमेंट, कळमेश्वर रोड, जि. नागपूर
३) झुलेलाल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, कोराडी रोड, लोणारा, नागपूर
४) यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, वानाडोंगरी, हिंगणा रोड, नागपूर (नूतनीकरणासह स्वायत्तता).

५. संलग्नित महाविद्यालयांना/संस्थांना उच्च अध्ययन व संशोधन कार्याकरिता मान्यता प्रदान करणे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठांतर्गत संलग्नित खालील महाविद्यालयांनी/संस्थांनी उच्च अध्ययन व संशोधन केंद्र मिळण्याकरिता निर्देश क्र. ११/२०२३ अंतर्गत सादर केलेल्या प्रस्तावावर कार्यवाही सुरू आहे.

१) लेडी अमृताबाई डागा कॉलेज फॉर वुमेन्स ऑफ आर्टस, कॉमर्स ॲन्ड सायन्स ॲन्ड श्रीमती रत्नीदेवी पुरोहित कॉलेज ऑफ होम सायन्स ॲन्ड होम सायन्स टेक्नालॉजी, शंकरनगर, नागपूर **(नूतनीकरणासह)**
२) धनवटे नॅशनल कॉलेज, काँग्रेस नगर, नागपूर **(नूतनीकरणासह)**
३) इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्यूटिकल एज्युकेशन ॲन्ड रिसर्च, बोरगाव (मेघे) वर्धा **(नूतनीकरणासह)**
४) के. डी. के. कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, नागपूर **(नूतनीकरणासह)**
५) यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, हिंगणा रोड, नागपूर **(नूतनीकरणासह)**
६) सेठ केसरीमल पोरवाल कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड सायन्स ॲन्ड कॉमर्स, कामठी, जि. नागपूर **(नूतनीकरणासह)**

६. संलग्नित महाविद्यालयांना/संस्थांना युजीसी कायदा १९५६ अंतर्गत १२ बी मान्यता प्रदान केलेल्या महाविद्यालयांची यादी.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठांतर्गत संलग्नित एक महाविद्यालय/संस्था यांना उपरोक्त कालावधीत युजीसीच्या नियमानुसार १२ बी अंतर्गत मान्यता प्रदान करण्यात आली. १) प्रियदर्शिनी जे. एल. कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, न्यु नंदनवन नागपूर.

७. संलग्नित महाविद्यालयांना/संस्थांना 2 (F) मान्यता प्रदान करणे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठांतर्गत संलग्नित खालील महाविद्यालयांना/संस्थांना यूजीसीच्या नियमानुसार 2 (F) अंतर्गत मान्यता प्रदान करण्यात आली आहे. १) श्री. निकेतन आर्टस कॉमर्स कॉलेज तुळशीबाग रोड, रेशिमबाग, नागपूर २) वैनगंगा कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड मॅनेजमेंट, डोंगरगाव, वर्धारोड, नागपूर.

८. संलग्नित महाविद्यालयांना/संस्थांना उच्च अध्ययन व संशोधन कार्याकरिता मान्यता प्रदान करणे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठांतर्गत संलग्नित खालील महाविद्यालयांना/संस्थांना उच्च अध्ययन व संशोधन केंद्र म्हणून मान्यता प्रदान करण्याकरिता परिनियम क्र. ६/२०१५ व निर्देश क्र. ६/२०२१ आणि निर्देश क्र. २७/२०२१ आणि निर्देश क्र. ११/२०२३ अंतर्गत प्रस्ताव सादर केले होते. त्यानुसार मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

अनु. क्र.	महाविद्यालयांचे नावे	विषय/ विभाग
१)	कमला नेहरू महाविद्यालय, सक्करदरा चौक, नागपूर **(नूतनीकरणासह)**	भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेअंतर्गत विषय : वाणिज्य, व्यवसाय व्यवस्थापन, व्यवसाय प्रशासन, व्यवसाय अर्थशास्त्र, अकाऊंट व सांख्यिकी
२)	बजाज कॉलेज ऑफ सायन्स, वर्धा **(नूतनीकरणासह)**	रसायनशास्त्र, वनस्पतिशास्त्र
३)	बजाज कॉलेज ऑफ सायन्स, वर्धा	प्राणिशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र
४)	दादासाहेब बालपांडे कॉलेज आफ फार्मसी, बेसा, नागपूर **(नूतनीकरणासह)**	औषधिनिर्माणशास्त्र
५)	श्री. रामदेवबाबा कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड मॅनेजमेंट, रामदेव टेकडी, काटोल रोड नागपूर (नुतनीकरणासह)	इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरिंग, सिव्हील इंजिनिअरिंग, इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग, व्यवसाय प्रशासन, व्यवसाय व्यवस्थापन (एम. बी. ए.)
६)	डॉ. एम. के. उमाठे कॉलेज, भामटी रिंग रोड, नागपूर	इंग्लिश
७)	जी. एच. रायसोनी इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग टेक्नॉलाजी, श्रद्धा पार्क बी–३७/३९/१, एमआयडीसी, हिंगणा–वाडी लिंक रोड, नागपूर	मेकॅनिकल इंजिनिअरिंग, सिव्हील इंजिनिअरिंग, इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड टेलीकम्युनिकेशन इंजिनिअरिंग
८)	कुंभलकर कॉलज ऑफ सोशल वर्क, सेवाग्राम रोड, काकावाडी, वर्धा	सोशल वर्क
९)	तायवाडे कॉलेज, कोराडी, जि. नागपूर **(नूतनीकरणासह)**	वनस्पतिशास्त्र, संगणकशास्त्र
१०)	महिला महाविद्यालय, नंदनवन, नागपूर **(नूतनीकरणासह)**	इंग्लिश, गृहअर्थशास्त्र
११)	श्रीमती किशोरीताई भोयर कॉलेज ऑफ फार्मसी, कामठी, जि. नागपूर **(नूतनीकरणासह)**	औषधिनिर्माणशास्त्र
१२)	मातृसेवा संघ इन्स्टिट्यूट ऑफ सोशल वर्क, बजाजनगर, नागपूर **(नूतनीकरणासह)**	सोशल वर्क
१३)	सेवादल महिला महाविद्यालय, उमरेड रोड, नागपूर	सूक्ष्मजीवशास्त्र
१४)	व्ही. एम. व्ही. कॉमर्स, जे. एम. टी. आर्टस ॲन्ड जे. जे. पी. सायन्स कॉलेज, वर्धमाननगर, नागपूर	इंग्लिश
१५)	विद्या विकास आर्टस कॉमर्स ॲन्ड सायन्स कॉलेज, समुद्रपूर, जि. वर्धा	रसायनशास्त्र, वनस्पतिशास्त्र, गणित, प्राणिशास्त्र, भौतिकशास्त्र
१६)	एस. बी. जैन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, मॅनेजमेंट ॲन्ड रिसर्च, काटोल रोड, नागपूर	इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड टेलीकम्युनिकेशन इंजिनिअरिंग
१७)	नबीरा महाविद्यालय, काटोल, जि. नागपूर	वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेअंतर्गत विषय : वाणिज्य, व्यवसाय व्यवस्थापन, व्यवसाय प्रशासन, व्यवसाय अर्थशास्त्र, अकाऊंट व सांख्यिकी
१८)	तिरपुडे कॉलेज सोशल वर्क, सिव्हील लाईन्स, नागपूर **(नूतनीकरणासह)**	सोशल वर्क

नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ :

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या कलम २०(१) नुसार संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य विभागाच्या अंर्तगत येणारे मंडळाची कार्य दिनांक १.७.२०२२ ते ३०.६.२०२३ पर्यंत खालीलप्रमाणे दर्शविले आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या कलम ५३(३) नवोपक्रम, नवसंशोधन व उपक्रम मंडळ

नवोपक्रमाच्या संकल्पनेचा प्रसार करण्यासाठी आणि ज्यामुळे अंतिमत: उपक्रम निर्मिती होते अशा नवसंशोधन प्रक्रियेद्वारे नवनवीन कल्पना, कार्यकारी प्रतिमानांमध्ये पोषक वातावरण निर्मिती करण्याकरिता व ती रुजवण्याकरिता एक नवोपक्रम, नवसंशोधन व उपक्रम मंडळ आहे.

नवोपक्रम, नवसंशोधन व उपक्रम मंडळाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विद्यापीठात एक स्वतंत्र नवोपक्रम, नवसंशोधन व उपक्रम केंद्र स्थापन करेल हे केंद्र, मंडळाकडून वेळोवेळी नेमूण देण्यात येतील असे अधिकार वापरेल व अशी कर्तव्ये पार पाडेल.

भारतीय विज्ञान काँग्रेस:

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर अंतर्गत ३ जानेवारी ते ७ जानेवारी, २०२३ या कालावधीत महात्मा जोतिबा फुले परिसर अमरावती रोड, नागपूर येथे १०८ व्या भारतीय विज्ञान काँग्रेसचे आयोजन करण्यात आले होते. १०८ व्या भारतीय विज्ञान काँग्रेसचे कार्यक्रम हे दीर्घ काळानंतर मिळाल्याने ही बाब सन्मानाची आहे. त्याचप्रमाणे नोबल पारितोषिक विजेते जगभरातील शास्त्रज्ञ, शिक्षक, उद्योग जगातील तसेच संपूर्ण भारतातील विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या भव्य झालेल्या कार्यक्रमासाठी अंदाजे १० हजार प्रतिनिधी उपस्थित राहिले होते व स्थापनेचे शताब्दी वर्ष साजरे करण्याचा एक भाग म्हणून विद्यापीठातील मुख्य शैक्षणिक परिसरामध्ये करण्यात आला. ३ जानेवारी, २०२३ रोजी या १०८ व्या भारतीय विज्ञान काँग्रेसचे उद्घाटन भारताचे माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदीजी यांच्या हस्ते आभासी पद्धतीने करण्यात आले व कार्यक्रमादरम्यान मा. श्री. जितेंद्र सिंह, केंद्रीय विज्ञान राज्यमंत्री स्वातंत्र प्रभार आणि तंत्रज्ञान पृथ्वी विज्ञान, मा. श्री. भगत सिंह कोश्यारी, कुलपती आणि राज्याचे राज्यपाल व मा. श्री. नितीन गडकरी, माननीय अध्यक्ष सल्लागार शताब्दी उत्सव समिती आणि केंद्रीय रस्ते वाहतुक मंत्री आणि महामार्ग, मा. श्री. एकनाथ शिंदे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, मा. श्री. देवेन्द्र फडणवीस उपमुख्यमंत्री, डॉ. विजयारलक्ष्मी सक्सेना, जनरल अध्यक्ष, भारतीय विज्ञान काँग्रेस संस्था, विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी व अध्यक्ष आयोजन समिती १०८ वी भारतीय विज्ञान काँग्रेस उपस्थित होते आणि त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यकारिणी आणि परिषदेचे सर्व सदस्य व्यासपीठावर उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. या विज्ञान काँग्रेसचा एक भाग म्हणून द प्राईड ऑफ इंडिया एक्सपो या विज्ञान प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले होते आणि ते पाहुण्यांसाठी खुले करण्यात आले.

तसेच दि. ४ जानेवारी, २०२३ रोजी आदिवासी विज्ञान काँग्रेसचे आयोजन करण्यात आले होते. कु. माया कोरेटी यांनी गायलेल्या स्वागतपर गीत, डॉ. एस. रामक्रिष्णा, सचिव, (सदस्यत्व व्यवहार), भारतीय विज्ञान काँग्रेस संस्था यांनी व्यासपीठावरील सर्व मान्यवरांचे स्वागत केले प्रा. शामराव कोरेटी यांचे प्रास्ताविक केले. डॉ. संजय दुधे माननीय प्र. कुलगुरू कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते संस्कृतीवर प्रेक्षकांचे मार्गदर्शन केले, बांबू, हस्तकला, औषधिशास्त्र आणि इतर उपजिविकेच्या पद्धती ते म्हणाले की, पारंपारित उपचार करण्याकडे ज्ञानाचा मोठा खजिना आहे. शेवटी सत्राचे अध्यक्ष डॉ. प्रशांत बोकारे यांनी स्वागत केले आदिवासी विज्ञान काँग्रेस देशी ज्ञान मिळण्यासाठी एक पाऊल पुढे आहे. डॉ. सचिन भोगेकर यांनी आभार मानले. तिसरे सत्र अदिवासी नेतृत्व भाषणावर संचालक डॉ. रामदास आत्राम, श्री. दिनेश शेरामजी, राजेंद्र मरसकोल्हे, प्रा. मधुकर उईके, एम. एम. आत्राम आणि कोकाडे यांनी आदिवासीची सद्य:स्थिती आणि त्यांच्या समस्यांवर भाष्य केले समारोप सत्राचे प्रास्ताविका डॉ. दत्तात्रय वाटमोडे, अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा डॉ. केशव वाकडे यांनी केली. त्याचप्रमाणे महिला विज्ञान काँग्रेस ही भारतीय विज्ञान काँग्रेसचा महत्त्वाचा कार्यक्रम होता. हा कार्यक्रम काँग्रेसचा आकर्षण ठरला कारण 'स्त्री सक्षमीकरणासह शाश्वत विकासासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञान' ही थीम होती. महिला विज्ञान काँग्रेसचे उदघाटन ५ जानेवारी, २०२३ रोजी पदमश्री सुश्री राहीबाई पोपरे (बीजमाता) यांच्या हस्ते झाले. प्रमुख पाहुण्या श्रीमती कांचन गडकरी आणि डॉ. विजयालक्ष्मी सक्सेना कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या, डॉ. एस. आर. चौधरी, कुलगुरू राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर डॉ. एस. रामकृष्ण, सरचिटणीस आणि डॉ. मेडिरता, प्रमुख किरण विभाग हेही उपस्थित होते आणि त्यांनी सहभागींना मार्गदर्शन केले. महिला विज्ञान काँग्रेसच्या निमंत्रक डॉ. कल्पना पांडे यांनी प्रस्ताविक करून कार्यक्रमाची सुरूवात केली. थीमच्या विविध पैलूंवर काम करणाऱ्या बारा नामवंत महिला शास्त्रज्ञांनी मौल्यवान भाषण केले आणि महिला सक्षमीकरणासाठी उपयुक्त विज्ञानाचा सध्याचा कल आणि भविष्य याविषयी माहिती दिली. महिला विज्ञानाच्या या कार्यक्रमामध्ये सुमारे १०० महिला व्यक्तिमत्त्वांनी देखील सहभाग घेतला आणि त्यांनी त्यांचे अनुभव आणि महिला

सक्षमीकरण कार्या/स्थिती त्यांच्या ठिकाणी किंवा अध्याय स्तरावर शेअर केली. या कार्यक्रमात सुमारे ४००० महिला सहभागी झाल्या होत्या. शेवटचे सत्र ६ जानेवारी, २०२३ रोजी समापन कार्यक्रम होता. समापन कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे नोबल विजेते डॉ. अडायोनाथ, इस्रायल आणि सन्माननीय अतिथी डॉ. हगीथ योनाथ, इस्रायल होते. समापन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. विजयालक्ष्मी सक्सेना होत्या आणि डॉ. एस. आर. चौधरी, डॉ. एस. रामकृष्ण आणि डॉ. कल्पना पांडे उपस्थित होते.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूरला दि. ३ ते ७ जानेवारी, २०२३, १०८ व्या भारतीय विज्ञान काँग्रेस एक्स्पोच्या प्रमुख आकर्षणांपैकी एक भारतीय विज्ञान काँग्रेस मध्ये भारताच्या विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या विकासाचे प्रदर्शन केले विविध फील्ड द प्राइड ऑफ इंडिया एक्स्पो जो भारतीय विज्ञान काँग्रेस सह एकाच वेळी आयोजित केला जातो एक उत्कृष्ट व्यासपीठ उदयास आले आहे. जेथे उद्योग, सरकारी विभाग, राज्ये, शिक्षणतज्ज्ञ संस्था कॉर्पोरेशन इतर एकत्र येतात आणि प्रदर्शन करतात, परस्पर कायदेशीर सहयोग द प्राइड ऑफ इंडिया एक्स्पो, एक प्रमुख १०८ व्या भारतीय विज्ञान काँग्रेसचे आकर्षण आणि अग्रक्रमानुसार ते होते. माननीय केंद्रीय राज्यमंत्री (स्वतंत्रप्रभार) विज्ञान आणि तंत्रज्ञान पृथ्वी विज्ञान, माननीय श्री. जितेंद्र सिंग यांच्या उपस्थितीत उपमुख्यमंत्री श्री. देवेन्द्र फडणवीस, डॉ. लक्ष्मी सक्सेना, जनरल अध्यक्ष भारतीय विज्ञान काँग्रेस, डॉ. सुभाष चौधरी मा. कुलगुरू, नागपूर विद्यापीठ आणि इतर मान्यवर पी ओ एक्स्पो मध्ये नवीन कल्पना, नवकल्पना आणि उत्पादने यांचा संगम दिसून आला वैज्ञानिक जगाचा संपूर्ण कॅनव्हास. अत्याधुनिकतेचे ते भव्य प्रदर्शन होते. महाराष्ट्र राज्याच्या यजमान राज्य पॅव्हेलियनने पुढाकार घेतला राज्यातील विविध भाग एक्स्पोला उदंड प्रतिसाद मिळाला शास्त्रज्ञ, धोरणकर्ते, प्रतिनिधी, विद्यार्थी, सामान्य जनता इ. 'हॉल ऑफ प्राइड' हा भारतीय विज्ञान काँगेस आणि पी ओ आय एक्स्पोमध्ये एक थीम पॅव्हेलियन आहे. प्रख्यात महिला शास्त्रज्ञ हॉल ऑफ प्राइडमधील पॅनेलमध्ये त्यांचे हायलाइट करत आहेत विज्ञान आणि उद्योग या दोन्हीसाठी सिद्धी आणि योगदान इरावती कर्वे, अण्णा मणी, कमल रणदिवे, बिमला बुटी, असिमा चॅटर्जी, मेरी पूनेन लुकोस, देबाला मित्रा, आनंदीबाई गोपाळराव जोशी, कादंबिनी गांगुली आणि कात्यायन दिनशॉ यजमान राज्य महाराष्ट्र राज्य सरकारने स्टार्टअपसाठी घेतलेल्या उपक्रमांचे आणि धोरणांचे प्रतिनिधित्व केले. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी विज्ञान ज्योती ज्ञानाच्या ज्योतीला जबरदस्त झळाळी मिळाली.

युवकांमध्ये विज्ञान हे एक करिअर म्हणून अशाप्रकारे वैज्ञानिक आणि नवकल्पक तयार करणे भविष्य यावर्षी प्र—कुलगुरू डॉ. संजय दुधे यांनी विज्ञान ज्योतीला हिरवी झेंडी दाखवली. जीरो मॉईल इथे दि. १ जानेवारी, २०२३ रोजी डॉ. राजेश सिंह, डॉ. खडेकर स्थानिक सचिव आणि डॉ. कसबेकर, मा. कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी व नागपूर विद्यापीठचे ४०० हुन अधिक विद्यार्थी सोबत विज्ञान ज्योतीला नागपूर विद्यापीठ कॅम्पस मध्ये आणले व माननीय. राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांच्या हस्ते दीप प्रज्वलन केले. ३ जानेवारी ही मशाल एक्स्पोमध्ये प्रज्वलित राहीली व सर्व अभ्यागतांना वैज्ञानिक जीवन जगण्यासाठी प्रेरित करते.

राष्ट्रीय किशोर वैज्ञानिक संमेलन (चिल्ड्रन सायन्स काँग्रेस) भारतीय विज्ञान काँग्रेसचा भाग म्हणून ४ ते ६ जानेवारी, २०२३ पर्यत आयोजन करण्यात आले होते. राष्ट्रीय किशोर वैज्ञानिक संमेलन हे ज्ञानवर्धकांपैकी एक होते. मुलांमध्ये वैज्ञानिक स्वभाव टीकात्मक विचार आणि समस्या सोडवण्याच्या कौशल्यांना चालना देण्याचा या कार्यक्रमाचा उद्देश होता. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. सतीश वटे माजी संचालक CSIR निरी नागपूर होते. सन्माननीय अतिथी डॉ. मनोरंजन मोहंती, प्रमुख NCSTC नवी दिल्ली, डॉ. सुजित बॅनर्जी, संचालक NCSTC नवी दिल्ली, डॉ. ललित शर्मा, अध्यक्ष, शैक्षणिक समिती NCSC, डॉ. सुभाष चौधरी माननीय कुलगुरू राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर उद्घाटक माननीय अध्यक्ष डॉ. विजयालक्ष्मी सक्सेना व सर्व मान्यवरांच्या हस्ते औपचारिक उद्घाटन करण्यात आले. उद्घाटन झाल्यावर किशोर वैज्ञानिक यांच्या प्रकल्पांचे गोषवारा असलेल्या "रेज ऑफ होप" या गोषवारा पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले व तसेच भारताच्या कानाकोपऱ्यांतुन आलेले किशोर वैज्ञानिक (बाल शास्त्रज्ञ) यांच्या प्रकल्पांचा प्रदर्शनीचेही मान्यवरांनी उदघाटन केले. भारतातील प्रत्येक राज्याचे प्रतिनिधीत्व करणारे एकून १२३ किशोर वैज्ञानिक व शिक्षक सहभागी झाले होते. त्यापैकी ६० विद्यार्थी राष्ट्रीय विज्ञान काँग्रेसचे होते. ज्यांची राष्ट्रीय किशोर वैज्ञानिक संमेलनमध्ये भाग घेण्यासाठी NCSTC द्वारे निवड करण्यात आली होती आणि NCSTC द्वारे निवडलेल्या राष्ट्रीय बाल वैज्ञानिक २२ विद्यार्थी होते व महाराष्ट्रातील विदर्भ विभागातील २५ प्रकल्पासह ५१ विद्यार्थी विदर्भ विद्यार्थी विज्ञान मेळा या स्पर्धेच्या माध्यमातून निवडले गेले होते. आपल्या प्रिय राष्ट्राच्या विकासासाठी आणि उन्नतीसाठी त्यांना विज्ञान क्षेत्रात काम करण्यास प्रवृत्त करण्यासाठी महान भारतीय शास्त्रज्ञांची पोस्टर्स देखील प्रदर्शित करण्यात आली. किशोर वैज्ञानिक यांच्या प्रकल्पांना २०,००० हजारपेक्षा अधिक शालेय विद्यार्थी आणि ३५,००० हजारपेक्षा अधिक लोकांनी भेट दिली व पद्मश्री श्रीमती राहीबाई पोपरे (बियाणे माता) शेतकरी आणि संवर्धनवादी, अहमदनगर यांचे व्याख्यान 'वैज्ञानिकांना भेटा' या सत्रात आयोजित करण्यात आले होते. कीटकनाशके रसायने आणि अन्नधान्याच्या जनुकीय सुधारित वाणांच्या प्रभावाबद्दल तिने

आपल्या देशी बियाणांच्या संवर्धनाचे महत्त्व अधोरेखित केले. पुरातत्त्व विभागाचे संशोधक आशिष जैन यांच्या मदतीने पुरातत्त्व संशोधनातील विज्ञानाचे महत्त्व या विषयावर त्यांनी छोटेसे सत्रही केले. दि. ६ जानेवारी, २०२३ रोजी दुपारी ३ वाजता समापन समारंभ करण्यात आला. ज्याचे अध्यक्ष डॉ. विजयालक्ष्मी सक्सेना यांनी समारोप कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून श्री. उमेश कुमार रस्तोगी, संचालक व अतिथी डॉ. राजकुमार जोशी नवी दिल्ली, डॉ. प्रशांत कडू डीन–फॅकल्टी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर डॉ. ललित शर्मा, अध्यक्ष शैक्षणिक समिती डॉ. एस रामकृष्ण सिरचिटणीस भारतीय विज्ञान काँग्रेस, डॉ. निशिकांत राऊत यांनी प्रास्ताविक मत मांडले व आभार व्यक्त केले. कार्यक्रमाचे संयोजक डॉ. निशिकांत राऊत, डॉ. राजेश सिंह, डॉ. जी. एस खडेकर हे दोन्ही स्थानिक सचिव भारतीय विज्ञान काँग्रेस होते व कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्वांनी परिश्रम घेतले.

शेतकरी विज्ञान :

५ जानेवारी, २०२३ रोजी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या छत्राखाली भारतीय विज्ञान काँग्रेसच्या वतीने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, कॅम्पस येथे शेतकरी विज्ञान काँग्रेस आयोजित करण्यात आले होते. सकाळी ९.३० वाजता कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. बसंत कुमार दास, संचालक ICAR होते. कोलकत्ता आणि सन्माननीय अतिथी डॉ. शरद आर गडारव, कुलगुरू डॉ. पंजाबराव कृषी विद्यापीठ, अकोला अशिष पातुरकर, कुलगुरू अतुल वैध संचालक आणि पदमश्री श्रीमती राहीबाई पोपरे बीजमाता–शेतकरी आणि संरक्षण, अहमदनगर दीप प्रज्वलनाने करण्यात आले व त्यानंतर स्वागत करण्यात आले. पाहुणे आणि निमंत्रितांचे मार्गदर्शन कार्यक्रमाची सुरूवात स्वागतपर भाषणाने झाली पदमश्री राहीबाई पोपरे, बीजमाता–शेतकरी आणि संवर्धनवादी, अहमदनगर यांनी तिच्यातील भावना आणि यश शेअर केले. कार्यक्रमादरम्यान ए सीड 'मदर' म्हणून ओळखला जाणारा प्रवास तिने हायलाइट केले. आपल्या पुढच्या पिढीला शेतीचे ज्ञान असणे हाही संदेश तिने दिला. शेतकऱ्यांनी निसर्गावरील आपली अवलंबित्व वाढवायला हवी शेतकरी आत्महत्या कमी होतील सेंद्रिय शेतीचा प्रसार आणि अवलंब करण्यावर तिने मोठ्या प्रमाणावर लक्ष केंद्रित केले. डॉ. सुभाष चौधरी, कुलगुरू, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ त्यांनी पण आपले विचार मांडले या कार्यक्रमासाठी १००० हुन अधिक शेतकरी आणि संबंधित शास्त्रज्ञ उपस्थित होते. विविध क्षेत्रातील तज्ज्ञांच्या बोलविण्या व्यतिरीक्त १५ हुन अधिक प्रगतीशील शेतकऱ्यांनी त्यांचे अनुभव उपलब्धी शेअर करण्यासाठी मंचही शेअर केले.

या कार्यक्रमाला अंकुर सीडस नागपूर आणि सेंट्रल येथील दोन प्रदर्शनी स्टॉलने भरभरून दिले. स्वयंसेवक संघाच्या पद्धतीने हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला. योगेश निकम यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. प्रकाश इटनकर कार्यक्रमाचे निमंत्रक होते. डॉ. राजेश सिंह, स्थानिक सचिव, डॉ. जी. एस. खडेकर स्थानिक सचिव व डॉ. रीमा कमलानी या अतिथी होत्या. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व सभासदांनी परिश्रम घेतले.

या भारतीय विज्ञान काँग्रेसच्या शेवटच्या दिवशी ७ जानेवारी, २०२३ ला समापन सोहळा पार पडला व कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. विजयालक्ष्मी सक्सेना, विजयालक्ष्मी बिदरी विभागीय आयुक्त नागपूर डॉ. सुभाष चौधरी उपाध्यक्ष, डॉ. संजय दूधे प्र. कुलगुरू, रवि बुरडकर, डॉ. राजू हिवसे, डॉ. गोवर्धन खडेकर, आणि डॉ. राजेश सिंह यांनीही कार्यक्रमाला उपस्थिती लावली व कार्यक्रमादरम्यान सर्व पारितोषिक विजेत्यांना बक्षिसे/पदके देऊन गौरविण्यात आले भारतीय विज्ञान आयोजित केल्याबद्दल राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या टीमचे कौतुक केले कोणतीही अडचण न येता अतिशय व्यावसायिक पद्धतीने कार्यक्रम पार पाडण्यात आला. डॉ. खडेकर, स्थानिक सचिव यांनी प्रास्ताविक केले आणि आभार डॉ. राजेश सिंह स्थानिक सचिव यांनी मांडले.

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय साहचर्य मंडळ

उद्योग संस्था, विद्यापीठ व संशोधन केंद्र इतर संस्थेकडून आलेल्या सामंजस्य करारांचा (MOU) प्रस्तावांना छाननी करण्याकरिता राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय साहचर्य मंडळ गठीत केलेले स्क्रिनिंग समितीमध्ये सर्व विद्याशाखांच्या अधिष्ठाता व विषय तज्ज्ञ यांचा समावेश आहे. आलेल्या सामंजस्य करार छाननी करून संबंधित प्रस्ताव राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय साहचर्य मंडळ गठीत उपसमिती पुढे ठेवण्यात येते. तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय साहचर्य मंडळ उपसमितीत अध्यक्ष प्र–कुलगुरू व तज्ज्ञ सदस्यांचा समावेश असतो. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय साहचर्य मंडळाची अहवाल सभा एक तातडीची व एक नियमित अशा एकूण दोन सभा घेण्यात आल्या.

खालील औद्योगिक संस्था, विद्यापीठ व संशोधन संस्थेकडून आलेल्या सामंजस्य करारांवरील स्वाक्षरी करण्यात आली आहे.

अ. क्र.	सामंजस्य करार
१.	राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ आणि थॅलेसेमिया आणि सिकल सेल सोसयटी ऑफ इंडिया रूघवानी चाइल्ड केअर सेंटर आणि हॉस्पिटल, २२ सिंधनगर, मोहनलाल रूघवाणी मार्ग, जरिपटका, नागपूर. ४४००१४
२.	राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ आणि जिम लेबॉरटरी लिमिटेड व कंपनी नेल्सन चौक, एन. ए. डी. टी., नागपूर.
३.	राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ आणि सी. एस. आय. आर. नेशनल इंरोलमेंट इंजिनिअरिंग रिसर्च इन्स्टिट्यूट नागपूर.
४.	राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ आणि टेक्नोस्पेक्ट्रा एडटेक लिमिटेड कंपनी, नागपूर.
५.	राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ आणि होरिब इंडिया टेक्निकल इन्स्टिट्यूट, नागपूर.
६	राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ आणि युनिक इन्स्टिट्यूट ऑफ हायर लर्निंग लिमीटेड, नागपूर.

अधिष्ठाता मंडळ

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या कलम १६ मध्ये अधिष्ठात्याचे अधिकार व कर्तव्ये नमूद केल्याप्रमाणे अध्यापनाचा व संशोधनाचा दर्जा, विद्याशाखेतील अध्यापकांचे प्रशिक्षण, विद्याविषयक विकास, शैक्षणिक गुणवत्ता राखणे यासंबंधात विद्यापरिषदेने मान्यता दिलेल्या कार्यक्रमाचे विद्याविषयक नियोजन, विद्याविषयक लेखाजोखा तसेच विद्याविषयक धोरणांची अंमलबजावणी ह्यांचे नियोजन करण्यास जबाबदार आहे. तसेच कलम ३६(१) विद्यापीठाच्या विद्याविषयक कामकाजांमध्ये समन्वय साधण्यासाठी, त्यांचे निरीक्षण करण्यासाठी व ते कार्यान्वित करण्यासाठी आणि त्यावर देखरेख ठेवण्यासाठी अधिष्ठाता मंडळ आहे. विद्याविषयक संशोधन व विकास, उपक्रमशीलता, बौद्धिक संपदा हक्क, औद्योगिक नवसंशोधन व एकात्मिकृत नियोजनासाठी उद्योगांशी संबंध प्रस्थापित करणे या संबंधातील विद्यापीठ विकास योजना राबविण्यासाठी ते जबाबदार असेल आणि ते पदवीपूर्व व पदव्युत्तर विद्याविषयक अध्ययनक्रम व संलग्न महाविद्यालयांचा विकास यांचेही हे मंडळ नियोजन करील. त्यांचे संनियंत्रण करून व त्यास मार्गदर्शन करील व त्यात समन्वय साधेल.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ३७(१) नुसार अधिष्ठाता मंडळाचे अधिकार व कर्तव्ये यांचा समावेश असतो. त्याप्रमाणे हे मंडळ धोरणांची अंमलबजावणी व नियोजन करण्यास जबाबदार आहे.

अधिष्ठाता मंडळाच्या नियमित सभा २ व तातडीची सभा १२ एकूण १४ अहवाल सभा घेण्यात आल्या.

संशोधन मंडळ

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ५९(१) मध्ये दर्शविलेल्याप्रमाणे संशोधन कार्याची जोपासना करणे, त्यास चालना देणे व बळकटी आणणे यासाठी तसेच विद्यापीठ विभाग, महाविद्यालये व मान्यता प्राप्त परिसंस्था यामधील संशोधन कार्यासाठी योजना तयार करणे, समन्वय प्रस्थापित करणे, पर्यवेक्षण करणे व वित्तीय व्यवस्था उभी करणे. यासाठी एक संशोधन मंडळ आहे. संशोधन मंडळाची यावर्षी एक तातडीची सभा घेण्यात आली.

नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य विभागांनी खालील अध्यासनाचे प्रस्ताव शासनाकडे पाठविले आहे.

अ. क्र.	अध्यासनाचे नाव
१.	श्री झुलेलाल सेंटर फॉर सिंधी अध्यासन

■■■

विद्यापीठ विकास योजना

अहवालकाळात राज्यशासन तसेच केंद्र शासनाकडून मंजूर झालेली शिष्यवृत्ती खालीलप्रमाणे.

Sr. No.	Scheme Name	Name of Student	Name of Dept.	Amount
1.	DST-INSPIRE	1. Khushbu Rathi 2. Yatish Parhua	1. Physics 2. Physics	4,31,520/- 5,62,880/-
2.	Council of Scientific and Industrial Research	Shri. Chaitanya Borkar	Botany	20,000/-
3.	Industrial Council of Social Science Research	Neelima Deshmukh	Dept. of Law	3,72,500/-
4.	Industrial council of Medical Research	1. Biru Dudhbhate 2. Rupali Prasad	1. Pharmaceutics 2. Pharmaceutics	5,15,600/- 5,15,600/-
5.	Rajiv Gandhi National Fellowship	Avinash Kamble	Ambedkar Thought	2,32,800/-
Scheme Name		**Amount**		
Unnat Bharat Abhiyan		Rs. 15,00,000/- sanctioned for master's training program out of which 7,50,000/- was received.		

अहवालकाळात विद्यापीठाद्वारे विद्यार्थ्यांना मंजूर करण्यात आलेल्या साधारणनिधी अंतर्गत शिष्यवृत्ती/फेलोशिपचा तपशील :

वर्ष		स्कॉलरशिप नाव	लाभार्थी विद्यार्थी	रक्कम
१.	साधारण आणि दाननिधी अंतर्गत	आर. टी. एम. पीएच. डी. फेलोशिप	४४	२५,१२,०००=००
	३० जून २०२३ पर्यंतचे माहिती मागितल्याप्रमाणे १५ विद्यार्थ्यांचे प्रस्ताव न आल्यामुळे त्यांची रक्कम सध्या देता येणार नाही.			

सत्र २०२२–२०२३ या कालावधीत संशोधन प्रकल्प व मंजूर झालेल्या योजना.

Sr. No.	Name of the Principal Investigator	Name of the Department	Funding Agencies	Sanction Letter No. and Date	Title of Project	Total Sanction Rs.	Grant Received Rs.
1.	Dr. Sanjay Dhoble Professor	Physics	DST	DST/INT/ RUS/ RSF/P-56/ 2021(G), dated 08/02/2023	"Study of Photo-luminescence, thermos luminescence and scintillation properties of Ln2O3 nanoparticles and single crystals"	Rs. 47,90,482/-	Rs. 16,48,437/-
2.	Dr. Bharat Bhanwase Professor	LIT	MEDA Pune		"Investigation on enhancement in the Electrical Performance of Solar Photovoltaic system using Nano fluids"	Rs. 13,52,218/-	Rs. 13,52,218/-

भारत सरकार, सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण विभाग, डॉ. आंबेडकर फाऊंडेशन, के. जी. मार्ग, नवी दिल्ली यांचेकडून डॉ. आंबेडकर अध्यासन, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर या योजनेअंतर्गत सत्र २०२२–२०२३ या सत्रात खालील दर्शविल्याप्रमाणे तक्त्यातील स्तंभ क्र. ३ मध्ये दर्शविल्याप्रमाणे आयोगाकडून मंजुरी पत्र प्राप्त झाले असून स्तंभ क्र. ५ मध्ये दर्शविल्यानुसार पंजाब नॅशनल बँकेच्या खात्यात जमा झाले असून स्तंभ क्र. ६ नुसार पावती क्रमांकानुसार विद्यापीठाच्या अर्थसंकल्पातील आगम शिर्ष भाग–२ (वि–३) (१) सा. क्र. ७१७ मध्ये स्तंभ क्र. ७ नुसार जमा करण्यात आले होती.

अ. क्र.	योजनेचे नांव	मंजुरी पत्र क्र. व दिनांक	रक्कम देणाऱ्या संस्थेचे नांव	कुठल्या खात्यात जमा झाले त्याचे खाते क्र.	पावती क्र.	रक्कम
१.	Authorisation of payment to Dr. Ambedkar Chair at Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University, Nagpur	E.File – 46417/ 34943 Dated 09 Mar., 2022	Government of India, Department of Social Justice & Empowerment, Dr. Ambedkar Foundation, K. G. Marg, New Delhi - 01	085	5938/2223 28/6/2022	2308950
उपरोक्त प्रमाणे स्तंभ क्र. ७ मधील एकूण बेरीज रु.२३,०८,९५०/– (रुपये तेवीस लक्ष आठ हजार नऊशे पन्नास फक्त) साधारण निधीत आगम शिर्ष भाग–१ (क्ष–१) (१२) सा. क्र. ६२९ मध्ये वळते करण्यात आलेली आहे.						

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या महिला अध्ययन व विकास केंद्र, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर या योजनेअंतर्गत कार्यालयीन खर्च आणि कर्मचाऱ्यांचा पगारा–करिता महिला अध्ययन व विकास केंद्र, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांना वेळोवेळी विद्यापीठाच्या साधारण निधितून अग्रिम देण्यात आला. आता सत्र २०२२–२०२३ या सत्रात खालील दर्शविल्याप्रमाणे तक्त्यातील स्तंभ क्र. ३ मध्ये दर्शविल्याप्रमाणे आयोगाकडून मंजुरीपत्र प्राप्त झाले असून स्तंभ क्र. ५ मध्ये दर्शविल्यानुसार पंजाब नॅशनल बँकेच्या खात्यात जमा झाले असून स्तंभ क्र. ६ नुसार पावती क्रमांकानुसार विद्यापीठाच्या अर्थसंकल्पातील आगम शिर्ष भाग–३ (आ–२) (४) सा. क्र. ९१५ मध्ये स्तंभ क्र. ७ नुसार जमा करण्यात आलेली आहे.

अ. क्र.	योजनेचे नाव	मंजुरी पत्र क्र. व दिनांक	रक्कम देणाऱ्या संस्थेचे नांव	कुठल्या खात्यात जमा झाले त्याचे खाते क्र.	पावती क्र.	रक्कम
१.	Financial assistance under the scheme "Development of Women's Studies in Indian Universities and Colleges"	F.No.7-43/2012(WS) Dated 01 July, 2022	U.G.C., New Delhi	०८५	34052/2223 02/02/2023	२५९३६०४
२.	Financial assistance under the scheme "Development of Women's Studies in Indian Universities and Colleges"	F.No.7-43/2012(WS) Dated 28 Mar., 2022	U.G.C., New Delhi	०८५	21120/2223 16/11/2022	५४६०२२
३.	Financial assistance under the scheme "Development of Women's Studies in Indian Universities and Colleges"	F.No.7-43/2012(WS) Dated 28 Mar., 2022	U.G.C., New Delhi	०८५	21119/2223 16/11/2022	२७३०११
					एकूण :	**३४१२६३७**
उपरोक्त प्रमाणे स्तंभ क्र. ७ मधील एकूण बेरीज रु. ३४,१२,६३७/– (रुपये चौतीस लक्ष बारा हजार सहाशे सदतीस फक्त) साधारण निधीत आगम शिर्ष भाग–१ (क्ष–१) (१२) सा. क्र. ६२९ मध्ये वळते करण्यात आलेली आहे.						

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या युजीसी–मानव संसाधन विकास केंद्र, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर या योजनेअंतर्गत कार्यालयीन खर्च आणि कर्मचाऱ्यांचा पगाराकरिता युजीसी–मानव संसाधन विकास केंद्र, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांना वेळोवेळी विद्यापीठाच्या साधारण निधितून अग्रिम देण्यात येतो. आता सत्र २०२२–२०२३ या सत्रात खालील दर्शविल्याप्रमाणे तक्त्यातील स्तंभ क्र. ३ मध्ये दर्शविल्याप्रमाणे आयोगाकडून मंजुरीपत्र प्राप्त झाले असून स्तंभ क्र. ५ मध्ये दर्शविल्यानुसार पंजाब नॅशनल बँकेच्या खात्यात जमा झाले असून स्तंभ क्र. ६ नुसार पावती क्रमांकानुसार विद्यापीठाच्या अर्थसंकल्पातील आगम शिर्ष भाग–३ (अ–१) सा. क्र. ९०१ मध्ये स्तंभ क्र. ७ नुसार जमा करण्यात आलेली आहे.

अ. क्र.	योजनेचे नांव	मंजुरी पत्र क्र. व दिनांक	रक्कम देणाऱ्या संस्थेचे नांव	कुठल्या खात्यात जमा झाले त्याचे खाते क्र.	पावती क्र.	रक्कम
१	Financial assistance under the scheme "Human Resource Development Centres"	F.No.38-39/2022(HRDC) Dated 20 Jun., 2022	U.G.C., New Delhi	०८५	34051/2223 02/02/2023	३०४००००
२	Financial assistance under the scheme "Human Resource Development Centres"	F.No.38-39/2022(HRDC) Dated 20 Jun., 2022	U.G.C., New Delhi	०८५	34048/2223 02/02/2023	३२००००
३	Financial assistance under the scheme "Human Resource Development Centres"	F.No.38-39/2022(HRDC) Dated 20 Jun., 2022	U.G.C., New Delhi	०८५	34050/2223 02/02/2023	६४००००
					एकूण :	**४०००००**
उपरोक्त प्रमाणे स्तंभ क्र. ७ मधील एकूण बेरीज रु. ४०,००,०००/– (रुपये चाळीस लक्ष फक्त) साधारण निधीत आगम शिर्ष भाग–१ (क्ष–१) (१२) सा. क्र. ६२९ मध्ये वळते करण्यात आले आहे.						

Shivaji University, Kolhapur – 416 004 यांचेकडून संचालक, यु. एस. आय. सी. यांच्याद्वारे आयोजित 'Synergistic Training Programme Utilizing the Scientific and Technological Infrastructure (STUTI)' या कार्यक्रमासाठी प्राप्त रक्कम रु. ८,८३,५००/— चे शोधन संचालक, यु. एस. आय. सी. यांना शोधन करण्यात आले.

Jamia Hamard (Deemed to be University), Hamdard Nagar, New Delhi – 110 062 यांचेकडून औषधिशास्त्र विभाग यांच्याद्वारे आयोजित 'Training Programme sanction under Basic & Advanced Translational Research Techniques' या कार्यक्रमासाठी प्राप्त रकम रु. ६,६२,६२५/— चे शोधन विभागप्रमुख, औषधिशास्त्र विभाग यांना शोधन करण्यात आले.

Rajiv Gandhi Science and Technology Commission, Mumbai यांचेकडून गणित विभाग यांच्याद्वारे आयोजित 'National Mathematics Day (NMD-22)' या कार्यक्रमासाठी प्राप्त रक्कम रु. ५२,०००/— चे शोधन विभागप्रमुख, गणित विभाग यांना शोधन करण्यात आले.

विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली/केंद्रशासन/राज्यशासन/रूसा यांच्याकडून विद्यापीठास मंजुरीत विकास निधी :

अहवाल कालावधीत राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षण अभियान योजनेअंतर्गत रूसा सनियंत्रण समितीने मंजुरीसाठी केलेली शिफारस व सोबतच्या कामांच्या खर्चास रूसा इमारत बांधकामासाठी विद्यापीठाने ठेवीचे काम म्हणून सार्वजनिक बांधकाम विभागाला दिलेल्या रुपये ७.०० कोटी रूसा निधीतून शिल्लक राशी रु. ९८,४९,८७५/— मधून खर्च करण्यास व्यवस्थापन परिषदेने मंजुरी प्रदान केली. व्यवस्थापन परिषदेच्या मंजुरीनुसार विद्यापीठ परिसरात रूसा इमारतसमोरील खुल्या भागामध्ये पार्कींगकरिता रु. ३६,४०,२०८/— खर्च करण्यात आले. रूसा इमारत समोरील मेन सिमेंट काँक्रीट रोडकरिता रु. ३८,७६,९८४/— खर्च करण्यात आले. रूसा इमारत समोर गार्डन तयार करून वार्षिक देखभाली खर्चाकरिता रु. १९,७१,००२/— खर्च करण्यात आले. रूसा योजेनेअंतर्गत या कालावधीत रु. ४,७९,६३,८१४/— अनुदान प्राप्त झाले असून सदर प्राप्त अनुदानातून रु. ४,७६,२४,३१६/— राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या जमनालाल बजाज प्रशासकीय इमारत परिसर पार्किंग तसेच विद्यापीठाच्या शैक्षणिक परिसरात बांधकाम, विस्तारीकरण, नूतनीकरण, सिमेंट काँक्रीट रोड, गुरूनानक नूतनीकरण, तसेच औषधिशास्त्र विभागाकरिता रु. ८,५६,४००/— चे लार्ज डिस्प्ले स्क्रीन खरेदी करण्यात आले. ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभागाकरिता रु. २०,००,०००/— चे स्कोपस डाटाबेस उपकरण खरेदी करण्यात आले आहे. एम. सी. ए. विभागाकरिता रु. २,७६,१६३/— चे लार्ज डिस्प्ले स्क्रीन खरेदी करण्यात आले. उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून लक्ष्मीनारायण तांत्रिक संस्थेला इनोव्हेशन आणि इन्क्यूबेशन सेंटरकरिता उपकरणे खरेदीसाठी रु. १,७४,००,०००/— प्राप्त झाले. विद्यापीठात महात्मा जोतिबा फुले अध्यासन स्थापनेकरिता एकरक्कमी अनुदान रु. ३,००,००,०००/— प्राप्त झाले आहे. सदर रक्कम राष्ट्रीयकृत बँकेत मुदत ठेवीत गुंतविण्यात आली आहे. अल्पसंख्याक समाजातील उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी विद्यापीठात वसतिगृह बांधकामासाठी रु. १०,६४,११,७२४/— प्राप्त झाले असून वसतिगृह बांधकामाकरिता सार्वजनिक बांधकाम विभागाकडे, ठेवीचे काम म्हणून वळते करण्यात आले आहे.

अभियांत्रिकी विभाग :

विद्यापीठातील विविध शैक्षणिक परिसरातील कामाचे विवरण खालीलप्रमाणे आहे.

१. विद्यापीठाच्या विविध विभागातील स्थापत्यीय कामाच्या देखभालीकरिता वार्षिक कंत्राट देण्यात आले.

२. विद्यापीठाच्या छत्रपती शिवाजी महाराज परिसरातील मुख्य प्रशासकीय इमारतीला व जमनालाल बजाज प्रशासकीय इमारतीला नवीन LED Name Board लावण्यात आले.

३. विद्यापीठाच्या महात्मा जोतिबा फुले शैक्षणिक परिसरातील सबस्टेशनमधील ११ के. व्ही. —एच. टी. केबलचा जॉइन्ट दुरूस्त करून एबी स्विच व डिओ फ्युज बदलविण्यात आले.

४. विद्यापीठाच्या महात्मा जोतिबा फुले शैक्षणिक परिसरातील एन. एम. सी. पंप हाऊसमध्ये ओपनवेल समरसिबल पंप लावण्यात आला.

५. विद्यापीठाच्या महात्मा जोतिबा फुले शैक्षणिक परिसरातील सबस्टेशनमध्ये ११ के. व्ही.—एच. टी. केबल टाकण्यात आला.

६. विद्यापीठाच्या महात्मा जोतिबा फुले शैक्षणिक परिसरातील वाणिज्य विभागाच्या इमारतीजवळील सममध्ये ओपनवेल समरसिबल पंप लावण्यात आला.

७. विद्यापीठाच्या महात्मा जोतिबा फुले शैक्षणिक परिसरातील रूसा इमारतीमध्ये पाणी मिळावे म्हणून मानव्यशास्त्र इमारतीच्या टाकीजवळून विद्युत प्रवाहाची व्यवस्था करण्यात आली.

८. विद्यापीठाच्या महात्मा जोतिबा फुले शैक्षणिक परिसरातील (Section III – Road) अंतर्गत हॉट मिन हॉट लेड प्रक्रियेद्वारे प्रशासकीय इमारतीच्या समोरून कम्प्यूटर सायन्स विभागापुढे एम. सी. ए. विभाग त्यानंतर इलेक्ट्रॉनिक्स विभाग आणि वनस्पतिशास्त्र विभागापर्यंत रस्त्यांचे विस्तारीकरण करण्यात आहे.

९. विद्यापीठाच्या पदव्युत्तर शैक्षणिक विभाग वसतिगृह परिसरात असलेल्या औषधिनिर्माणशास्त्र वसतिगृहाच्या स्लॅबला वॉटर प्रुफींग व पॉलीमेरीक प्रक्रिया करण्यात आली.

१०. विद्यापीठाच्या महात्मा जोतिबा फुले शैक्षणिक परिसरातील (Section I – Road) अंतर्गत हॉट मिन हॉट लेड प्रक्रियेद्वारे परिसराच्या मुख्य प्रवेशद्वारापासून औषधिनिर्माणशास्त्र विभागापर्यंत रस्त्याचे काम करण्यात आले.

११. विद्यापीठाच्या महात्मा जोतिबा फुले शैक्षणिक परिसरात कार्यक्रमासाठी जेथून प्रवेश केल्या जातो त्या कम्पाउंड वॉलकरिता साहित्य आणण्यासाठी भाडे देण्यात आले व भिंतीचे काम करण्यात आले.

१२. विद्यापीठाच्या महात्मा जोतिबा फुले शैक्षणिक परिसरात पार पडलेल्या 108th Indian Science Congress कार्यक्रमाच्या पूर्व तयारीच्या वेळेस बरीच विकास कामे करण्यात आली.

१३. विद्यापीठाच्या महात्मा जोतिबा फुले शैक्षणिक परिसरातील ग्राऊंडचा विकास करण्यात आला.

१४. विद्यापीठाच्या अतिथीगृहाचे नूतनीकरण करण्यात आले.

१५. विद्यापीठाच्या महात्मा जोतिबा फुले शैक्षणिक परिसरातील (Section IV – Road) अंतर्गत हॉट मिन हॉट लेड प्रक्रियेद्वारे भौतिकशास्त्र विभाग, मॉलीकुलर बायलॉजी तसेच इंग्रजी आणि हिंदी विभागासमोरील रस्त्याची कामे करण्यात आली.

१६. विद्यापीठाच्या महात्मा जोतिबा फुले शैक्षणिक परिसरातील हॉट मिन हॉट लेड प्रक्रियेद्वारे गणित विभागापासून जमनालाल बजाज प्रशासकीय भवनापर्यंत रस्त्याचे काम करण्यात आले.

१७. विद्यापीठाच्या महात्मा जोतिबा फुले शैक्षणिक परिसरातील (Section II – Road) अंतर्गत हॉट मिन हॉट लेड प्रक्रियेद्वारे जनसंवाद विभाग, प्राचीन भारतीय इतिहास व पुरातत्त्व विभाग, प्रशासकीय विभाग व प्राणिशास्त्र विभागासमोरून रस्त्याची कामे करण्यात आली.

१८. विद्यापीठाच्या महात्मा जोतिबा फुले शैक्षणिक परिसरातील भाषा भवन इमारतीपासून रूसा इमारतीपर्यंत सिमेंटची नाली बांधण्याचे काम करण्यात आले.

१९. विद्यापीठाच्या महात्मा जोतिबा फुले शैक्षणिक परिसरात पार पडलेल्या 108th Indian Science Congress कार्यक्रमादरम्यान विद्युत पुरवठा व्यवस्था सुरळीत राहण्याच्या दृष्टीने Electric Supply Management Agency ची नेमणूक केल्या गेली होती.

२०. अमरावती रोडवरील एम. एस. इ. डि. सी. एल. च्या सबस्टेशन पासून विद्यापीठाच्या महात्मा जोतिबा फुले शैक्षणिक परिसरातील सबस्टेशन पर्यंत एच. टी. केबल, आर. एम. यु. आणि संबंधित साहित्य टाकण्यात आले.

२१. विद्यापीठाच्या महात्मा जोतिबा फुले शैक्षणिक परिसरात पार पडलेल्या 108th Indian Science Congress कार्यक्रमादरम्यान विद्युत पुरवठा व्यवस्था सुरळीत राहण्याच्या दृष्टीने Electric Supply Management Agency ची नेमणूक करण्याकरिता सल्लागार नियुक्त केल्या गेले होते.

२२. विद्यापीठाच्या महात्मा जोतिबा फुले शैक्षणिक परिसरात असलेल्या भाषा भवन इमारतीमधील मल्टीपरपज हॉलचे विस्तारीकरण करण्यात आले.

२३. विद्यापीठाच्या वर्धापन दिन सोहळ्याकरिता छत्रपती शिवाजी महाराज परिसरातील मुख्य प्रशासकीय इमारतीला व जमनालाल बजाज प्रशासकीय इमारतीला Series Lighting & Par Lights लावण्यात आले होते.

२४. विद्यापीठाच्या महात्मा जोतिबा फुले शैक्षणिक परिसरात असलेल्या रूसा रोडच्या कडेने फुटपाथ बनविण्यात आले.

२५. विद्यापीठाच्या जमनालाल बजाज प्रशासकिय इमारतीपासून वाणिज्य विभागाच्या इमारतीपर्यंत रस्त्याच्या डाव्या बाजूने पाईप जल निकासीचे बांधकाम करण्यात आले.

२६. विद्यापीठाच्या नवीन प्रशासकीय इमारतीजवळ जमिनीखाली १ लाख लिटर क्षमतेची टाकी बांधण्यात आली.

■■■

।। प्रकरण सहावे ।।



विद्यापीठातील स्पृहणीय उपक्रम

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ शताब्दी महोत्सव उद्घाटन समारंभप्रसंगी दीप प्रज्वलित करतांना महाराष्ट्राचे सन्माननीय राज्यपाल व विद्यापीठाचे कुलपती श्री. भगत सिंह कोश्यारी, शेजारी कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, डॉ. अनिल काकोडकर, कुलपती, डॉ. होमी भाभा राष्ट्रीय संस्था, प्र–कुलगुरू डॉ. संजय दुधे व कुलसचिव डॉ. राजू हिवसे.

Hon'ble Governor of Maharashtra and Chacellor of University Shri. Bhagat Singh Koshyari lightening the Lamp on the occasion of the inaugural programme of Centenary Celebration of Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University. Vice-Chancellor Dr. Subhash Chaudhari, Dr. Anil Kakodkar, Chancellor, Dr. Homi Bhabha National Institute, Pro-Vice-Chancellor Dr. Sanjay Dudhe and Registrar Dr. Raju Hiwase are seen.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ शताब्दी महोत्सव उद्घाटन समारंभप्रसंगी आपले विचार व्यक्त करतांना कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी तसेच व्यासपीठावर बसलेले महाराष्ट्राचे सन्माननीय राज्यपाल व विद्यापीठाचे कुलपती श्री. भगत सिंह कोश्यारी, डॉ. अनिल काकोडकर, प्र–कुलगुरू डॉ. संजय दुधे व कुलसचिव डॉ. राजू हिवसे.

Hon'ble Vice-Chancellor Dr. Subhash Chaudhari speaking on the occasion of the inaugural programme of Centenary Celebration of Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University. Governor of Maharashtra and Chacellor of University Shri. Bhagat Singh Koshyari, Dr. Anil Kakodkar, Chancellor, Homi Bhabha National Institute, Pro-Vice-Chancellor Dr. Sanjay Dudhe and Registrar Dr. Raju Hiwase are seen.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ शताब्दी महोत्सव उद्घाटन समारंभप्रसंगी महाराष्ट्राचे सन्माननीय राज्यपाल व विद्यापीठाचे कुलपती श्री. भगत सिंह कोश्यारी यांच्या हस्ते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जीवन साधना पुरस्कार स्वीकारतांना मुंबईचे यशस्वी उद्योजक श्री. पुरूषोत्तम अग्रवाल, शेजारी कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, डॉ. अनिल काकोडकर, प्र–कुलगुरू डॉ. संजय दुधे व कुलसचिव डॉ. राजू हिवसे.

Shri. Purushottam Agrawal a successful entrepreneur from Mumbai receiving 'Rashtrasant Tukadoji Maharaj Jeevan Sadhana Award' by Governor of Maharashtra and Chancellor of University Shri. Bhagat Singh Koshyari on the occasion of the inaugural programme of Centenary Celebration of Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University. Vice-Chancellor Dr. Subhash Chaudhari, Dr. Anil Kakodkar, Pro-Vice-Chancellor Dr. Sanjay Dudhe and Registrar Dr. Raju Hiwase are seen.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ शताब्दी महोत्सव प्रतीक मुद्रा उद्घाटन समारंभप्रसंगी मा. एअर मार्शल श्री. विभास पांडे, एअर ऑफिसर, कमांडिंग इन चिफ, भारतीय वायुसेना, नागपूर यांना सन्मानचिन्ह प्रदान करतांना. शेजारी कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र–कुलगुरू डॉ. संजय दुधे व कुलसचिव डॉ. राजू हिवसे.

Hon'ble Air Marshal Shri. Vibhas Pande, Air Officer, Command in Chief, Indian Airforce, Nagpur receiving memento on the occasion of the inaugural programme of Symbolic Coin of Centenary Festival of Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University. Vice-Chancellor Dr. Subhash Chaudhari, Pro-Vice-Chancellor Dr. Sanjay Dudhe and Registrar Dr. Raju Hiwase are seen.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ व गोंडवाना विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने व्हाईस चान्सलर कॉनक्लेव्ह ट्रायबल डेव्हलपमेंट रिट्रोस्पेक्शन ॲन्ड वे अटेंड कार्यक्रमाप्रसंगी आपले विचार व्यक्त करतांना महाराष्ट्राचे सन्माननीय राज्यपाल व विद्यापीठाचे कुलपती श्री. भगत सिंह कोश्यारी, मंचावर उपस्थित कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र–कुलगुरू डॉ. संजय दुधे व इतर मान्यवर.

Governor of Maharashtra and Chancellor of University Shri. Bhagat Singh Koshyari addressing on the occasion of "Vice-Chancellor Conclave Tribal Development Retrospection and Way Attend" a programme organized by Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University in collaboration with Gondwana University. Vice-Chancellor Dr. Subhash Chaudhari, Pro-Vice-Chancellor Dr. Sanjay Dudhe and others are seen.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाद्वारे आयोजित भारतीय विज्ञान काँग्रेस समारंभप्रसंगी विज्ञान ज्योत प्रज्वलित करतांना महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्रजी फडणवीस, केंद्रीय राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) डॉ. जितेंद्र सिंह, कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी व इतर मान्यवर.

Deputy Chief Minister Hon'ble Shri. Devendra Fadnavis lightening the Flamebeau on the occasion of the Indian Science Congress hosted by Rashtrasant Tukadiji Maharaj Nagpur University. Dr. Jitendra Singh, Central State Minister (Independent Charge), Vice-Chancellor Dr. Subhash Chaudhari and others are seen.



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाद्वारे आयोजित १०८ व्या भारतीय विज्ञान काँग्रेस समारंभप्रसंगी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाला १०० वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त टपाल तिकीटाचे अनावरण करतांना डावीकडून कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, केंद्रीय राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) डॉ. जितेंद्र सिंह, मा. मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे, महाराष्ट्राचे सन्माननीय राज्यपाल व विद्यापीठाचे कुलपती श्री. भगत सिंह कोश्यारी, पोस्ट मास्टर जनरल (विदर्भ रिजन) शोभा मधाले, केंद्रीय मंत्री, भारत सरकार मा. ना. श्री. नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्रजी फडणवीस, १०८ व्या भारतीय विज्ञान काँग्रेसच्या अध्यक्ष विजयालक्ष्मी सक्सेना व इतर मान्यवर.

On the occasion of 108th Indian Science Congress hosted by Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University and the completion of hundred years of RTMNU, a Postal Stamp unveiled by (from left) Vice-Chancellor Dr. Subhash Chaudhari, Central State Minister (Independent Charge) Dr. Jitendra Singh, Hon'ble Chief Minister Shri. Eknath Sinde, Governor of Maharashtra and Chancellor of University Shri. Bhagat Singh Koshyari, Post-Master General Shobha Madhale, Hon'ble Central Minister Shri. Nitinji Gadkari, Deputy Chief Minister Shri. Devendra Fadnavis, President of 108th Indian Science Congress Vijayalaxmi Saxena and others are seen.



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाद्वारे आयोजित १०८ व्या भारतीय विज्ञान काँग्रेस समारंभप्रसंगी सांस्कृतिक कार्यक्रमाची प्रात्यक्षिके सादर करतांना विद्यार्थिनी.

Students are presenting their performances of cultural programme on the occasion of 108th Indian Science Congress hosted by Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाद्वारे आयोजित १०८ व्या भारतीय विज्ञान काँग्रेस समारंभप्रसंगी विविध महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी प्रदशनीला भेट दिल्याप्रसंगी.

Students of various colleges visiting exhibitions in 108th Indian Science Congress hosted by Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University.

विद्यापीठाच्या औषधिनिर्माणशास्त्र विभागाद्वारे आयोजित ७२ व्या इंडियन फार्मास्यूटिकल सायंस समारंभप्रसंगी डॉ. डोमिनिक जॉर्डन, अध्यक्ष आंतरराष्ट्रीय फार्मास्यूटिकल फेडरेशन यांचा मानचिन्हासह सत्कार करताना श्री.अतुल मंडलेकर चेअरमन एल. ओ. सी. शेजारी डॉ. मिलिंद उमेकर, डॉ. प्रकाश ईटनकर, डॉ. टी. व्ही.नारायणा, डॉ. प्रमोद खेडेकर, डॉ.चंद्रशेखर डोईफोडे, व श्री. रवलीनसिंग खुराना.

Shri. Atul Mandlekar, Chairman L.O.C., felicitating with memento to Dr. Dominique Jordan, President, Internationl Pharmaceutical Federation on the occasion of 72nd Indian Pharmaceutical Science Programme organized by the Department of Pharmaceutics. Dr. Milind Umekar, Dr. Prakash Itankar, Dr. T. V. Narayana, Dr. Pramod Khedekar, Dr. Chandrashekhar Doifode and Ravlinsingh Khurana are seen.

शिक्षकदिन समारोह प्रसंगी प्रमुख अतिथी डॉ. अतुल वैद्य, राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संशोधन संस्था, नागपूर आपले विचार मांडतांना. व्यासपीठावर बसलेले कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी व प्र–कुलगुरू डॉ. संजय दुधे.

Chief Guest Dr. Atul Vaidya, NEERI, Nagpur speaking on the occasion of 'Teacher's Day'. Vice-Chancellor Dr. Subhash Chaudhari and Pro-Vice-Chancellor Dr. Sanjay Dudhe are seen.



विद्यापीठाच्या शिक्षक दिन व वर्धापनदिन कार्यक्रमाप्रसंगी प्रदान करण्यात येणाऱ्या उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार, उत्कृष्ट आंतर–महाविद्यालयीन वार्षिकांक स्पर्धा पुरस्कार तसेच उत्कृष्ट अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी पुरस्कारांचे मानकरीसह उपस्थित श्रोतागण.

Winners of the award of Best Teacher, Best Inter-Collegeate Annual Magzine competition, Best Officer, Best Employee, Best Student with the audience, awarded on the occasion of 'Teachers Day and Foundation Day'.

विद्यापीठाद्वारे आयोजित मराठी भाषा गौरवदिन समारंभप्रसंगी कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी आपले विचार मांडतांना. व्यासपीठावर बसलेले कुलसचिव डॉ. राजू हिवसे, मा. प्रा. सुमंत देशपांडे, माजी विभागप्रमुख मराठी विभाग, जे. एम. पटेल महाविद्यालय, भंडारा व डॉ. दत्तात्रय वाटमोडे.

Vice-Chancellor Dr. Subhash Chaudhari addressing on the occasion of 'Marathi Bhasha Gaurav Din' orgnised by university. Registrar Dr. Raju Hiwase, Prof. Sumant Deshpande, Former Head of the Department of Marathi, J.M.PATEL College, Bhandara and Dr. Dattatraya Watmode are seen.

विद्यापीठाद्वारे आयोजित वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ५४ व्या पुण्यतिथी निमित्त 'राष्ट्रसंत आणि अदृश्य आरोग्य' या विषयावर व्याख्यानमालेप्रसंगी प्र–कुलगुरू डॉ. संजय दुधे आपले विचार व्यक्त करतांना. मंचावर बसलेले डॉ. दत्तात्रय वाटमोडे, मा. पद्मश्री डॉ. विकास महात्मे (माजी राज्यसभा सदस्य) व कुलसचिव डॉ. राजू हिवसे.

Pro- Vice-Chancellor Dr. Sanjay Dudhe speaking in lecture series – "Rashtrasant and Hidden Health" on the occasion of 54th Death Anniversary of Rashtrasant Tukadoji Maharaj. Dr. Dattatray Wathmode, Hon'ble Padmashree Dr. Vikas Mahatme (Former MP) and Registrar Dr. Raju Hiwase are seen.

विद्यापीठाद्वारे आयोजित छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त 'छत्रपतींची वीर कहाणी – निधान आपुल्या हर्षाचे' या विषयावर व्याख्यान देतांना मा. श्री. विजय खुटवड, श्री. संत सेवा संघ, पुणे, शेजारी प्र–कुलगुरू डॉ. संजय दुधे व डॉ. सोपानदेव पिसे.

Hon'ble Shri. Vijay Khutwad, Shri Sant Seva Sangh, Pune, delivering a lecture on "*Chatrapatinchi Veer Kahani- Nidhan Aapulya Harshache*" on the occasion of Chatrapati Shivaji Maharaj Jayanti organized by university. Pro-Vice-Chancellor Dr. Sanjay Dudhe and Dr. Sopandev Pise are present.

विद्यापीठाद्वारे आयोजित वि. दा. सावरकर जयंतीनिमित्त 'वीर सावरकरांचा मृत्यूशी संवाद' या विषयावर आपले विचार व्यक्त करतांना श्री. प्रमोद तिजारे. मंचावर उपस्थित शेजारी प्र–कुलगुरू डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, श्री. नरेंद्र आमले, श्री. योगेश सोमन, श्री. संदीप पाटील व डॉ. संयुक्ता थोरात.

Shri. Pramod Tijare speaking on "*Veer Sawarkarancha Mrutushi Samvaad*" on the occasion of V. D. Sawarkar's Jayanti organized by university. Pro-Vice-Chancellor Dr. Sanjay Dudhe, Registrar Dr. Raju Hiwase, Shri. Narendra Amle, Shri. Yogesh Soman, Shri. Sandip Patil and Dr. Sanyukta Thorat are seen.

विद्यापीठाद्वारे आयोजित डॉ. नितीन राऊत आंतरराष्ट्रीय व्याख्यानमालेत "Dr. Ambedkarite Buddhism and the Anti-Caste Movement in American Higher Education" या विषयावर व्याख्यान गुंफताना International Development & Director, Center For GDS (USA) चे Prof. Laurence Simon. मंचावर बसलेले कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र–कुलगुरू डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे.

Dr. Nitin Raut expressing his thoughts on "Dr. Ambedkarite Buddhism and the Anti-Caste Movement in American Higher Education" in an international lecture series organized by university. Prof. Laurence Simon, International Development & Director, Center For GDS (USA), Vice-Chancellor Dr. Subhash Chaudhari, Pro-Vice-Chancellor Dr. Sanjay Dudhe and Registrar Dr. Raju Hiwase are seen.

विद्यापीठाद्वारे आयोजित डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती व्याख्यानमालेप्रसंगी डॉ. स्मिता शेंडे, मराठी विभागप्रमुख, बाबाजी दाते कला आणि वाणिज्य महाविद्यालय, यवतमाळ यांचा मानचिन्हासह सत्कार करतांना डॉ. श्याम कोरेटी. शेजारी कुलसचिव डॉ. राजू हिवसे.

Dr. Shyam Koreti felicitating with a memento to Dr. Smita Shende, Head, Department of Marathi, Babaji Date Arts and Commerce College, Yavatmal on the occasion of 'Lecture Series in Rememberance of Dr. Babasaheb Ambedkar' organized by university. Registrar Dr. Raju Hiwase is also seen.

विद्यापीठाद्वारे आयोजित डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती व्याख्यानमालेत 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्वप्नातील आधुनिक भारत' या विषयावर व्याख्यान देतांना डॉ. स्मिता शेंडे शेजारी कुलसचिव डॉ. राजू हिवसे व डॉ. श्याम कोरेटी.

Dr. Smita Shende speaking on 'Dr. Babasaheb Ambedkar's vision of Modern India' on the occasion of 'Lecture Series in Rememberance of Dr. Babasaheb Ambedkar' organized by university. Registrar Dr. Raju Hiwase and Dr. Shyam Koreti are also seen.

विद्यापीठाद्वारे आयोजित मौलाना अब्दुल करीम पारेख स्मृती व्याख्यानमालेत "Peace & Harmony among different Religious Communities for the Progress of the Nation" या विषयावर व्याख्यान देतांना केरल राज्याचे राज्यपाल मा. श्री. आरीफ मोहम्मद खान. मंचावर बसलेले कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र–कुलगुरू डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, श्री. अब्दुल माजीद पारेख व जनरल सचिव इस्लामिक फोरमचे श्री. ए. फैजउर रहमान.

Governer of Kerala, Hon'ble Shri. Aarif Mohammad Khan speaking on "Peace & Harmony among different Religious Communities for the Progress of the Nation", on the occasion of 'Maulana Abdul Karim Parekh Remembrance Lecture Series'. Vice-Chancellor Dr. Subhash Chaudhari, Pro-Vice-Chancellor Dr. Sanjay Dudhe, Registrar Dr. Raju Hiwase, Shri. Abdul Majid Pareikh and Shri. A. Faizur Rehman, General Secretary of Islamic forum are seen.

विद्यापीठाद्वारे आयोजित राष्ट्रसंत व्याख्यानमालेत 'वेदांत आणि सर्वोत्तम परिपूर्ण जीवन' या विषयावर व्याख्यान देतांना मा. पूज्य स्वामी योगात्मानंद, अध्यक्ष वेदांत सोसायटी ऑफ प्रॉव्हिडन्स, यु. एस. ए. शेजारी कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र–कुलगुरू डॉ. संजय दुधे, डॉ. दत्तात्रय वाटमोडे व श्रीमती विजयालक्ष्मी थोटे.

Swami Yogatmanand, President of Vedanta Society of Providence, U.S.A. speaking on the topic 'Vedanta and the Best and Perfect Life' in the lecture series organized by university. Vice-Chancellor Dr. Subhash Chaudhari, Pro-Vice-Chancellor Dr. Sanjay Dudhe, Dr. Dattatray Wathmode and Mrs. Vijaylaxmi Thote are seen.

विद्यापीठाद्वारे कै. दादा मनोहरराव कल्लावार स्मृतिप्रित्यर्थ आयोजित महात्मा बसवेश्वर व्याख्यानमालेत 'महात्मा बसवेश्वरांचा सामाजिक दृष्टिकोन' या विषयावर आपले विचार व्यक्त करतांना निवृत्त न्यायमूर्ती श्री. प्र. आ. मार्कंडेवार. व्यासपीठावर बसलेले प्र–कुलगुरू डॉ. संजय दुधे, डॉ. धनराज डाहाट व कुलसचिव डॉ.राजू हिवसे.

Retired Judge Shri. P.A. Markandewar expressing his views on 'Mahatma Basaveshwar's Social Perspective' on the topic of Mahatma Basaveshwar Lecture Series in the remembrance of Late. Dada Manoharrao Kallawar organized by university. Pro-Vice-Chancellor Dr. Sanjay Dudhe, Registrar Dr. Raju Hiwase and Dr. Dhanraj Dahat are also present.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या शताब्दी महोत्सवानिमित्त आकार संस्था, पुणेद्वारे प्रस्तुत बाल गीतरामायण सादरीकरण प्रसंगी कार्यक्रमात प्र–कुलगुरू डॉ. संजय दुधे. आपले विचार व्यक्त करतांना मंचावर उपस्थित इतर मान्यवर.

Aakar Sanstha, Pune presenting *Bal Geet Ramayana* on the occasion of Centenary Celebration of Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University, Pro-Vice-Chancellor Dr. Sanjay Dudhe expressing his views at the event, other dignitaries are also seen.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ आणि दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, नागपूर (संस्कृती मंत्रालय, भारत सरकार) यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या शताब्दी महोत्सवानिमित्त आकार संस्था, पुणेद्वारे प्रस्तुत बाल गीतरामायण सादरीकरण करतांना समूह.

A group performing *Bal Geet Ramayana* by Aakar Sanstha, Pune, on the occasion of Centenary Celebration of Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University organized by RTMNU and South Central Cultural Centre, Nagpur (Ministry of Culture, Government of India).

विद्यापीठाद्वारे संपन्न झालेल्या भारतीय विज्ञान परिषदेमध्ये स्वयंस्फुर्तीने सहभागी झालेल्या सर्व सहकाऱ्यांच्या विशेषाभिनंदन सोहळ्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात डॉ. प्रशांत कडू आपले विचार व्यक्त करतांना. मंचावर बसलेले डॉ. प्रशांत माहेश्वरी, डॉ. राजेश सिंग, कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, कुलसचिव डॉ. राजू हिवसे व डॉ. संजय कविश्वर.

Dr. Prashant Kadu speaking at Felicitation Ceremony of Voluntary Participants in Indian Science Congress organized by the university. Vice-Chancellor Dr. Subhash Chaudhari, Registrar Dr. Raju Hiwase, Dr. Prashant Maheshwari, Dr. Rajesh Singh and Dr. Sanjay Kavishwar are seen.

विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग मैदानावर गणराज्य दिनी ध्वजवंदन करताना कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, डॉ. शरद सुर्यवंशी व इतर मान्यवर.

Vice-Chancellor Dr. Subhash Chaudhari hoisting national flag at Sports and Physical Education Department's ground on the occasion of Republic Day. Registrar Dr. Raju Hiwase, Dr. Sharad Suryavanshi and others are seen.

विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग मैदानावर गणराज्य दिन सोहळ्यानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रमाचे प्रात्यक्षिक सादर करतांना विद्यार्थिनी.

Students performing cultural events at Sports and Physical Education Department's ground on the occasion of Republic Day.



विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग मैदानावर गणराज्य दिन सोहळ्यानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रमाचे प्रात्यक्षिक सादर करतांना विद्यार्थिनी.
Students performing cultural events at Sports and Physical Education Department's ground on the occasion of Republic Day.

विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग आणि महामेट्रो, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतरराष्ट्रीय योग दिवस धावत्या मेट्रोमध्ये साजरा करण्यात आला. याप्रसंगी डॉ. शरद सुर्यवंशी संबोधित करतांना. शेजारी कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, शेजारी प्र–कुलगुरू डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, डॉ. सोपानदेव पिसे, डॉ. देवेंद्र वानखेडे, डॉ. राजेंद्र खंडाळे, मेट्रोचे सहप्रबंधक तसेच अर्जून द्रोणाचार्य पुरस्कारप्राप्त विजय मुनिश्वर व विद्यार्थी गण.

International Yoga Day celebrated in a running Metro, organized by Sports and Physical Education Department, in collaboration with Maha Metro Nagpur. Dr. Sharad Suryavanshi addressing at the event. Vice-Chancellor Dr. Subhash Chaudhari, Pro-Vice-Chancellor Dr. Sanjay Dudhe, Registrar Dr. Raju Hiwase, Dr Sopandeo Pise, Dr. Devendra Wankhede, Dr. Rajendra Khandale Assistant Manager, Maha Metro and Dronacharya Award winner Vijay Munishwar and students are seen.

■ प्रकरण सहावे
विद्यापीठातील स्पृहणीय उपक्रम

राष्ट्रीय सेवा योजना

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात रासेयो कक्ष १९६९ पासून सुरू आहे. तेव्हा विद्यापीठाचे कार्यक्षेत्र विदर्भाच्या ११ जिल्ह्यांतील १० महाविद्यालयामधून १००० विद्यार्थी संख्या असलेले रासेयो पथक होते. आजमितीला पूर्व विदर्भातील नागपूर, भंडारा, गोंदिया व वर्धा जिल्ह्यांतील २४० महाविद्यालये, ३०००० विद्यार्थी स्वयंसेवक व ३३८ कार्यक्रम अधिकारी सहभागी झालेत. शिक्षणातून 'सामुदायिक विकास व सामुदायिक विकासातून शिक्षण' या संकल्पनेतून महाविद्यालयीन युवकांसाठी समाजोपयोगी कार्य रासेयोच्या माध्यमातून करण्यात आले.

राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये नियमित कार्यक्रमाअंतर्गत खालील विविध कार्यक्रम राबविण्यात येतात.

रक्तदान, श्रमदान, स्वच्छता अभियान, रॅली, कार्यशाळा, रस्ता सुरक्षा, मतदान जनजागृती, एड्स जनजागृती, उन्नत भारत अभियान, फिट इंडिया अभियान, युथ पार्लमेंट, स्वच्छ भारत समर इन्टर्नशिप, एक भारत श्रेष्ठ भारत, वृक्षारोपण, पोलिओ लसीकरण, कोरोना जनजागृती, कोरोना लसीकरण, बेटी बचाव बेटी पढाओ, अन्न वाचवा मोहिम, कचरा व्यवस्थापन, आपत्ती व्यवस्थापन, शासनाच्या विविध योजनांची माहिती, जी–२०, वाय–२०, पुतळा स्वछता व संवर्धन आदी विविध कार्यक्रम राबविण्यात येतात.

विशेष शिबीर अतंर्गत महाविद्यालयीन शिबीर, विद्यापीठस्तरीय शिबीर, राज्यस्तरीय शिबीर, प्रजासत्ताक दिन पथसंचलन, उत्कर्ष, आव्हान, प्रेरणा, राष्ट्रीय एकात्मता शिबीर, राज्य व राष्ट्रीय साहसी शिबीर, पश्चिम क्षेत्रिय प्रजासत्ताक दिन पथसंचलन, दिल्ली व मुंबई प्रजासत्ताक दिन पथसंचलन, राष्ट्रीय युवा महोत्सव, राज्य शासनाचे विविध कार्यक्रम, केंद्र शासनाचे विविध कार्यक्रम इत्यादीमध्ये विद्यार्थी व कार्यक्रम अधिकारी सहभागी होतात.

विद्यपीठ शताब्दी महोत्सवानिमित्य राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

देशभक्तीपर गीत गायन कार्यक्रम : दिनांक ६ ऑगस्ट, २०२२ रोजी जमनालाल बजाज प्रशासकीय भवन प्रांगणामध्ये विद्यापीठ प्राधिकरणी सदस्य, अधिकारी, प्राध्यापक व कर्मचारी याच्यांकरिता देशभक्तीपर गीत गायन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यामध्ये मा. कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी व विद्यापीठ प्राधिकरणी सदस्य, अधिकारी, प्राध्यापक व कर्मचारी यांनी देशभक्तीपर गीत सादर केले.

हर घर तिरंगा : मा. पंतप्रधान यांच्या कार्यालयाच्या वतीने दिलेल्या सुचनेनुसार दि. १३ ते १५ ऑगस्ट, २०२२ या कालावधीमध्ये हर घर तिरंगा उपक्रम राबविण्यात आला. या अतंर्गत महाविद्यालय, कार्यालय व स्वयंसेवक यांच्या घरी तिरंगा लावण्यात आला.

एक दिवसीय स्वच्छता शिबीर : युवाकार्य व खेल मंत्रालय, भारत सरकार, क्षेत्रिय निर्देशालय, पुणे यांच्या निर्देशानुसार १०० विद्यार्थ्यांकरिता महाराजबाग, विद्यापीठ परिसर, फ्रिडम पार्क, एक दिवसीय स्वच्छता शिबीर व प्लास्टीक संकलन कार्यक्रम ४ आक्टोबर, २०२२ रोजी आयोजित करण्यात आला.

रासेयो वर्धापनदिन : दरवर्षीप्रमाणे यंदाही दि. २४ सप्टेंबर, २०२२ रोजी रासयो वर्धापन दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी रासेयो मध्ये उत्कृष्ट कार्य करणारे स्वयंसेवक, कार्यक्रम अधिकारी व महाविद्यालय यांना मा. कुलगुरू व प्रमुख अतिथी यांच्या हस्ते पुरस्कृत करण्यात आले.

विद्यापीठस्तरीय प्रजासत्ताक दिन पथ संचलन निवड : दि. २७ ऑगस्ट, २०२२ रोजी विद्यापीठस्तरीय प्रजासत्ताक दिन पथ संचलन निवड शिबीर आयोजित करण्यात आले. दीक्षांत सभागृह येथे आयोजित या शिबिरामध्ये नागपूर, भंडारा, गोंदिया व वर्धा येथील १०० पेक्षा अधिक विद्यार्थी सहभागी झाले.

लैंगिक समानता : नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सोशल डिफेन्स सामाजिक न्याय मंत्रालय, भारत सरकार व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभाग व विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ६ ऑक्टोबर, २०२२ रोजी on Provissions of trans gender person at 2019 and rules 2020 हा कार्यक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमामध्ये २०० स्वयंसेवक व १५ कार्यक्रम अधिकारी सहभागी झाले.

राज्यस्तरीय साहसी शिबीर : राज्यस्तरीय साहसी शिबीर चिखलधरा ३ मुले, ३ मुली व १ कार्यक्रम अधिकारी यांनी विद्यापीठाचे प्रतिनिधित्त्व केले.

राष्ट्रीय साहसी शिबीर : युवा कार्य व खेल मंत्रालय भारत सरकार क्षेत्रिय निर्देशालय रासेयो हिमाचल प्रदेश व अटल बिहारी वाजपेयी पर्वतारोहन संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १५ ते २४ नोव्हेंबर, २०२२ या कालावधीमध्ये मनाली येथे आयोजित राष्ट्रीय सहासी शिबीर मध्ये ७ मुले, ७ मुली व १ कार्यक्रम अधिकारी यांनी महाराष्ट्राचे प्रतिनिधित्त्व केले.

पश्चिम क्षेत्रिय प्रजासत्ताक दिन पथ संचलन : सरदार पटेल विद्यापीठ आनंद, गुजरात येथे २० ते २९ नोव्हेंबर, २०२२ या कालावधीमध्ये पश्चिम क्षेत्रिय प्रजासत्ताक दिन पथ संचलन आयोजित करण्यात आले. यामध्ये आपल्या विद्यापीठातील २ मुले, ३ मुली सहभागी झाले.

आव्हान : आव्हान आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीर दि. ३ ते १२ नोव्हेंबर, २०२२ रोजी या कालावधीमध्ये कवियित्री बहीणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथे आयोजित करण्यात आले. यामध्ये आपल्या विद्यापीठातील नागपूर, भंडारा, गोंदिया व वर्धा येथील ६० मुले, ४० मुली व ०८ कार्यक्रम अधिकारी सहभागी झाले व श्री. अनुप बॅनर्जी नागपूर जिल्हा याला उत्कृष्ट स्वयंसेवक पुरस्कार प्राप्त झाला.

उत्कर्ष राज्यस्तरीय सामाजिक सांस्कृतिक स्पर्धा : राष्ट्रीय सेवा योजना उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन व पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने उत्कर्ष राज्यस्तरीय सामाजिक सांस्कृतिक स्पर्धाचे आयोजन दि. २ ते ५ जानेवारी, २०२३ या कालावधीमध्ये सोलापूर येथे करण्यात आले. या स्पर्धेमध्ये आपल्या विद्यापीठातील ९ मुले, ९ मुली व १ कार्यक्रम अधिकारी सहभागी झाले. लोकगायन, भित्तीचित्र, छायाचित्रण, प्रथम पुरस्कार समुह गीत, पथनाट्य, द्वितीय पुरस्कार व संगीत विभाग चषक, ललित कला चषक, छायाचित्रण चषक, उत्कृष्ट संघनायक चषक व उत्कर्ष विजेता चषक प्राप्त झाले.

राष्ट्रीय युवा महोत्सव – युवाकार्य व खेल मंत्रालय भारत सरकार क्षेत्रिय निर्देशालय रासेयो कर्नाटक यांच्या वतीने दि. १२ ते १६ जानेवारी, २०२३ या कालावधीमध्ये आयोजित राष्ट्रीय युवा महोत्सवामध्ये २ मुले, २ मुली यांनी महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व केले.

राष्ट्रीय एकात्मता शिबीर : विद्यापीठ शताब्दी महोत्सवानिमित्य युवा कार्य व खेल मंत्रालय भारत सरकार क्षेत्रिय निर्देशालय रासेयो पुणे व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय एकात्मता शिबीर दि. २६ फेब्रुवारी, ते ४ मार्च, २०२३ या कालावधीमध्ये विद्यापीठ गुरूनानक भवन येथे आयोजित करण्यात आले. सदर शिबिरामध्ये आसाम, गोवा, गुजरात, राजस्थान, मध्यप्रदेश, तेलंगाना, तमिलनाडू, केरळ, महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, पश्चिम बंगाल, राज्यातील १९८ स्वयंसेवक व १२ कार्यक्रम अधिकारी सहभागी झाले.

शिबिराचे उद्घाटन दि. २६ फेब्रुवारी, २०२३ रोजी मा. कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी याच्या अध्यक्षतेखाली श्री. डी. कार्तिगेयन, संचालक, क्षेत्रिय संचालनालय, पुणे, डॉ. रामेश्वर कोठावडे राज्यसंपर्क अधिकारी महाराष्ट्र शासन, प्र–कुलगुरू डॉ. संजय दुधे, डॉ. सोपानदेव पिसे, संचालक रासेयो यांच्या उपस्थितीत संपन्न झाले.

विद्यार्थ्यांकरीता जी–२०, युवा व विकास आदी विविध विषयावर व्याख्यान, नागपूरची ऐतिहासिक ओळख व्हावी म्हणून झिरो माईल, मध्यवर्ती संग्रहालय, दीक्षाभूमी, फुटाळा, स्वामीनारायण मंदिर, स्वामी विवेकानंद स्मारक, विद्यापीठ ऐतिहासिक इमारत, फ्रिडम पार्क, मेट्रो इत्यादी ठिकाण दाखविण्यात आले. संपूर्ण देशातील लोक व शास्त्रीय कला दर्शनकरीता सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन प्रतिदिन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळण्याकरिता देशभक्ती गीत, लोकनृत्य व लोकगीत, शास्त्रीयनृत्य, वक्तृत्त्व, भित्तीचित्र इत्यादी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

प्रेरणा २०२३ राज्यस्तरीय नेतृत्व गुण विकास शिबीर : राष्ट्रीय सेवा योजना उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठ शताब्दी महोत्सवाचे औचीत्य साधून प्रेरणा २०२३ राज्यस्तरीय नेतृत्त्व गुण विकास शिबिराचे आयोजन दिनांक १३ ते १७ मार्च, २०२३ या कालावधीमध्ये विद्यापीठ दीक्षांत सभागृह येथे आयोजित करण्यात आला.

प्रेरणा २०२३ या शिबिरामध्ये संपूर्ण महाराष्ट्रातील १६ विद्यापीठाचे १५२ स्वयंसेवक व १२ कार्यक्रम अधिकारी सहभागी झाले. निवास व्यवस्था आमदार निवास येथे करण्यात आली व संपूर्ण कार्यक्रम विद्यापीठ दीक्षांत सभागृह येथे करण्यात आले.

५ दिवसीय या शिबिराचे उदघाटन मा. श्री चंद्रकांत दादा पाटील मंत्री उच्च व तंत्र शिक्षण महाराष्ट्र शासन यांच्या शुभ हस्ते आभासी पद्धतीने झाले. मा. कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली मा. प्र–कुलगुरू डॉ. संजय दुधे, मा. राज्यसंपर्क अधिकारी डॉ. रामेश्वर कोठवले, संचालक, डॉ. सोपानदेव पिसे यांच्या उपस्थितीत १३ मार्च, २०२३ रोजी दुपारी ४.०० वाजता संपन्न झाला.

५ दिवसीय शिबिरामध्ये श्री. अनिल केगंर यांचे 'रासेयो मधील प्रेरणादायी प्रवास आणि लोककलेतून जनजागृती', कु. प्रिया पाटील यांचे 'स्वच्छता आणि युवा' डॉ. प्रशांत कडू यांचे 'जी–२० युवकांची भूमिका' डॉ. सतिश चापले यांचे 'रासेयो आणि नेतृत्त्व गुण विकास', डॉ. विनोद गवारे यांचे 'युवा आणि राष्ट्रीय सेवा योजना', श्री. टाकले यांचे 'बैक कार्यपद्धती आणि युवकांचा सहभाग' या विविध विषयांवर व्याख्यान आयोजित करण्यात आले.

या शिबिरामध्ये विविध विषयांवर गट चर्चा व सादरीकरण आयोजित करण्यात आले. विद्यार्थ्यांना दीक्षाभूमी, फ्रिडमपार्क, महाराजबाग, विद्यापीठ ऐतिहासिक वास्तू दाखविण्यात आल्या. विद्यार्थ्यांकरिता वक्तृत्त्व, लोकगीत गायन, भित्तीचित्र, देशभक्ती गीत गायन, लोकनृत्य स्पर्धाचे आयोजन करण्यात आले. प्रत्येक दिवशी संध्याकाळी प्रबोधनात्मक सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

शिबिराचा समारोप दिनाक १७ मार्च, २०२३ रोजी दुपारी १२.३० वाजता मा. कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली मा. प्र–कुलगुरू डॉ. संजय दुधे, मा. अधिष्ठाता डॉ दत्तात्रय वाटमोडे, संचालक डॉ सोपानदेव पिसे यांच्या उपस्थितीत समारोपीय कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यामध्ये विद्यार्थी व कार्यक्रम अधिकारी याचे मनोगत विविध स्पर्धाचे पारितोषिक वितरण करण्यात आले. शिबिराचा अहवाल संचालक डॉ. सोपानदेव पिसे यांनी सादर केला. उपस्थितीत मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. विनोद खेडकर यांनी व आभार श्री. प्रकाश शुक्ला यांनी मानले.

शिबिराचे यशस्वी आयोजनाकरिता मा. संचालक यांच्या मार्गदर्शनामध्ये रासेयो विभागातील श्री. प्रकाश शुक्ला, श्री. प्रवीण साखरे, श्री. सतीश मोहुर्ले, विविध समिती सदस्य, जिल्हा व विभागीय समन्वयक व आजी माजी स्वयंसेवक यांनी अथक प्रयत्न केले.

विद्यापीठ छंद मंदिर

उद्देश : विद्यापीठ अनुदान आयोगाच्या योजनेनुसार राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने इ. स. १९६० मध्ये विद्यापीठाच्या तसेच विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे कौशल्य व कार्यक्षमतेच्या सर्वांगीण विकासाकरिता निरनिराळ्या छंद अभ्यासक्रमात प्रशिक्षण देण्याचे उद्देशाने हे हॉबी वर्कशॉप स्थापन केलेले आहे. छंद मंदिर (Hobby Workshop) विभागात खालील छंदात विद्यार्थ्यांना छंद प्रशिक्षण देण्यात येते.

विद्यार्थ्यांना खालील पाच छंद प्रशिक्षण दिल्या जाते.

१) डिजीटल फोटोग्राफी (Digital Photography) – तीन महिने कालावधी

२) विद्युत परमाणुशास्त्र (Electronics)– तीन महिने कालावधी

३) मातीकाम व पेंटिंग (Clay Modelling & Painting) – तीन महिने कालावधी

४) काष्ठकला (Wood Art) – तीन महिने कालावधी

५) मोबाईल फोन रिपेअरिंग (Mobiel Reparing) – तीन महिने कालावधी

१) डिजीटल फोटोग्राफी : ह्या छंद वर्गात डिजीटल फोटोग्राफी अंतर्गत विद्यार्थ्यांना छायाचित्रणाबाबतचे उत्कृष्ट प्रशिक्षण देण्यात आले. टेबल टॉप, पासपोर्ट फोटो, व्यक्तिछायाचित्र, नैसर्गिक छायाचित्रे, कार्यक्रमाची छायाचित्रे ह्यांची माहिती देऊन प्रात्यक्षिके करवून घेतली. विद्यार्थ्यांना आउटडोअर छायाचित्रे घेण्यासाठी विविध स्थळांवर घेऊन जाऊन प्रात्यक्षिके करवून घेतली. घेतलेल्या छायाचित्रणाच्या प्रिंटसचे विविध आकार विषयी माहिती दिली. ह्या छंद वर्गात डिजीटल कॅमेरा कसा हाताळावा ह्याचे ज्ञान विद्यार्थ्यांनी आत्मसात केले छायाचित्राणासह चलछायाचित्रण कसे करतात याची माहिती दिली व प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांनी केले.

२) विद्युत परमाणूशास्त्र : यात विद्यार्थ्यांना विविध इलेट्रॉनिक्स कंपोनन्टची ओळख व पी. सी. बी. वर जुळवणी करण्याचे प्रात्यक्षिक ज्ञान दिले जाते. विविध हॉबी मॉडेल तयार करणे शिकवले जातात. जसे लहान ॲम्प्लीफायर, लाईट डिमर, सर्किट, फॅन, मेटल डिटेक्टर, डोअर बेल, मिनी इमरजन्सी लाईट इत्यादी. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करून स्वकल्पनेने इलेट्रॉनिक्स वस्तू निर्माण करण्यास प्रोत्साहन दिले जाते.

३) मातीकाम व पेंटिंग : ह्या छंद वर्गात मातिकाम व पेंटिंग याचे प्रशिक्षण दिले गेले. मातीच्या मूर्ती, फ्लॉवर पॉट्स व विविध वस्तू मातीपासून तयार करण्याची माहिती व प्रशिक्षण दिले गेले. स्केचिंग, पेन्सील शेडिंगची चित्रे, व्यक्तिचित्रे काढलेली चित्रे, वॉटर कलर, ऑईल कलर व पोस्टर कलरनी रंगवण्याचे प्रात्याक्षिक विद्यार्थ्यांकडून करवून घेतले.

४) काष्ठकला : ह्या छंद वर्गात लाकडापासून विविध त्रिमित वस्तू तयार करण्याची सोय आहे. माहिती देऊन प्रात्याक्षिक करवून घेतले जाते.

५) मोबाईल फोन रिपेअरिंग : ह्या छंद वर्गात मोबाईल फोनच्या विविध मॉडेलची माहिती दिली गेली. मोबाईलमध्ये कोणत्या प्रकारचा बिघाड होऊ शकतो हे समजवून देऊन ते दुरुस्ती करण्याचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांकडून करवून घेतले.

ध्वनीक्षेपण व्यवस्था (Sound Arrangement) :

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या प्रशासनाद्वारे आयोजित विविध सर्व कार्यक्रम, दीक्षांत समारंभ, वर्धापन दिन, महाराष्ट्र दिन, गणराज्य दिन, स्वातंत्र्यदिन, व्याख्यानमाला, अधिसभेच्या सभा, व्यवस्थापन परिषदेच्या सभा, विद्या विभागाच्या निवडणूकीकरिता छंद मंदिर विभागातर्फे ध्वनीक्षेपणाची व्यवस्था करण्यात आली. दीक्षांत सभागृह, गुरूनानक भवन, जमनालाल भवनातील ध्वनीप्रक्षेपण व्यवस्थेची सर्व व्यवस्था व काळजी छंद मंदिराद्वारे घेतली गेली.

छंद मंदिरातील छंद वर्गाच्या माहितीचे प्रसारण :

छंद मंदिरातील छंद वर्गाविषयीची माहिती विविध विभाग व महाविद्यालयास परिपत्रक पाठवून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याची व्यवस्था करण्यात आली.

प्रमाणपत्र वितरण कार्यक्रम :

विद्यार्थ्यांनी छंद वर्गाचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर त्यांना विद्यापीठाद्वारे अभ्यासक्रम प्रमाणपत्र प्रदान केले जाते. ह्या अहवाल कालावधीत छंद मंदिरात एक कार्यक्रम आयोजित करून पोलिस आयुक्त कार्यालयातील वरिष्ठ छायाचित्रकार श्री. शिरीष वऱ्हाडपांडे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र दिले गेले, श्री. शिरीष वऱ्हाडपांडे ह्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

विद्यापीठ सेवा उपस्कर बांधणी केंद्र

विद्यापीठ सेवा उपस्कर बांधणी केंद्राची स्थापना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या योजनेनुसार १९८० साली झाली. विद्यापीठाचे विज्ञान विभागातील विद्यार्थी व संशोधन करणारे विद्यार्थी यांना तांत्रिक कार्यासंबंधी सेवा देणे तसेच प्रयोगशाळेतील उपकरणांची निगा व दुरुस्तीची कामे, संशोधनात्मक कार्यासाठी वापरण्यात येणाऱ्या उपकरणांची देखभाल व काचेचे साहित्य बनविणे इत्यादी कामे या विभागाात पार पाडली जातात. सद्य:स्थितीत महाराष्ट्र विद्यापीठ कायदा २०१६ नुसार सदर केंद्र विद्यापीठाचे 'सेवा युनिट' म्हणून कार्यरत आहे.

सेवा उपस्कर बांधणी केंद्राचे विभागामध्ये खालीलप्रमाणे उपविभाग आहेत.

१. यांत्रिकी कार्यशाळा

२. काचफुगारी विभाग

३. पृथक्करणीय विभाग

४. विद्युत उपकरणे व दुरुस्ती विभाग

सद्य:स्थितीत यांत्रिकी कार्यशाळा, काचफुगारी विभाग व पृथक्करणीय विभाग निष्क्रिय अवस्थेत आहेत. युसीक विभागाातील विद्युत उपकरणे व दुरुस्ती या उपविभागाद्वारे १ जुलै, २०२२ ते ३० जून, २०२३ या कालावधीत संशोधनात वापरण्यात येणारी तांत्रिक उपकरणांच्या दुरुस्तीसंबंधी एकूण ३४ कामे पार पाडण्यात आली आहेत.

महाविद्यालयाअंतर्गत येणाऱ्या विभागांना संगणक दुरुस्ती सेवा व वातानुकुलित यंत्राची दुरुस्ती सेवा व वातानुकुलित यंत्राशी निगडित वीज पुरवठा तसेच इतर वीज पुरवठा समस्यांसंबंधी सेवा पुरविण्याकरिता अनुक्रमे तंत्रज्ञ (ब), तंत्रज्ञ (क) (तात्पुरत्या स्वरूपात) व तंत्रज्ञ (ड) या पदावर कंत्राटी पद्धतीने विभागात भरती करण्यात आली आहे.

यानुसार तंत्रज्ञ (ब) कंत्राटी पदावर असणाऱ्या व्यक्तीने महाविद्यालयाअंतर्गत येणाऱ्या विभागांतील एकूण ११२ संगणक, ५६ प्रिंटर व २५ नेटवर्किंगशी निगडित दुरुस्ती कामे, त्याचप्रमाणे तंत्रज्ञ (क) (तात्पुरत्या स्वरूपात) व तंत्रज्ञ (ड) कंत्राटी या पदावर असणाऱ्या व्यक्तीने सोबत मिळून एकूण ५७ वातानुकुलीत यंत्राशी निगडित दुरुस्ती कामे ३० जून, २०२३ या कालावधीत पार पाडली आहेत.

याव्यतिरिक्त, विद्यापीठाअंतर्गत मोडत असलेल्या विभागात अस्तित्वात असलेली परंतु सद्य:स्थितीत नादुरुस्त स्वरूपात असलेली उपकरणे दुरुस्तीयोग्य आहेत किंवा नाही व नसल्यास संबंधित विभागास ते खरेदी करता येईल किंवा कसे याबाबतचे प्रमाणपत्र देण्याचे कामसुद्धा केंद्राद्वारेच पार पाडण्यात येत असते.

यूजीसी स्कीम फॉर एंट्री इन सर्व्हिसेस

यूजीसी स्कीम फॉर एंट्री इन सर्विसेस हे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पूर्व परीक्षा प्रशिक्षण केंद्राशी संलग्न आहे. डिसेंबर २००७ पासून अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती आणि अल्पसंख्याकांकरिता राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाद्वारे यूजीसी स्कीम फॉर एंट्री इन सर्व्हिसेस फॉर एस.सी./एस.टी. आणि मायनॉरिटी केंद्राची स्थापना करण्यात आली.

सदर केंद्रामध्ये यूजीसी ११ व्या व १२ व्या पंचवार्षिक योजनेच्या अनुदानातून प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात आले. यूजीसीच्या १३ व्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत प्रशिक्षण केंद्राला कोणतेही अनुदान प्राप्त झाले नाही. अनुदान अभावी प्रशिक्षण कार्यक्रम स्थगीत आहेत.

विद्यापीठाचा ९९ वा वर्धापनदिन समारंभ :

